Berar Samachar.

वर्ष ४४ ] आकोला—सोमवार तारीख ५ माहे दिसेंबर सन १९१० इ० [ अंक ४५

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हे लिहिल्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. त्यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

---


### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेविता येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिलक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिलक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक, आकोला ९।१२।०९ — G. A. Phillips. एजंट
नं ७३

---

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ $\frac{२}{३}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक, आकोला २१.९.१० — G. A. PHILLIPS. एजंट.

---

### NOTICE.

D. Y. Phatak oil-engine expert for Fielding oil engines (as supplied by Messrs. Duncan Stratton and Co. of Bombay) can be consulted as to the purchase condition and value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:- C/o N. G. Ketkar Esq.
Pleader
Amraoti.

No. N. Ph. 81

---

## अंकगणीत.

—:०:※ ०:—

### लिमयेकृत. भाग १।२।३.

मुंबई इलाख्यांतील विद्याखात्यानें सर्व शाळांस शिकविण्या करितां क्लासबूक ह्मणून मंजूर केलेलें व सर्वमान्य आणि अत्यंत लोकप्रिय झालेलें व सर्व शाळांत सरास चालूं असलेलें व सरकारनें नवीन ठरविलेल्या यत्ताप्रमाणें गणित विषयानुक्रमानें सोपपत्तिका व प्रत्येक विषया वरील उदाहरणांच्या मोठ्या संग्रहासह तयार केलेले शिक्षक व विद्यार्थी यांस अत्यंत सोईस्कर आणि फायद्याचे असें लिमयेकृत अंकगणीत. भाग पहिला इनफंट क्लास व नवीन तीन यत्ता करितां किंमत ०३०६ भाग दुसरा नवीन चार पांच यत्ता करितां किं. ०६०६ भाग तिसरा नवीन सहा सात यत्ता करितां, थर्ड पब्लिक सर्व्हिस, ट्रेनिंग कॉलेजांतील व यु. एस. एफ. परिक्षेस बसणाऱ्या उमेदवारा करितां नवीन आवृत्ति किंमत १२ वरील तीनही भागाचें पृथकरण किं. १०. या शिवाय हीं पुस्तकें बक्षिसा करितां व लायब्ररी करितांहि मंजूर केलीं आहेत.

नागपूर व वऱ्हाड प्रांतांतील स्कुल मास्तर लोकांस नारो आप्पाजी गोडबोले दुकान पुणें, याजकडून अगत्याची व विनयपूर्वक विनंती— चालूं सालीं मेहेरबान डायरेक्टर साहेब बहादूर नागपूर व वऱ्हाड यांनीं आपले कडील शाळांत शिकविण्या करितां लिमयेकृत अंकगणीत भाग पहिला व दुसरा मंजूर केला आहे. व भाग तिसरा मराठी स्कुल लायब्ररी करितां मंजूर केला आहे तरी सदर पुस्तकें आपलें शाळेंत सुरूं करून खालील पत्त्यावर मागविण्याचे करतील. किरकोळ घेणारास शेंकडा २५ टके कमीशन व घाऊक घेणारास शेंकडा ३३ टके कमीशन मिळेल. टपाल खर्च निराळा पडेल.

नारो आप्पाजी गोडबोले
दुकान पुणें पेठ बुधवार
नो. नं. ण ९८

---

### जाहिरात.

मराठा शिक्षण परिषदेची चवथी बैठक बडोदा येथें तारिख २७।२८ माहे दिसेंबर इसवी रोजीं होणार आहे. तरी वऱ्हाडवासी मराठा बंधुंस विनंती कीं ज्यांची बडोदा येथें परिषदे करितां हजर राहण्याची इच्छा असेल त्यांनीं मराठा शिक्षण समाजाचे चेअरमन उमरावती यांना तारिख १२।१२।१९१० चे आंत पत्रानें कळविण्याची मेहेरबानी करावी. ह्मणजे बडोदा येथें परिषदेचे सेक्रेटरी यांना आगाऊ सुचना देण्यांत येईल व तेथें तकलिफ होणार नाहीं कळावें, ता० २९-११-१०

तुकाराम शिवराम कोरडे
सेक्रेटरी
म० शि० प० उमरावती

नो नं ण - ९९

---

## त्वरा करा त्वरा करा.

अशी संधी पुन्हां येणार नाहीं.

सहा घड्यांहें घेणारास



एक घड्याळ बक्षीस.

दरएकाची किं ३। रु. — पोष्ट खर्च माफ.

उत्तम प्रकारचे इमिटेशन
रास्कोप सिस्टिम

नांवचे खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान,

मिळण्याचा पत्ता
खोजा वल्लीभाई इस्माल
मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो नं ण ४१

---

### जाहिरात

वर्षफल—प्रत्येक महिन्याचे फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ०= जन्मकाल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

पत्ता—
भा० गो० पंडित,
मु० व पो० लोणखेड
प. खानदेश.
नो० नं० ण ३०


---

### नोटीस,

तुळसाई मर्द शिवरामजी तेली राहणार पंचगव्हाण पेठ ता० आकोट यांस-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तूं माझ्या वडिल भावाची बायको असून तुजला एक मुलगा नामें तुकाराम हा मैत झाला आहे. शेती सर्व एका ठिकाणीं आहे, हल्लीं तुझे मनांत मुलगा मेल्यापासून असें आलें कीं मौजे उमरखेड ता० आकोट येथील शेत सर्वे नंबर ५७ चें शेत तूं आपले मुलीस देण्याच्या विचारांत आहेस. तेव्हां त्या शेतावर तुझा कांहींच हक्क नाहीं. तूं फक्त खाण्याची मालक आहेस तेव्हां वरील शेत कोणास गहाण, खरेदी किंवा पट्यानें अगर बक्षिस देऊं नये दिल्यास रीतीप्रमाणें काम चालेल. तूं विधवा स्त्री असल्यानें तुला देण्याचा हक्क नाहीं, करितां ही नोटीस दिली आहे. कळावें ता० २१-११-१९१० इ.

सही
सदु वा चिमणाजी तेली
राहणार पंचगव्हाण हल्लीं
आकोला नि० खुद.—
नो. नं. ण ४४

---

### नोटीस

नोटीस बेशमी लक्ष्मी मर्द मारुती संवदळ पाटील राहणार पाथडी तालुके खामगांव जिल्हा बुलडाणा इस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं माझी साक्षात भावजई होतीस माझा भाऊ बळीराम हा अजमासें १३।१४ महिने झाले मयत झाला त्या नंतर कांहीं दिवसांनीं माहेरीं जाण्याचें ह्मणून निमित्य करून गेलीस व तेथें गेल्यावर तूं आमचा विचार न घेतां तुझे आईबापाच्या सल्लयानें गंधर्व केलेंस. तूं आमचे कडून माहेरीं गेलीस त्या वेळीं तुझे आंगावर व माझा पुतण्या नथु बळीराम हा अज्ञान दोन वर्षाचा आहे त्याचे आंगावरील दागिने तुझे जवळ आहेत ते खालीं लिहिल्या प्रमाणें.

चांदीचे दागीने अजमासें वजन तोळे.

| | |
|---|---|
| कडे. | १२ |
| कोपरवाळ्या. | ६ |
| करदोडा. | २० |
| गळ्यांतील सांखळी. | ६ |

एकंदर ४३ तोळे

सदर्हू प्रमाणें दागीने नथुचे आंगावर होते. व तुझे आंगावरील दागीने खालीं लिहिल्या प्रमाणें.

चांदीचे दागीने अजमासें वजन तोळे.

| | |
|---|---|
| तोडे. | ८० |
| गुंडवाळ्या. | ४० |
| कोपरवाळ्या. | ३० |
| हातांतील कडे. | ११ |
| पटल्या. | १२ |
| गोफ. | १२ |

एकंदर १९० तोळे.

सोन्याचे दागीने अजमासें वजन तोळे. मासे.

| | |
|---|---|
| दंडांतील कडे. | १४ |
| पुतळ्या ८ | २ |
| बाळ्या व मुरक्या. | २ |
| कानांतील नथ बाळीच्या मण्यासुद्धां | १ |
| गळ्यांतील गरसोळी मण्यासुद्धां वजन | ६ मासे |

एकूण १९ तोळे ६ मासे.

येणें प्रमाणें दागीने तूं मुलासुद्धां माहेरीं जातानां घेऊन गेलीस. हे सर्व दागीने अज्ञान मुलगा नथू याचे मालकीचे आहेत. तूं दुसरा घरठाव केल्यामुळें तुझा त्यावर कांहीं हक्क नाहीं. तरी तुला नोटीस देऊन कळवितों कीं सदर्हू दागीने तूं मोडूं नयेस. अगर त्याची कोणत्याहि रीतीनें नासधूस करूं नये. तुझे हल्लींच्या नवऱ्याचें मत असें झालें आहे कीं अज्ञान नथूच्या जिनगीची नासधूस करून टाकावी. तर सदर्हू दागिन्यांची अगर अज्ञानाच्या कोणत्याही जिनगीची नासधूस करण्याचा तुला अगर तुझे नवऱ्यास मुळींच हक्क नाहीं. या उपर कांहीं नुकसान वगैरे केल्यास त्याबद्दल कायदेशीर तजवीज केली जाईल. कळावें तारीख. ३०।११।१९१०

सही
पुंडू वल्लद बापूजी पाटील राहणार सांगळे ता. खामगांव नि० खुद सांगळा.
नो० नं० ण ५७

## नोटीस

रा० रा० बाजीराव हिमतराव देशमुख राहणार मौजे निमगांव ता० मलकापूर जि० बुलढाणा यांसः–

मानमल आईदान दुा आकोलें यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुह्मी तारीख २२-१०-१० चीं आमचे दुकानास आकोलें वऱ्हाडसमाचार वर्तमान पत्राच्या तारीख २४।१०।१९१० चे अंकांत छापून दिलेली नोटीस वाचून पाहीली. तींत तुह्मी पुष्कळ खोटा मजकूर लिहीला आहे. ज्याअर्थी तुह्मी अशी खोटी नोटीस दिली आहे त्याअर्थी तुमचे मनांत बेमानी करण्याचें दिसत आहे. तरी तुह्मांस असें स्पष्ट कळविण्यांत येतें कीं, रुपये २००० दोनहजारांचें जें गहाणखत तुह्मी आमचे दुकानास लिहून दिलें आहे तें आपण स्वतः येऊन नोंदून न दिल्यास रीतीप्रमाणें तें नोंदून घेण्याची आह्मी व्यवस्था करूं. ज्याअर्थी तुमचे नोटीशींत लिहीलेले ५००० पांच हजारांचे दस्तऐवजा संबंधानें तुमची खुषी नाहीं व तुमचे सावकारास आह्मी अद्याप रक्कम दिली नाहीं त्याअर्थी त्या दस्तऐवजांतील करार आह्मी रद्द केला आहे. याशिवाय जास्त लिहीण्याचें कारण नाहीं तारीख २२।११।१९१०.

सही

मानमल आईदान द. आईदान

नो. नं. ण ४२

## नोटीस

नोटीस बेशमी शेवाराम कृपाराम मारवाडी साहु दुकान बावनबीर रा० पळसी यांसः–

नोटीस दणार रामभाऊ भगवान शिंपी रा० बावनबीर यांजकडून नोटीस देण्यात येतें कीं तुह्मी तुमची जमीन बावनबीर येथील शेत सर्वे नंबर ३२ एकरगुंठ १३८।१८ आकार रुपये याचें खातें स्त्री मर्द सखाराम आखरे हिचे नांवानें असून सदर्हू शेत तुह्मी आह्मास एक वर्षाचें पीक खाण्यास मांडेपट्यानें दिलें होतें. व आपण मजला साक्षीदारांसमक्ष पाच वर्षें देण्याचें कबूल केलें होतें. असें असतां जो मीं तुह्मास एक वर्षाचा मांडेपट्टा लिहून दिला त्याचे स्वामीत्वाचे पैसे १९० मी तुह्मास मांडेपट्यांत प्रत्यक्ष लिहून दिले. परंतु सदर्हू शेतींतील किस्तकारी करण्याकरितां गेलों असतां त्या शेतांत भानगडी असल्यानें मजला तें शेत कन्हयालाल मोहनलाल रा० टुनकी जहागीर याजपाशीं खरेदी असल्यामुळें वाहता आलें नाहीं याबद्दल मीं आपणास एक दोन वेळां साग्र हकीकत कळविली होती व हें शेत कन्हयालाल मोहनलाल यानेंच स्वतः वाहीलें आहे. त्या नुकसानीबद्दल मला तुह्मी दुसरें शेत देण्याचें कबूल केलें होतें तेव्हांपासून आपण त्या गोष्टी कानावर न घेतां माझा मांडेपट्टा ही काढून दिला नाहीं. तो रद्द असे. याकरितां माझें झालेलें नुकसान एक महिन्याचे आंत भरून द्यावें नाहीं पेक्षां मी तुमचेवर दिवाणींत दावा आणून पंचानुमतें जो नफा ठरेल तो भरून घेईन. या नोटीशीचा खर्च तुमचेवर असे कळावें ता. १७-११-१०

सही

रामभाऊ भगवान शिंपी

नो. नं. ण ४३ दस्तुर खुद्द.

## नोटीस

बेशमी रा. रा. हरसिंग गणपत देशमुख राहणार बोरगांव मंजू ता. आकोला यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं तुह्माला मी मुखत्यार नेमलें होतें. त्या मुखत्यारपणांत तुह्मी इमानदारीनें वागला नाहीं आणि माझे कर्जरोखे व इतर गहाणखतें हीं तुह्मी दाबून बसला आहां. इतकेंच नाहीं तर आतां असें कळतें कीं मला चोरून न विचारतां तुह्मी परभारें पैसे वसूल करून माझ्या नांवच्या पावत्या चालू केल्या आहेत. या लेखानें तुमचें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे माझी सवत नामें लक्ष्मी आणि मी यांच्या दरम्यान झालेले करारनामे तुह्मी आपल्या पाशींच ठेविले आहेत ते मला तुह्मी अद्याप देत नाहीं. तुमचें वर्तन भरंवशालायक नाहीं ह्मणून ही नोटिस पावल्या पासून ८ दिवसांच्या आंत तुह्मी वसूल केलेलीं कर्जें यांचा हिशोब द्यावा, आणि आमची रक्कम चुकती करावी. तसेंच तुह्माजवळ असलेले कर्जरोखे व गहाणखतें, व वर नमूद केलेले करारनामे हे कागद तुह्मी चार पंचांसमक्ष मला समजून देऊन माझ्या हवालीं करावे आणि तसें केल्याबद्दल माझी चुकती पावती घ्यावी. तुह्मी मला न कळत मुखत्यारपत्राच्या सबबीवर जर कांहीं व्यवहार केला असेल तर तो तुमच्या अधिकाराबाहेर असल्या मुळें त्याबद्दल माझी इस्टेट जबाबदार नाहीं. तुह्मी आपल्या मुखत्यारींतील व्यवहारांचा सर्व चुकता हिशोब द्यावा. असें करण्यास चुकाल तर तुह्मावर दिवाणींत फिर्याद करावी लागेल, आणि विश्वासघाताच्या गोष्टी बाहेर उजेडांत पडल्यास तुह्मावर फौजदारी करण्यास माघार घेणार नाहीं. या नोटिशीचा खर्च तुह्मावर पडेल. कळावें ता. २६।११।१०

सही

सोनाबाई मर्द गंगाराम देशमुख

राहणार अंबोडा ता. अकोट

हल्लीं वस्ती बोरगांव खुर्द

ता. आकोला निशाणी

नो. नं. ण ४६ आंगठा

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं रा. रा. हरसिंग गणपत देशमुख राहणार बोरगांवमंजू ता. आकोला यांच्याशीं कोणीही माझ्या जिनगी संबंधानें व्यवहार करूं नये, किंवा मला द्यावयाचा पैसा किंवा वटाईचा माल त्यांस कोणी देऊं नये. ते माझे मुखत्यार नाहींत ह्मणून कोणीही फसूं नये या करितां ही जाहिर सूचना दिली आहे. सदर्हू हरसिंग यांच्या बरोबर केलेला व्यवहार मला किंवा माझ्या इस्टेटीला बांधू शकणार नाहीं. कळावें ता. २६।११-१० इ.

सही

सोनाबाई मर्द गंगाराम देशमुख

राहणार अंबोडा ता. आकोट

नो. नं. ण ४७ निशाणी आंगठा.

## नोटीस

अनंत गंगाधर व सदु सोनाजी तायडे रा. पातुरसेखबाबु ता. बाळापूर जि. आकोला यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं कजबे पटी आंबराई पातुर येथील शत सर्वे नंबर २७४।२७५ या दोन्ही शेतांचे संबंधानें तुमचा व सदाशिव भट व वामन यांचा आपसांत तंटा असल्यामुळें गुदस्त सालीं आपसांत सर्वत्र मिळून आपसांत निकाल करून करारनामे एकमेकांस लिहून देऊन नोंदून घेतले त्यात माझे एक चतुर्थांश हिस्याचे जमिनीचें उत्पन्न व आंबराईचें उत्पन्न आह्मांस वांटून देऊन सालमजकुरीचे लागवणी बद्दल वामन पांडुरंग यानीं एक सालची भाडेचिठ्ठी अलग लिहून दिली त्यांत असें लिहून दिलें आहे कीं सालमजकुरीं पीक निघताच शेत तुह्मी परत घ्यावें, यांत वरूचें पिक असलेलें हल्लीं निघालें आहे. आतां पुढील सालचे किस्तगारी करितां तुह्मी त्या शेतांत जाऊं नये. तुह्मी गेल्यास आमचे एक चतुर्थांश जमिनी बद्दल नुकसानी ३० रुपये मी तुमचेपासून घेईन आज मजला तो हिस्सा ३० रुपयास मागत आहेत करितां तुह्मांस आमचे हिश्यांत जाण्यास सक्त मनाई केली अहे. अगर जबरीनें शेत तुह्मी वहित केल्यास तुमचेवर वरील नुकसानी बद्दल दावा करीन तर कोर्टखर्च नोटीसखर्च तुह्मास देणें लागेल. तकरार केल्यास ऐकली जाणार नाहीं.

सही

सीताराम भट नागो भट जोशी राहणार

पातुर दस्तुर खुद्द.

नो० नं० ण ४८

## नोटीस

नोटीस बेशर्मी अव्यानी मर्द सिदू उर्फ शंभू कवळे कुणबी राहणार देऊळगांव परगणे पातूर तालुके बाळापूर इसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुझा नवरा माझा सख्खा भाऊ होता तो अजमासें दोन महिने झाले मयत झाला त्यानंतर त्याचे शेताचें खातें तुझे नावानें झालें आहे. तीं शेतें जिराईत पातुर येथील सर्वे नंबर ३७४ आणि ३७५ हीं मयत सिदू उर्फ शंभू याची वडिलोपार्जित असून तूं मयताची गंधर्वाची बायको आहेस तूं फक्त अन्न वस्त्राची मालकीण आहेस. मयत सिदू उर्फ शंभूची स्थावरजंगम जिनगी विकण्याचा तुला हक्क नाहीं. तुला अन्नवस्त्र देण्यास मी तयार आहे. मयत सिदू उर्फ शंभू याचा मी सख्खा वारीस त्याचे जंगमस्थावर इस्टेटीचा कायदेशीर मालकीण आहे. करितां वर लिहिलेलीं शेतें, घर, बैलाची जोडी १, वेडी व तुझे अंगावरील डाग दागीने अजमासें रुपये ३०० चे शिवाय घरांतील भांडीकुंडीं. हा माल तूं कोणास गहाण खरेदी वगैरे कोणत्याहि रीतीनें अफरातफ करूं नये. केल्यास तो सर्व रद्द समजून त्याबद्दल कायदेशीर तजवीज केली जाईल कळावें ता. २५।११।१० इसवी.

सही

मुली मर्द नागदेव कुणबी राहणार

सोमटाणें निशाणी खुद्द, दस्तुर

नामदेव रंभाजी कणबी रा. सोमटाणें.

नो० नं० ण ४९

## नोटीस

सदाशिव भट बिन शिवराम भट व वामन भट बिन पांडू भट जोशी रा. पातुरशेखबाबु ता. बाळापुर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मीं उभयतां भावांनीं गुदस्तसालीं आमचा व तुमचा तंटा असलेला आपसात निकाल करून करारनामे रजिष्टर करून दिले व घेतले. या तजविजेनें कजबे पटी आंबराई पातुरसेखबाबु येथील शेत सर्वे नंबर ७४।७५ शेत मुळेखानेंच निकाल करून एक चतुर्थांश हिशाचे माझे मालकीचा ताबा मजला देऊन गुदस्त सालचे स्वामीत्वाचे रुपये तुह्मी मजला देऊन आंब्याचे वारही दिले यावरून करारनाम्याचे शर्ती प्रमाणें माझा कबजा कायम केला व पुढें एक सालाबद्दल भाडेचिठ्ठीही वामन पांडुरंग यांनीं करून दिली. याप्रमाणें सालमजकुरीं तुह्मी किस्तकारी करून वरूचें पीक काढून घेतलें शेतही खालीं झालें आहे. आतां शेत तुह्मास वहितीस देणें नाहीं. माझे हिशाची जमीन समाइक असलेली ती ३० रुपयांस लागवणीनें दुसरे लोक मागतात. तेव्हां तुह्मी त्या शेतांत माझे परवानगी शिवाय जाऊं नये कारण तुमचे भाडेचिठ्ठींत अशी शर्त आहे कीं पीक निघतांच तुमचें शेत परत घ्यावें. याजवरून तुह्मांस माझे हिशाचे जमिनींत माझे परवानगी शिवाय जातां येत नाहीं करितां मनाई केली आहे. जर तुह्मी जबरीनें गेल्यास ३० रुपये मी तुमचे पासून दावा करून नोटिसीचा व कोर्टाचे खर्चा सुद्धां दावा करून घेईन. तकरार ऐकली जाणार नाहीं. कळावें तारीख. २६।११।१०

नो० नं० ण ५०

सही

सीताराम भट बिन नागो भट

जोशी राहणार पातूर

दस्तुर खुद्द.

## नोटिशीचें उत्तर.

रा. रा. दर्शनलाल मातादीन कलाल राहणार जळगांव तालुके मजकूर जि० बुलढाणें यांसः—

खालीं सह्या करणार ह्यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं ता० १४।११।१० चे वऱ्हाडसमाचार पत्रांत तुह्मी आह्मांस नोटीस दिली ती अगदीं खोटी आहे. तुमचा बंधु पुरणलाल यानें आमचे जवळ अनामत रकम ह्मणून कधींच ठेविली नाहीं. व त्याचा आमचा कोणतेच प्रकारचा पैशाचा संबंध देवघेवीचा नव्हता. व्यर्थ खोटी नोटीस दिली आहे असें करणें बरोबर नाहीं व विनाकारण आह्मी त्रास देण्याचे विचारानें दावा वगैरे केल्यास आह्मी कोणतेच प्रकारचे जबाबदार नाहीं. व तुमचे बंधूचें वर्तन कसें होतें व काय योग्यतेचे होते हें सर्वांस माहीत आहे. व्यर्थ खोटेपणा करून दुसऱ्यास त्रास देणें हा तुमचा धंदा सध्यां चालू आहे. ह्याचा नीट विचार करावा. नोटिशीचा खर्च तुमचे कडून भरून घेतला जाईल. कळावें. ता० २३।११।१० इ.

सह्या

महादेव बुलाखी नि० हा०

बाळकृष्ण बुलाखी नि० खु०

दस्तुर अण्णाजी रामचंद्र

लक्ष्मण बुलाखी द० ख०

आण्णाजी रामचंद्र सोनार राहणार

जळगांव द. खु.

नो० न० ण ५१

## भक्तिवात्सल्य नाटक

[ मागील अंकावरून पुढें चालूं. ]

### अंक ३ रा.

#### प्रवेश चवथा

**स्थल०**–(नरसिंहाच्या देवळाची बाहेरील बाजू)

**विप्र०**—स्वामी बादशहा कडून भोजना-करितां येणारा रुपया आपण मला अर्पण करितां या करितां आज कृपाकरून या दासाच्या गृहीं अन्न गृहण करावें.

**दासोपंत०**––छे, छे, या नश्वर देहा करितां विप्रवर्यांना श्रम देण्यास या दासाला आग्रह करूं नका. तशांत-

अभंग

आह्मी विष्णुदास ॥ सादर समयास ॥
न होऊ उदास प्रसंगीं ही ॥
छेदूनी काढीलें इच्छा पापीणीस ॥
उरली आमुची आस दत्तपर्यी ॥१॥

**विप्र०**—आपण अन्न सेवन करीत नाहीं तर देहाचें रक्षण कसें होणार ?

**दासोपंत०**—देह हें देवाचें याची काळजी श्री दत्तात्रयाला आहेच शिवाय–

पद

श्रवण, अर्चन, मनन, मुखाचें ॥
दास्य, वंदन, कीर्तन, हरिचें ॥
पादसेवन, सख्य तयाचें ॥
अंतीं आत्मानिवेदन साचें ॥
अशन आह्मा हें भक्ति मुखाचें ॥
वरि प्राशन नामांमृताचें ॥१॥

**विप्र०**—(मनांत) अन्नमय प्राण हा जगाचा सिद्धांत असतां हा मुलगा आज महिना होत आला अन्नाला स्पर्शहि करीत नाहीं. तरी याची शरीरकांति सतेज आणि टवटवीत दिसत आहे. याच्यावर भुकेचा परिणाम कांहींच होत नाहीं. यावरून हा कोणी तरी योग भ्रष्ट पुरुष अवतरून आला असावा. (उघड) असो. मर्जीबाहेर स्वामींना आग्रह करून मी स्वामींचें मन दुखवीत नाहीं. आतां माध्यान्हाची वेळ झाली. करितां श्री दत्तात्रयाला नैवेद्य आणण्याकरितां मी जातों. (जातो)

**दासोपंत०**—माझें जनन दुर्लभ ब्रह्मकुलांत झालें. याबद्दल मी आनंद मानीत होतों. चौऱ्याशी लक्ष योनी फिरल्यावर हा नरदेह प्राप्त होतो. त्यांतही ब्राह्मण कुलांत जन्म होणें मोठेंच भाग्य. अशा स्थितींत ही हें महद्भाग्य माझ्या वांट्यास आलें. आतां ईश्वरभक्ति करून मुक्ति मिळवावी अशा विचारांत होतों तोंच दुर्दैवानें संकट ओढवलें. आज मुदतीचा शेवटला दिवस. उद्यां सूर्य क्षितिजावर येतांच बादशहा मला मुसलमान करणार-देवा, तुझ्या सारखा कृपाळू, तुझ्या सारखा दयाळू, कैवल्यकंदा करुणार्णवा दुसरा कोण असणार! माझा कळवळा तुलाच येईल. तूं केवळ अद्वैत, सच्चिदानंद, भक्तवत्सल स्वानंदकंद आहेस. रे दिगंबरा! भक्तप्रतिपालन हें तुझें ब्रीद असतां माझा तुला कां विसर पडतो! ज्यांच्या उदरीं जन्म घेतला ते देशांतरीं राहिले! परंतु तूं बाप हृदयांतरीं आहेस, ह्मणून तुलाच हांक मारतों.

पद

सर्वांचा तूं असशी ईश ॥
यास्तव नांव तुझें जगदीष ॥
अस्ता जातां आज दीनमणी ॥
भ्रष्टत्वा मम करुनी हानी ॥
यवन व्याघ्र हा टाकिल गिळुनी ॥
धांव दयाळा त्रिशूळपाणी ॥
कृपाशक्ति करि तदिय विनाश ॥१॥

(वजीर येतो)

**वजीर०**—आज आखीरका दिन है. आपके वालिदके तरफसें अभीतक रुपया नहीं आया. लिये बमूजब यकरारके कल आपको मुसल्मीन बनानेका बादशहाका इरादा है. (जातो)

**दासोपंत०**—मना धीर खचूं देऊं नको !
" जीहीं भगवंतासी वाहिले !
ते भवार्थवळें तरले "
हें संताचें वाक्य हृत्पटलावर उज्वल असूं दे. आणि विचार कर कीं,

भगवंत भावाचा भुकेला ॥
भावार्थ देखोनि भुलला ॥
संकटीं पावे भाविकाला ॥ रक्षीतसे ॥

पहा ! ! !

पद

प्रल्हादास्तव हरि अवतरला ॥
कष्ट विदारुनि दैत्य मारिला ॥ धृ ॥
कृष्णेस्तव तो कृष्ण सभेमधिं ॥
अंबर होउनी भिववी दुरवी ॥
भक्तकाजपर असुनि उपाधी ॥
हरण कराया हरि हा सजला ॥१॥

अंक तिसरा समाप्त

---

## आर्य जननीचे कन्या आणि पुत्रसंघ,

॥ सच्चिदानंद कंदाय जगदकुर हेतवे । सदोदिताय पूर्णाय नमो नंताय विष्णवे ॥

श्री गुरुदेव–जे सर्व भूत हिताचे ठायीं निरंतर रत आहेत, जे करुणाघन असून अत्यंत न्यायी आहेत त्यांचे चरणकमलाचें स्मरण करून–आर्यभू कन्या व पुत्र संघाची थोडीशी माहिती देतों–

आतांपावेतों जी अद्वितीय, व परमपूज्य श्रीमती बेझंटबाई यांचें वर्णन केलें त्यांचेच अनेक जगत हितार्थ सुरूं असलेल्या कार्य-बाहुल्यांपैकीं–हीं एक त्यास अत्यंत प्रिय अशी संस्था आहे. ही संस्था काढण्याचीं अनेक कारणें आहेत परंतु त्या सर्वांत मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे त्यांचे आपल्या आर्यभूमींतील तरुणपिढीविषयीं विशेषेंकरून छात्रवर्गाबद्दल अंत करणपूर्वक प्रेम हें होय. त्या धर्मानें–ब्रह्मविद्या समाजाचे अध्यक्ष स्थानीं आहेत. त्यांची सहानुभूती व प्रेम सर्व धर्माबद्दल सारखें आहे. माता-पुत्राचा जो संबंध तोच संबंध त्यांचा आणि विद्यार्थीवर्गाचा आहे. विद्यार्थीवर्गाबद्दल त्यांचे जेव्हां उद्गार निघतात तेव्हां तेव्हां अत्यंत कठीण हृदयाच्या मनुष्याचें देखील अंतःकरण द्रवल्यावाचून राहत नाहीं. त्यास आपलें ह्मणून कांहीं नाहीं. त्यांनीं आर्यभ बंधू भागिनी प्रेमरूप स्थंडिलावर आपलें तन, मन व धनाची आहुती दिली आहे. ब्रह्मविद्या समाजा करितां, तसेंच बनारस येथील विश्वविद्यालया करितां त्याजकडून शारिरीक, मानसीक व अर्थरूपानें स्वार्थत्याग किती होत आहे याची कल्पना करणें देखील आपल्या पंगू मनाचे बाहेर आहे. त्यांचे कार्यबाहुल्याची बरोबरी करणारे हल्लींचे ज्ञात जगांत फार थोडे निघतील अशी माझी कल्पना आहे. अलीकडील त्यांचीं व्याख्यानें ज्यांनीं ज्यांनीं ऐकिलीं आहेत त्यांची कल्पना, त्यांचे ठिकाणीं प्रकाशित होणारी मानुषशक्ति नसून दैवी शक्तीचा प्रभाव दृग्गोचर होतो, अशी आहे. त्यांचा जन्मदिवस, व ज्या संघाबद्दल मी आपणास जी थोडी माहिती सांगणार आहे त्या संघाचे नागपूर येथील शाखेचा जन्मदिवस हा एकच आहे. त्यांचे जन्मदिवसाचे मुहुर्तावर येथील शाखेची स्थापना झाली. ही स्थापना इ० स० १९०९ ह्मणजे गुदस्ताचे आक्टोबर मध्यें होऊन जुलैचे २ तारखेस प्रोफेसर तारापूरवाले यांचे हातून येथील शाखेची नियमबद्ध अशी स्थापना झाली.

प्रथम संघाची स्थापना परमपूज्य अशा काशीक्षेत्रांत स. १९०८ सालीं झाली. संघाचे कार्यक्रमाबद्दल अनेक लोकांचे अनेक तर्क आहेत. कांहीं लोकांस संघाची कल्पनाच भयंकर वाटते व त्यांचे अंतःकरणांत ज्या प्रमाणें शंका येतात तितक्याच व कमिज्यास्ती प्रमाणानें ते संघशक्तीचा नाश करूं इच्छितात. परंतु हें त्यांचें करणें स्वात्मघाताचें असतें. स्थूल भुमिकेवर उत्तीर्ण झालेली दैवी शक्ति ज्याप्रमाणें मानुषप्रयत्नानें नाश होऊं शकत नाहीं, त्या प्रमाणें सुक्ष्मभूमिकेवर उत्तीर्ण झालेल्या विचारशक्तीस कोणी नाहींसें करूं शकत नाहीं. नदीच्या प्रवाहाचा निरोध न करितां त्यास इष्ट असें वळण देणें जसें फायदेशीर होतें, तसें जनतेच्या अंतःकरणांत उद्भवलेल्या लाटेस योग्य वळण देऊन त्या शक्तीचा उपयोग करून घेणें हें राष्ट्रधुरिणांचें कर्तव्य आहे याबद्दल संघसंस्थापक बेझंटबाईनीं पुढील उद्गार काढले आहेत. (सन्स ऑफ इंडिया माभाग १ पा. ११२ ) त्यांचे ह्मणण्या प्रमाणें पहिला मार्ग राक्षसी असून त्यांत कोणाचा नाश होईल हें खात्रीनें सांगता येणार नाहीं. दुसरा मार्ग राजमार्ग असून या मार्गानेंच आजपावेतों सर्व श्रेष्ठ लोक गेले आहेत. राज्यकर्ते असोत अथवा प्रजाजन असोत. उभयता आपआपले कर्तव्याचा विचार करतील तर वर लिहिलेला राक्षसी अथवा वाम मार्गाचें अवलंबन कोणासच सुखकर वाटणार नाहीं. तरुण पिढी, विशेषेंकरून विद्यार्थीवर्गाची चंचल वृत्ति, ज्या कामास ते योग्य नाहींत तीं कामें हातीं घेण्याची त्यांची हौस, फाजील व अविचार प्रेरित राष्ट्रदुरभिमानानें त्यांजकडून झालेले अत्याचार, गुरुवर्गा बद्दल अपूज्यभाव, आचार धर्माची पायमल्ली, गैरशिस्त वागणूक, इत्यादी दुष्टोत्पत्तीस आल्यामुळें संघाचे चालकांनी पुत्रवात्सल्यानें या संस्थेची स्थापना केली आहे. या संघाचा पाया जगद्बंधुत्वाचे पायावर असलेमुळें त्यास कोणी विरुद्ध नाहीं. जी कांहीं प्रतिकूलता आहे व राहील ती संघाबद्दल गैरसमजानें झाली आहे. हा गैरसमज दूर करण्याचें आपलें कर्तव्य आहे असें समजून मी आपणापुढें संस्थेची अंतरव्यवस्था, संस्थेचे सभासद होण्याच्या अटी, सभासदाचें कर्तव्य एकंदर संस्थेची प्रगति याबद्दल थोडीशी माहिती देण्याचें योजिलें आहे.

संस्थेमध्यें सर्व दर्जाचे व वयाचे लोक आहेत. तरुण पिढीचे अंतःकरणांत देशकार्य करण्याची जी उत्सुकता उत्पन्न झाली आहे, त्या उत्सुकतेस योग्य तें वळण लाऊन त्यांचे हातून अयोग्य असें वर्तन घडू न देण्याबद्दल वृद्धांनीं उपदेश करावा, व त्यांचे ठिकाणीं स्वार्थत्यागाची जी इच्छा उत्पन्न झालेली दिसते, तिजबद्दल सहानुभूती दाखवावी. स्वार्थत्याग व मनोनिग्रह हे गुण नागरिकत्वाचे हक्क मिळण्याचीं खरीं साधनें आहेत. हा हेत लक्षांत घेऊनच सिद्धांता प्रमाणें आचरण ठेवण्याची सभासदांस अवश्यकता ठेविली आहे. सभासदांकडून नित्य कांहीं तरी परोपकाराचें कृत्य घडलेंच पाहिजे असा नियम केला आहे. यामुळें स्वकर्तव्यतेची जागृति राहून आपण लोकांचे उपयोगी कोणत्ये तऱ्हेनें पडूं हें समजूं लागतें. कर्तव्य व जबाबदारी या दोन गोष्टींचें पूर्ण ज्ञान नसल्यास नुसती स्वातंत्र्यइच्छा ही व्यक्तीस तसेच राष्ट्रास विघातक होते.

संघांत दोन प्रकारचे सभासद घेतले जातात. संघाचे नियमा प्रमाणें वागण्याविषयीं शपथ घेणारे, व दुसरे तसें वागण्याविषयीं कोशीस करणारे असे आहेत. संस्थेंत एक मुख्य अध्यक्ष असून त्याचे हाताखालीं सुमारें २० सभासद आहेत. प्रत्येक सभासदाचे हाताखालीं चाप्टर्स, व चाप्टर्स, कडून निरनिराळ्या इलाख्यांत वार्डन नेमिले जातात. या वार्डनचे देखरेखी खालीं सर्व हिंदुस्थानांत निरनिराळ्या संस्थेच्या शाखा आहेत. सभासद करण्याचा अधिकार वार्डनला दिला गेला आहे. सभासद होण्याचे अगोदर खालीं लिहिले अर्थाचें वचन सभासदाकडून घेतलें जातें.

‘ ‘ हिंदुस्थनवासी– मग तो कोणत्याही धर्माचा अथवा कोणत्याही ठिकाणीं राहणारा असो, त्याजबरोबर मी बंधू प्रमाणें वागेन व स्त्री असल्यास भागिनी प्रमाणें वागेन. ‘ लोकसेवा ’ हेंच आयुष्यांतील मुख्य इष्ट आहे असें समजेन व ह्मणून–

स्वताचे फायद्याकडे लक्ष न देता लोककल्याणार्थ झटणें.

निराश्रितास आश्रय देणें, ज्यावर जुलूम होत आहे त्यास जुलमापासून सोडविणें, अज्ञास ज्ञानदान करणें; निकृष्टअवस्थेस पोचलेल्या लोकांस मदत करणें; लोकसेवेचें विशिष्ट काम हातीं घेऊन त्याप्रमाणें तत्कार्य सिद्धयर्थ झटणें; नित्य लोकसेवेचें एक तरी काम करणें; राजशासनास अनुसरून आपले इष्टसाध्यर्थ झटणें; आपण ज्या लोकनियुक्त म्युनिसिपालटीचे हद्दींत असूं त्या म्युनिसिपालिटीचे, जिल्ह्याचे, इलाख्याचे, आपल्या मातृभूमि चे, व बादशाहीचे उत्तम नागरीक होणें.

या वर लिहिलेल्या सर्व नियमां प्रमाणें वागण्याविषयीं मी सर्वसाक्षी परमेश्वर, संघाचे अधिपाति, माझा बांधववर्ग माझें राष्ट्र याचे समक्ष मी माझ्या मातृभूमीचा–हिंदुस्थानच–खरा पुत्र होईन अशी शपथ घेतों. ”

नित्य प्रातःकाळीं सभासदानें खालीं लिहिलेप्रमाणें प्रार्थना करावी असा नियम आहे.

“ ब्रह्मांडनायक, जो अनेक नामानें आळविला जातो, तो या संघांतील बंधूभगिनींचे अंतःकरणात व तदनुरोधानें सर्व हिंदुस्थानांत ऐक्यता व लोकसेवेविषयीं प्रेम उत्पन्न करो. ”

संघांतील अधिकारी वर्गाकडून शपथ घेतली जाते ‘ ‘मी सत्यास स्मरून सांगतों कीं माझे शक्तीनुरूप संघा मधील मजपेक्षां लहान बांधवाचें संरक्षण व त्यास मदत करीत जाईन व जें काम मी आपले हातीं घेऊं शकत नाहीं तें काम मी आपले बांधवास कधींही सांगणार नाहीं. ” सभासद होण्याचे वेळीं सभासदास प्रवेशफी चार आणे टेविली आहे. संघाच्या

द्रास, पुणें व बनारस या आहेत.

बोलणें फार सोपें आहे, परंतु प्रत्यक्ष करण्याप्रमाणें कृती करणें फार कठीण आहे. आपले डोक्यांत मोटमोठ्या कल्पना तात परंतु त्याच कल्पनांवर आपण जास्त विचार करूं लागतों तेव्हां इष्टहेतू सिद्धीचे मार्ग किती अडचणी आहेत याचा अनुभव येतो.

सभासद या नात्यानें दररोज एक तरी लोकसेवेचें काम केलें पाहिजे असा नियम आहे व ही लोकसेवा करण्याचे अनेक मार्ग आहेत. आपले अंगीं मोटमोठीं कामें करण्याची योग्यता नाहीं ह्मणून निराश होण्याचें कारण नाहीं. आपले समागमांत जे लोक आहेत आपला संबंध ज्या ज्या लोकांशीं येतो त्या त्या प्रत्येक मनुष्याचे आपण कोणचे कामास पडूं, आपले हातून प्रत्येकाचे कांहीं तरी काम झालें पाहिजे ही इच्छा ठेवल्यानें एक तर परदुःख काय आहे इकडे सहज लक्ष लागल्यानें, दुसऱ्याच्या गरजा लक्षांत येऊं लागतात. व अशा रीतीनें व्यक्तीचेंच काय परंतु राष्ट्राचें दुःख देखील कमी करण्यास आपणाकडून अल्प तरी मदत होते. प्रत्येक व्यक्तीस कांहीं तरी गरज असते, व ती गरज ओळखून, ती गरज भागविण्याची कला फार कठीण आहे प्रेमानें प्रेम वाढतें व द्वेषानें द्वेष वढतो; ही गोष्ट प्रत्येकानें लक्षांत ठेविली पाहिजे. नीतितत्त्वें ही सर्वदा सर्वकालीं आचरण्यास सुलभ व अती सुखदायी असतात, हा त्रिकालाबाधीत सिद्धांत आहे. नवीन पिढीतील कांहीं लोकास दुसऱ्याचा द्वेष केल्यानें आपलें कल्याण होईल असें जें वाटतें तें चुकीचें आहे, व तसें वाटणें हें स्वघातास कारणी भूत आहे. (अरुण)

## वर्तमानसार.

खालील पुस्तकें १९१० च्या प्रेसअॅक्टान्वयें सरकारजमा करण्यांत आल्याचें ता. १-१२-१० च्या मुंबईसरकारच्या गॅझेटांत प्रसिद्ध झालें आहे:- १ लोकमान्य टिळकनो बोध वचनो. टिळकांच्या भाषणांतील उतारे हें पुस्तक रामचंद्र बाळकृष्ण पित्रे यांनीं गुजराथींत लिहिले असून तें मुंबईच्या "भारतजीवन" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें आहे. २ सन्मित्रसमाज मेळ्याचीं १९०९ सालचीं पदें. हें पुस्तक नीलकंठ वामन भिडे यांनीं मराठींत लिहिलें असून तें पुण्याच्या "भारत भूषण" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें आहे. ३ श्री कृष्णपरमात्मा आणि हिंदी राष्ट्रीय पक्ष हें पुस्तक हरि रघुनाथ भागवत यांनीं लिहिलें असून तें "वन्देमातरम्" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें आहे. ४ लोकमान्यांचा निरोप हें पुस्तक गणेश बाळाजी मेडक यांनीं मराठींत लिहिलें असून तें नारायण बळवंत चव्हाण यांनीं पुण्याच्या "लॅाप्रिंटिंग प्रेस" मध्यें छापून प्रसिद्ध केलें आहे. ५ भाल्याच्या फेंकी भाग १।२ हें पुस्तक भास्कर बळवंत भोपटकर यांनीं पुण्याच्या "भाला" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें आहे. ६ पेगन्स अॅन्ड क्रिश्चन्स अथवा "ब्लॅक स्पाट इन दि ईस्ट" हें पुस्तक डब्ल्यू डब्ल्यू स्ट्रिकलंड, बी. ए. यांनीं इंग्रजींत लिहिलें असून तें जॉर्ज स्टॅंडरिंग यांनीं "लंडन" (फिन्स बरी स्ट्रीट) येथें प्रसिद्ध केलें आहे.

समजतें कीं, डॅा. कुक यांनीं एका पत्रांत एक लेख लिहिला आहे. त्यांत असें ह्मटलें आहे कीं, मी उत्तर ध्रुवावर जाऊन पोहोंचलों किंवा नाहीं हें मला माहीत नाहीं. मी थंडीनें व उपासानें बहुतेक वेडा झालों होतों ह्मणून मला वाटलें कीं मी तेथें पोहोंचलों.

मि. ॲस्क्विथ यांनीं निवडणुकीसंबंधानें केलेल्या भाषणांत ह्मटलें आहे. "मतदारापुढें असलेल्या एका सुधारक प्रजासत्तात्मक राज्याचें भावी जीवित अवलंबून आहे. लॅार्डांच्या पछेहाटीच्या व श्रामक सुधारणाच्या योजनेमुळें पार्लमेंटांतील दुसऱ्या कान्सर्व्हेटिव्ह सभेला पूर्वीपेक्षांही अधिक भयंकर व्हेटोचा हक्क प्राप्त होईल."

सर एडवर्ड ग्रे ह्यांचेंही निवडणुकीसंबंधाचें भाषण अशाच अर्थाचें होतें. ते ह्मणाले "सुधारलेल्या नवीन सभेची आवश्यकता आहे, परंतु तिची घटना अशी पाहिजे कीं, कामन्स सभेंत बहुमतानें विचार होऊन ज्या गोष्टी ठरतील त्या हिनें कायम कराव्या. पार्लमेंटच्या रचनेचें बिल त्याच संबंधाचें आहे, परंतु मतदारांनीं लॅार्डांच्या सभेला आपलें मत द्यावें किंवा कॅामन्सच्या सभेला द्यावें ह्मणजे दोहों पैकीं कोणती सभा पाहिजे ह्या संबंधी स्पष्टपणें आपलें मत जाहीर करावें.

× 'आयरिश नॅशनल डायरेक्टरी' नें एक जाहिरपत्रक काढलें आहे त्यांत असें ह्मटलें आहे कीं, लॅार्डांचा पराजय झाला कीं होमरूलचा मार्ग खुला होईल.

कास्पियन समुद्रांत एक मोठें वादळ झालें व त्यामुळें बंदरावर उतरणाऱ्या जागीं पाणी येऊन तेथील तीनशें [illegible] लोक बुडाले. दहा जहाजें बुडून गेलीं आणि किनाऱ्यावरील सात शहरें जलमय झालीं आहेत. ह्या भयंकर वादळामुळें जलमार्गाचा प्रवास बंद पडला आहे. कास्पियन समुद्रावरील जमिनीवर उतरण्याची जागा जरी बुडून गेली नाहीं तरी तिचा बराच भाग उडून समुद्रांत गेला आहे. तिच्यावरील सर्व वस्तु समुद्रांत बुडून किंवा गोठून नाश पावल्या असल्या पाहिजेत.

पारिस येथील आलेल्या तारेवरून समजतें कीं रेल्वेंतील संप मोडण्याकरितां दहशाहीच्या कायद्याचे मसुदे तयार करण्यांत आले आहेत त्यांनीं ह्या बाबतींत चळवळ करणारांस १ महिन्यापासून पांच वर्षांपर्यंतची कैद व २ पौंडांपासून ८० पौंडापर्यंत दंड अशी शिक्षा ठेवली आहे व त्याप्रमाणेंच संप करणारांस ६ महिन्यांपासून २ वर्षां पर्यंत कैदेची शिक्षा ठेवली आहे. संप करणाऱ्या मंडळ्या व लवाद कोर्टें स्थापित झालीं आहेत.

गेल्या ता० २९ रोजीं ना. लॅार्ड हार्डिंज आणि कमांडर इन चीफ ना. सर ओमूर क्रीघ हे घोड्यावर बसून रपेटीस गेले असतां व्हाइसरायसाहेबाचा घोडा एकाएकी बिचकला त्याबरोबर ते खालीं आले. त्यांच्या मदतास सर ओ. क्रीघ येणार होते तों त्यांचाही घोडा उधळला व ते पडले. कोणासही इजा झाली नाहीं.

कृष्ण घोष हा कांहीं गुन्हेगारांच्या मालाची जप्ती करीत असतां त्याचा सहचर मंडल यानें खून केला. त्याबद्दल खुलना येथील सेशन जज्ज यांनीं त्यास तीन वर्षें सक्त मजुरीची शिक्षा सांगितली.

नारायणदास नांवाचा इसम थर्ड क्लासचें तिकिट घेऊन इंटरमिजिएट क्लासमध्यें प्रवास करीत होता. त्यानें कांहीं टिकेटकलेक्टरांवर त्या कंपार्टमेंटमध्यें जास्त उतारू कोंबण्याचा प्रयत्न केल्याबद्दल खटला केला होता व मॅजिस्ट्रेटनीं टिकेटकलेक्टरांस प्रत्येकीं दहा रुपये दंड केला. हा खटला तपासणीकरितां न्या. चेव्हिन याजकडे निघाला. न्यायमूर्तींनीं तिकिटकलेक्टरांस निर्दोषी ठरविलें व थर्ड क्लासचें तिकीट घेऊन इंटरमीजिएट क्लासमध्यें प्रवास करणारास गाडींतून हांकलून लावणें योग्यच होतें असें ते ह्मणाले.

शांघाय येथून आलेल्या तारेवरून समजतें कीं, उत्तरेकडील अन्हुई भागांत दुष्काळ पडला आहे. त्याचा परिणाम ३० लक्ष लोकांवर झाला आहे. या दुष्काळाचा अंमल देशाच्या बऱ्याच भागावर झाला आहे, परंतु तो स. १९०७ मधील दुष्काळ इतका कडक नाहीं.

गुटी येथें वकीलीचा धंदा करणारे सेकंड ग्रेड वकील मि. बीना तिम्मा रेड्डी यांस देवघेवीचा व्यापार केल्याबद्दल वर्ष अखेरपर्यंत वकीली करण्याची मनाई करण्यांत आली आहे. त्यानंतरही देवघेवीचा प्रकार अगदीं बंद करण्यांत आला आहे असें कोर्टाचे नजरेस आणून दिल्या शिवाय वकीली करण्याची परवानगी देण्यांत येणार नाहीं.

अमरेंद्रनाथ मित्र व इतर चौघे इसम यांजवर कालिग्राम येथील एका बाईचे घरावर दरोडा घालून घरांतील मंडळीस मारहाण करून ११०० रु. चा माल लांबविल्याच्या आरोपावरून खटला करण्यांत आला होता. सेशन्स जज्ज यांनीं यापैकीं एकास जन्मठेप काळें पाणी व इतर चौघांस प्रत्येकीं सात वर्षें सक्त मजुरी अशी शिक्षा सांगितली. अमरेंद्रनाथ हा मुखत्यार असून जमीनदार आहे.

## वऱ्हाडसमाचार.

मार्गशीर्ष शुद्ध ३ शके १८३२ दुर्मतिनामसंवत्सरे

## यंदाच्या कांग्रेसचें कार्य.

—०※०—

येत्या डिसेंबरांत अलाहाबाद येथें भरणाऱ्या कांग्रेसची तयारी झपाट्यानें सुरू आहे असें कळतें. संयुक्त प्रांतांतले लोक कांग्रेस संबंधानें पूर्वीपासूनच फार उत्साही आहेत. पं० वा० पंडित अयोध्यानाथ यांच्या वेळेपासून कांग्रेस विषयींची त्यांची आस्था दिवसेंदिवस उत्कर्ष पावत आहे. ना० मदनमोहन मलवीय, पंडित नेहरू यांच्या सारखे कांग्रेसभक्त व त्या समजून व कांग्रेसची माहिती लोकांना देऊन तिचें यंदाचें कार्य यशस्वी करण्याविषयीं मनापासून झटत

आहेत. या कामी सर्वतोपरी मदत करण्याकरितां इंडिया सोसायटीचे दोन सभासद यांना पूर्णपणें साह्य करित आहेत; व त्यांच्या श्रमानें ठिकठिकाणीं कांग्रेस कमिट्या स्थापन होत आहेत अशा आनंदाच्या बातम्या येत आहेत. इतर प्रांतांतून ही यंदाच्या कांग्रेसला प्रतिनिधी निवडण्याच्या सभा होऊं लागल्या आहेत. कांग्रेसवर ज्यांचा विशेष रुसवा आहे अशा बंगाल प्रांतांतसुद्धां लोकांनीं यंदाच्या कांग्रेसला अवश्य जाऊन आपलें ह्मणणें कांग्रेसला कळवावें व बहुमत आपल्या बाजूचें करून घेऊन इष्ट सुधारणा घडवून आणावी परंतु कांग्रेस पासून दूर राहून राष्ट्रीय संस्था बुडविण्याचें अपेश बंगालनें घेऊं नये. असें संजीवनी सारखीं बंगाली पत्रें ह्मणत आहेत. लॅार्ड हार्डिंज् व लॅार्ड क्रू या दोघांच्याही कारकीर्दींत नुकताच प्रारंभ झाला आहे. अशा वेळीं हिंदुस्थानच्या राजनीतीसंबंधानें राष्ट्रीय सभेसारख्या वजनदार व जबाबदार संस्थेनें एकादें धोरण सुचविल्यास त्याचा योग्य विचार होण्याचा बराच संभव आहे. अशा वेळीं सुदैवानें सर विल्यम वेडर्बर्न सारखे इंग्लंडच्या राजकीय वातावरणांत वागत आलेला मुत्सद्दी कांग्रेसचे अध्यक्ष व्हावयाचे आहेत. अशा कांग्रेसच्या हातून कांहींतरी चिरस्मरणीय व देशहिताची कामगिरी घडेल अशी प्रत्येक मनुष्याची अपेक्षा असणें साहजिक आहे. कांग्रेसचे नेहमींचे चर्चेचे व ठरावाचे विषय यंदाचे वर्षी बाजूला ठेवून हिंदुस्थानच्या एकीला कीड लावणारा हिंदु मुसलमानांबद्दलचा एकच प्रश्न कांग्रेसनें हातीं घ्यावा अशी सूचना आह्मी मागें एकदां केली होती. त्या सूचनेच्या धोरणा प्रमाणेंच यंदाचें राष्ट्रीय सभेचें कार्य होईल असा रंग दिसतो. यंदाच्या कांग्रेसचे अध्यक्ष सर विल्यम वेडर्बर्न यांना विलायतेंतल्या स्नेह्यांनीं नुकतीच एक मेजवानी दिली त्या प्रसंगाची हकीकत संक्षिप्त रीतीनें कां होईना पण रूटरनें तारेनें इकडे कळविली आहे. तिजवरून पहातां या हिंदुमुसलमानांच्या प्रश्नाचा विचार कांग्रेसनें हातीं घ्यावा अशी ना० आगाखान, ना० अमिरअल्ली, सर चार्लस् डिल्के, सर फेरोजशहा मेथा प्रभृति पुढाऱ्यांची इच्छा दिसते. एक काळ असा होता कीं त्यावेळीं कांग्रेस ही केवळ हिंदूंचीच सभा असून हिंदूंचें वर्चस्व कायम राखण्याकरितांच आहे, ब्रिटिश सरकाराशीं ती द्रोह करणारी आहे, तिला सर्व सामान्य लोकांची सम्मति मुळींच नाहीं, असें मुसलमानांचे अध्वर्यू सर सय्यद अहम्मद हे मोठ्या जोरानें प्रतिपादित होते कांग्रेस त्यांतून व त्यानंतर मवाळ पक्षानें आणिलेल्या संकटांतून बचावली व आतां त्याच मुसलमान पक्षाचे, अमिरअल्ली व आगाखान यांच्या सारखे अध्वर्यू त्याच कांग्रेसच्या अध्यक्षास हिंदुमुसलमानांचा समेट करण्या विषयीं आग्रहानें सुचवीत आहेत. हें कांग्रेसच्या भाग्योदयाचें तसेंच तिच्या कार्यक्षमतेचें सुचिन्हच ह्मटलें पाहिजे. हिंदु आणि मुसलमान यांच्यांत राजकीय भेदभाव अलीकडे जसा तीव्र झाला आहे तसा पूर्वीं कधीं नव्हता. हिंदुसंस्थानें असोत किंवा बादशहांचा अम्मल असो धर्मभेदामुळें कोणाच्याही अंगच्या गुणाचा लोप होण्याची किंवा त्यामुळें तो मागें पडण्याची वगैरे भीति नव्हती. मराठेशाहींत मुसलमानांच्या गुणांचें चीज होत असे. बंगाल्यांत, रजपुतान्यांत, पंजाबांत व इतर प्रांतांतूनही हिंदुराज्यांच्या, पदरीं मवई, योध्ये व मुत्सद्दी

यांना आश्रय मिळे. तसेंच मुसलमान बादशहांच्या पदरींही तोडरमल, बिरबल, तानसेन व पंडित जगन्नाथराव यांच्या सारख्या हिंदुच्या गुणांची योग्य पारख होई. अजूनही हैद्राबादच्या निजामाचे मुख्य दिवाण राजा किसनचंद बहादूर हे आहेत. व त्या राज्यांत हिंदु आणि मुसलमान हे अगदीं भावाभावा प्रमाणें जिव्हाळ्यानें रहातात हें आपण पहातों. तेव्हां हिंदुमुसलमानांच्या मधील तीव्र भेदाचा रोग हाडींमासीं खिळलेला नसून अद्याप केवळ वर वर आहे. यांत संशय नाहीं. अलिकडे कित्येक अदूरदर्शी अँग्लोइंडियनांनीं मुसलमानांच्या अज्ञपणाचा फायदा घेऊन हा प्रश्न उपस्थित केला नसतां तर आणखी कित्येक शतकेंपर्यंत हिंदू व मुसलमान यांच्यांत भाऊबंदकी उत्पन्न न होता बंधुप्रेमच राहिलें असतें परंतु वर सांगितल्या प्रमाणें कित्येक अँग्लोइंडियनांनीं हा कलहाग्नि पेटवून दिला आहे. व त्याच्या धुरानें दृष्टी अंध होऊन लार्ड मोर्ले व लॉर्ड मिंटो यांच्या सारखे शहाणे मुत्सद्दी सुद्धां चकले आहेत. ही झालेली दिशाभूल नाहींशी करणें व हिंदू व मुसलमान यांच्यांतील भ्रातृभाव पुनः स्थापित करणें हें राष्ट्रीय सभेचें यंदाचें मुख्य कार्य आहे हें कार्य घडवून आणण्यास हिंदुमुसलमानांचें एक संयुक्त कानफरन्स भरवावें अशी सर फेरोजशहा मेथा यांची सूचना आहे. आम्ही ह्मणावें कीं हें कार्य कानफरन्सच्या ऐवजीं कॉंग्रेसनेंच स्वतः हातीं घेऊन तें मोठ्या आस्थेनें, विचारानें व गंभीरतेनें कोणाचेंही मन न दुखावितां पार पाडल्यास आजपर्यंत पंचवीस वर्षे केलेल्या कामापेक्षां यंदाच्या सभेचें काम अधिक चिरस्थायी व महत्वाचें होईल.

## महर्घतेचा प्रश्न.

सध्यां सर्व देशभर जिनसांची जी महागाई झाली आहे व तिच्या पायीं लोकांचे जे अवर्णनीय हाल होत आहेत त्या बद्दलची चौकशी करावी अशी सूचना दोन वर्षांपूर्वीं मद्रास येथें भरलेल्या कांग्रेसनें सरकारास केली होती. तिच्याकडे सरकारचें लक्ष जाऊन चौकशीचे मुद्दे आतां कोठें ठरले आहेत ? हे मुद्दे बरेच व्यापक आहेत आणि ही चौकशी करणारे कामदार हुशार व व्यवहारदक्ष असल्यास त्या पासून योग्य कारणाची मीमांसा होण्यास बरीच मदत होईल तथापि चलनी नाण्यासंबंधाचा प्रश्न या चवकशींत जसा प्रमुखत्वानें यावयास पाहिजे होता तसा आलेला दिसत नाहीं. ही त्यांत मोठी गोम आहे. कदाचित् असेंही असेल कीं हा प्रश्न वाटेल त्यानें सोडविण्या सारखा असून अर्थशास्त्रज्ञांनीच विचार करण्यासारखा असल्यामुळें गांव कामगारापुढें तो ठेवण्यांत सरकारला विशेषसा अर्थ वाटला नाहीं. बाकीच्या प्रश्नांचीं उत्तरें आल्यानंतर अर्थशास्त्रज्ञांच्या निवडक कमिटीपुढें तो मांडता येईल. त्याचप्रमाणें प्रांतांत कोणचा माल आला व कोणचा बाहेर गेला, पिकांची वाढ, औद्योगिकवाढ, रेल्वे रस्ते व इतर दळणवळणाचीं साधनें, पेढ्या वगैरे प्रश्नांचा लोकांच्या गृहस्थितीशीं कसा काय निकट संबंध येतो या प्रश्नाचाही सहानिशा व्हावयाचा असल्यामुळें हिंदुस्थानचें दारिद्र्य वाढत चाललें आहे कीं तो दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे या निकट प्रश्नांचें उत्तर ही या चौकशीअंतीं मिळणार आहे. देशी पत्रें हिंदुस्थानच्या दारिद्र्यासंबंधानें ओरड करित असतात व सरकारी अधिकारी याच्या अगदीं उलट प्रतिपादित असतात अशा विषम प्रश्नाचा कायमचा निकाल या चौकशीनें लागल्यास हिंदुस्थानचे राजनीति शास्त्र सध्यां जें चाचपडत चाललें आहे त्याला कांहीं तरी कायमचें वळण लागेल आणि इशिरानें कां होईना पण सरकार व लोकपक्ष एकाच विषयाकडे एकाच दृष्टीनें पाहूं लागतील हा मोठा लाभ होणार आहे. सरकारनें शेवटीं कांग्रेसच्या या सूचनचा विचार करण्याचें कबूल करून त्याप्रमाणें कामाला सुरवात केली याबद्दल तें स्तुतीस पात्र आहे.

## मराठी भाषेंतले दोष

स्वराज्य, स्वदेशी, आणि बहिस्कार यांचा घोष व जहाल आणि नेमस्त यांचे परस्पराविषयीं शिव्याशाप यांनीं गजबजून गेलेल्या महाराष्ट्रांतील वातावरणांत शांतता स्थापित झाली असून हे अद्याप दुर्दैवी मराठी भाषेचे करुणविलाप विद्वानांच्या कर्णरंध्रात प्रविष्ट होऊं लागले नाहींत हें आश्चर्य आहे. ‘विविधज्ञान विस्तारा’च्या गेल्या एक दोन अंकात रा० कृ० के० गोखले यांनीं मराठी भाषेंत भाषांतर करतांना उत्पन्न होणाऱ्या कित्येक अडचणी दाखवून त्यांच्या कारणांची मीमांसा केली आहे व त्याकडे विद्वानांचें लक्ष जाईल अशी आशा प्रकट केली आहे. आतांपर्यंतच्या अनुभवावरून रा. गोखले यांचा मराठी भाषेविषयींचा आक्रोश अरण्यरुदितप्रमाणेंच होणार हें ठरलेलें आहे. तथापि आमच्या वैदर्भीय वाचकांत एखादा तरी जिज्ञासु असेल. त्याच्या करितां ह्मणून रा० गोखले यांचें ह्मणणें आह्मी येथें देतों. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे रा. गोखले असें ह्मणतात कीं इंग्रजी भाषा जरी आटोपशीर आहे तशी मराठी नाहीं. त्यामुळें इंग्रजींतून मराठींत भाषांतर करतांना एका वाक्याचा किंवा वाक्यांशाचा अर्थ अनेक वाक्यांनीं व्यक्त करावा लागतो; कर्ता व क्रियापद यांचा दूरान्वय कित्येक वेळां अपरिहार्य होतो; क्रियापद नेहमीं शेवटींच आलें पाहिजे असा नियम असल्यामुळें तें येईपर्यंत कर्त्यासंबंधानें कशा प्रकारचें विधान येणार आहे त्या विषयीं मन ताटकळत राहतें; संबंधी सर्वनामें असलेलें वाक्य अगोदर व दर्शक सर्वनामें असलेलें मागाहून आलें पाहिजे असें ठरलें असल्यामुळें अनेक संबंधी वाक्यें आल्यास तत्संबंधाचीं दर्शक वाक्यें फार दूर पडतात; सकर्मक वाक्यांत उद्देश्य आणि विधेय अथवा कर्ता आणि क्रियापद यांच्यामध्यें कर्म मध्यें लुडबडून वाक्यें दुर्बोध करतें; इत्यादि.

आतां या अडचणी दूर करण्याचा मार्ग ही रा. गोखले यांनीं सुचविला आहे तो असा:— [ ते ह्मणतात कीं ] “ मोठ्या वाक्याची साधारण रचना अशी असावी. पहिल्यानें कर्ता व त्याचा परिवार, नंतर क्रियापद आणि नंतर कर्म त्याचा परिवार. स्थलवाचक कालवाचक वगैरे क्रियाविशेषणें, अथवा वाक्याचीं उपांगें यांना त्यांच्या कमी अधिक महत्वाच्या मानानें क्रियापदाच्या पूर्वी किंवा नंतर दोन्हीं बाजूस स्थानें द्यावीं, ह्मणजे सगळें वाक्य डौलदार आणि समतोल दिसेल. ” याही पेक्षां उत्तम पक्ष ह्मणजे अमुकच एका विवक्षित प्रकारें वाक्यरचना झाली पाहिजे असा निर्बंध नसावा असेंही त्याचें ह्मणणें आहे. विशेषणें नामाच्यापूर्वीं आलीं पाहिजेत हा हल्लींचा मराठी व्याकरणाचा नियम त्यांना पसंत नाहीं. नामाच्या पूर्वीं किंवा नंतर दोन्ही बाजूस सवलत त्यांना पाहिजे आहे. त्याच प्रमाणें अकरणरूप करतांना ‘न’चा उपयोग हमेषा करून ‘ रामा जात नाहीं ’ असें न ह्मणतां ‘ रामा न जातो ’ असें ह्मणावें. नकार जेथल्या तेथें लावणें हा शुद्ध पाठ सर्वत्र सुरु करावा अशी त्यांची शिफारस आहे.

आजपर्यंत मराठी वाक्य ध्वनिसंबंधानें ‘शालापत्रकां’त बरीच चर्चा झालेली आहे, पण भाषांतराच्या दृष्टीनें न करतां केवळ व्याकरणदृष्ट्या ती केली गेली. रा. गोखले याची दृष्टि अधिक व्यावहारिक आहे. तेव्हां या दृष्टीनें या विषयाचा ऊहापोह होणें अवश्य आहे. आमच्या वैदर्भप्रांतीं व्याकरण किंवा भाषाशास्त्र यांचे ज्ञाते व भोक्ते शिक्षकमंडळींत दहपांच तरी खास आहेत. त्यांच्यापैकीं कोणी या विषयासंबंधानें थोडक्यांत आपलें मत कळवील तर अशा लेखास आह्मी आपले पत्रीं अवश्य स्थळ देऊन त्या चर्चेविषयीं आमचे चार दोन विचार पुढें मांडूं.

## साधूंचें बंड.

साधुत्वाच्या मिषाखालीं अत्यंत दुष्ट कृत्यें करणारे नरपशु हिंदुस्थानांतच आहेत असें नाहीं; पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र आहेत. धर्मगुरूच्या झग्याखालीं असंख्य घोर पातकें लपविणारे इंग्लंड, इटली, वगैरे देशांतून कसे असतात याचें उत्तम चित्र प्रसिद्ध स्त्री कादंबरीलेखक मेरी कोरेली हिच्या सैतानाचे दुःखाश्रु नांवाच्या कादंबरींत पाहण्यास मिळेल. पण हिंदुस्थानांत ‘ साधु ’ या शब्दाचा धर्माशीं जो निकट संबंध धर्मभोळे लोक लावतात, त्यामुळें अशा लोकांना आपलीं कृष्णकृत्यें छपविण्यास विशेष सवड मिळत असते. खरें पाहिलें तर हे लोक समाजाचे शत्रु होत. असें असतां हिंदुस्थानचे अज्ञान व धर्मभोळे लोक अशा लाखो लोकांना अन्न, वस्त्र व द्रव्य, यांच्या दानानें पोशीत आहेत. हिंदुस्थानांत साधुत्वाच्या नांव खालीं भीक मागणारे ५० लक्ष लोक आहेत. इतक्या लोकांत खऱ्या प्रामाणिकपणानें वागणारे पांच लक्ष सुद्धां सांपडणें कठीण ! बाकीच्या ४५ लक्ष लोकांवर समाज जी दया करीत आहे ती या लोकांत आळस व नृशंसता, आणि देशांत दारिद्र्य वाढविण्यास मात्र कारण होत आहे. या लोकांवर सरकारचा चांगला डोळा पाहिजे, हे समाजांतले कंटक काढून टाकतां आले तर चांगलेंच असें ना० गंगाधरराव चिटणवीस यांनीं कौंसिलांत एकदां बोलून दाखविलें होतें. पण त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. पण नवीन कायदा घडविण्याचें जरी जमलें नाहीं तरी कायद्यानें होणारें कार्य पुष्कळ वेळां हुषार पोलिसाला आपल्या दक्षतेनें घडवून आणतां येत असतें. तें कसें घडवावें हें दाखविण्याचें स्तुत्यकृत्य सागर येथील पोलिस ट्रेनिंग स्कूलचे प्रिन्सिपाल मि० गेयर यांना आपल्या रिपोर्टाच्या द्वारें केलें आहे. हा रिपोर्ट पोलिस अंमलदारांनीच नव्हे तर इतरांनीं सुद्धां वाचण्या लायक आहे. त्यांत ‘ साधु ’ या नांवा खालीं निरनिराळ्या वर्गाचे लोक कसे गोळा होतात, निरनिराळीं नांवें व वेषें कसे घेतात, लोकांना कसे फसवितात, कोणत्या युक्त्यांनीं कोणते गुन्हे करतात, वगैरे सर्व गोष्टी फार चांगल्या दाखविल्या आहेत. अशा तऱ्हेच्या विषयावर शोधक बुद्धीनें व अनुभवाच्या सिद्धतेनें लिहिलेलीं पुस्तकें व रिपोर्ट फार क्वचित् दिसतात. ह्मणून या रिपोर्टाची आह्मी शिफारस करतों, आणि पोलीस यांतली माहिती समजून घेऊन साधूंचें बंड मोडून टाकण्याच्या उद्योगास लागतील अशी आशा करतों.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान– आकाश निरभ्र असून हवेंत चांगली थंडी आहे. किरकोळ दुखणीं कमीं झालीं असून प्लेगाचें पाऊल इतर गांवीं मागें आहे पण उमरावतीला प्लेग अजून जोरावर असून दररोजची मृत्युंची संख्या २०।२५ पर्यंत पोंचते.

रा. रा. रुस्तुमजी फर्दूनजी डिपुटी कमिशनर, भंडारा यांस बुलडाणें डिव्हीजन मधील जंगलखात्याकडे स्पेशल कामावर नेमिलें आहे.

रा. रा. एच. सी. ग्रीनफील्ड आय. सी. एस. यांस असिस्टंट कमिशनर वर्ग २ चे करून आकोल्यास नेमण्यांत आलें.

मेजर ग्लेडन साहेब डिपुटी कमिशनर हांचा आजचा मुक्काम पातुरचा असून पुढील सोमवार पर्यंत आलेगांव, चानी व लाखनवाडा इकडे फिरतील.

PRESS NOTE.

His Majesty's Government and the Government of the United States of America have concluded an agreement for arbitration regarding pecuniary claims of British subjects against the United States Government and of citizens of the United States against the British Government. It is anticipated that this agreement will be ratified shortly and when it is, all such claims will be barred finally unless presented within four months from the date of ratification. All British Indian subjects or persons resident in India who have claims against the United States Government are requested to communicate their names and addresses as soon as possible to the Local Governments of the province in which they reside.

Sd/- P. W. Monie,

Under Secretary to the Government of India.

Home Department,
Calcutta, the 14 th November 1910.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | ९९।।≈ |
| मुंबई ब्यांकेची सोन्याची चीप दर तोळ्यास | | २४ |
| चांदी | | ७३ |
| जवारी नवी | ४९ | ५४ |
| गहूं | ४। | ५ |
| गहूं बनशी | | ११० |
| चणे | | ३।।। |
| तेल | | ८ |
| सरकी | | ११ |
| तुप | १० | ११ |
| कापूस | ८२ | ८५ |
| आकोला जीन | | १०५ |

## नोटीस

सेखर्मा वल्लद सेख करीम मुसलमान राहणार बारसीटाकळी ता. अकोलें यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आज सगसरी ७।८ महिने झाले तुह्मी माझी चुलती लक्ष्मी मर्द भोनाजी माळी राहणार बारसीटाकळी हिनें तुह्मास रक्कम रुपये १०० चें गहाणखत त्यांत एक शेत गांव आंखरचें व टाकळींचे एक अशीं दोन शेतें व घर यांचें खांब २४ अशी जिनगी लिहून दिली परंतु सदर्हू शेतें व घर हीं तुमचेजवळ तिनें माऊबंदांचे धाकानें पोकळ करून दिलीं आहेत करितां तुह्मास कळवितों कीं तुह्मी त्याचे गहाण अगर खरेदी वगैरे संबंधानें कांहीं पुढें तक्रार केल्यास त्याबद्दल मी जबाबदार नाहीं. कळावें. ही नोटीस लिहून दिली सही. तारीख ३० ११-१० इ०

दस्तुर बाजीराव असाराम राहणार अकोलें.

सही

बापू वल्लद कडतु माळी अज्ञान प्र. करणार भाऊ बळीराम गणू माळी राहणार हल्लीं पातूर नि. खुद्द हातची.

नो० नं० ण ९२

---

## नोटीस.

पारबती मर्द बद्दल परदेशी रा० जळगांव जामोद ता० म० जि० बुलढाणें हिसः—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं माझे वडिलोपार्जित जळगांव येथील गोपजी पेठेंतील ज्यात तुह्मी १० वर्षांपासून भाड्यानें रहात आहां. त्यांचें एक वर्षाचें भाडें रु० ६ आपणा कडून मिळालें नाहीं. ह्मणून जागा खालीं करण्या विषयीं आपणास पोस्ट मार्फत एक नोटीस दिली होती ती तुह्मी नाकारली तरी आमचे ६ रु० ता० आक्टोबर १९०९ ते १० चें घेऊन द्यावें किंवा जागा नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत खालीं करून द्यावी. नाहीं तर कायदेशीर रीतीनें आपणा कडून खालीं करून घेऊं.

सही

उकर्डा शालु मापारी माळी नि० खु० हातची रेघ.

दस्तुर गणपत मास्तर रा० कस्बे नांदुरा.

नो. नं. ण ९३

---

## नोटीस.

सर्वत्र लोकांस ह्या नोटिशीनें सही करणार याजकडून असें कळविण्यांत येतें कीं, माझा चुलता तुकाराम वल्लद गोविंदा माळी राहणार मौजे निपाणे प्रगणें पिंपळगांव राजा ता० मलकापूर जि० बुलडाणा याचे नांवें मौजे मजकूर येथील शेत सर्वे नंबर आहेत ते खालीं लिहिल्या प्रमाणें:—

नं. ए. गु. आ. रु. हिस्सा वहितदार.

२ ०८३३ २ सालीम. सदु

१७ २२८३७ २६ ,, १ मावलाबाई मर्द पेमजी. व २ उमरखा. व सदु

२१ २१८३२ २३ सालीम. १ सदु व तुकाराम. २ उमरखा. व ३ सदर्हू.

१२७ १९८३२,२९ सालीम. १ कंबाजी राहणार निपाने. २ माहादु. ३ तुकाराम व भायलाई. ४ गणु वल्लद रामजी. ५ लक्ष्मण.

येणें प्रमाणें चार नंबरचें खातें असोन त्यांत वहितदार वर लिहिलेप्रमाणें जमिन वाहत आहत सदरहू तुकाराम मैत झाल्यामुळें सदर्हू नंबरचें खातें त्याची बायको माझी चुलती नामें राऊ मर्द तुकाराम याजकडेस असलेली जमिन माझी चुलती राऊ इचे वहितीस आली आहे.

२ माझा चुलता नामें तुकाराम यानें सदर्हू राऊ इजला औरसपुत्र नसल्यामुळें तिचे मरणानंतर तिचे जिनगीचा व स्थावर मिळकतीचा हिंदुधर्म शास्त्राप्रमाणें मी तिचा जवळचा पुतण्या असल्यामुळें खरा व कायदेशीर वारसदार आहे.

३ माझी चुलती राऊ इजला इतर लोकांनीं फंदफितूर देऊन तिचे जंगम व स्थावर जिनगीची अफरातफर करून टाकण्याचा विचार झाल्याचें मी ऐकल्यावरून सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं,

४ माझा चुलता तुकाराम यानें मौजे निपाने प्रगणे पिंपळगांव राजा ता० मलकापूर येथील जागा लांबी हात २२ रुंदी हात १६ यांत १५ खांबी धाबें होतें तें जळाल्यामुळें त्याचे बाजूस हल्लीं ध्यार धारणी छप्पर असून त्यांत माझी चुलती राऊ मर्द तुकाराम ही राहत आहे. ती जागा व सदर्हू वरील नंबरांपैकीं शेत सर्वे नंबर १२७ यांतील हिस्सा पुंनाजी वल्लद शिवाजी माळी राहणार वाघुड ता० मलकापूर यास विकला असून त्याचें खरेदीखत त्यानेंच करून दिलें आहे. तें फक्त मला कबूल आहे. त्या शिवाय आणखी कोणी माझी चुलती राऊ इजला फंदफितूर देऊन कांहीं दस्तऐवज माझे संमती शिवाय करून घेतील किंवा घेतले असतील ते मजला कबूल राहणार नाहींत. ज्यांना माझी चुलती नामें राऊ इजपासून दस्तऐवज करून घेणें असतील त्यांनीं माझी संमती किंवा माझा विचार घेतल्या शिवाय घेऊं नये. घेतल्यास तें कायद्या प्रमाणें रद्द केलें जाईल मग तुमचा कोणतेही प्रकारें मजवर दावा चालणार नाहीं. कळावें ता. १५ माहे नोवेंबर सन १९१० इ.

दस्तूर बाजीराव गोविंद देशपांडे आटणी राहणार बुलढाणें.

सही

सदु वल्लद विठोबा माळी पाटील राहणार निपाने ता० मलकापूर निशाणी हातची रेघ —

नो. नं. ण ९४ दस्तूर सदर्हू

---

## नोटीस

रा. रा. उत्तमराव शिवाजी देशमुख राहणार येवदें ता. दर्यापूर पो. येवदें यांस —

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते की लक्ष्मी मर्द गंगाराम देशमुख इचे तुह्मी मुखत्यार होता. ती मयत झाली तेव्हां तुह्मी तिची सर्व जिनगी आपल्या घरीं नेली आहे. दागदागीने, कर्जरोखे, गहाणखतें, हैस इत्यादि सर्व जिन्नस तुह्मी ही नोटीस पोचल्या तारखेपासून चार पंचांसमक्ष माझ्या हवालीं करावें आणि पावती घ्यावी. तुह्माला माझ्या मार्जी मुखत्याराची आतून फूस आहे आणि ह्मणूनच तुह्मी ही लबाडी आरंभली आहे. मी लक्ष्मीला करून दिलेला करारनामा तुह्मी दाबून ठेविला आहे. तुमच्या मुखत्यारपणाचा हिशोब तुह्मी द्यावा. तुह्मी आमच्या कुळांकडून परभारें स्वतःच्या नांवानें आमच्या जुन्या कर्जाबद्दल कर्जरोखे करून घेतले आहेत असें कळतें तर त्याबद्दलची सर्व शहानिशा पंचासमक्ष झाली पाहिजे. मी सुमारें १५ दिवस आणखी वाट पाहीन आणि तितक्या मुदतींत तुह्मी सर्व उलगडा केला नाहीं तर तुह्मावर फिर्याद करून सर्व खर्चासुद्धां सर्व हिशोब घेतला जाईल आणि लक्ष्मीला दिलेला करारनामा व सर्व इस्टेट हीं तुमच्या ताब्यांतून परत घेतली जाईल. कळावें ता. २८।११।१० इ.

सही

सोनाबाई मर्द गंगाराम देशमुख राहणार आंबोडें ता. आकोट हल्लीं वस्ती बोरगांव खुर्द ता. आकोला निशाणी आंगठा

नो. नं. ण ९५

---

## नोटीस.

नोटीस बेशमी ज्याम्या वल्लद सावज्या माहार रा० सांगळद ता० आकोला यांसः—

नोटीस देणार शिवराम वा देवल्या माहार रा० हिंगणी ता० आकोट जि० आकोला नोटीस देतो ऐसाजे माझी बहीण नामें सरू ही तुमची लग्नाची बायको असून लग्न झाल्यास सुमारें ९।१० वर्षे झालीं आहेत, ती शहाणी होऊन तीन वर्षें झालीं, तुह्मी तिजला नेलें नाहीं, व तिजला नेण्यास आले नाहीं तरी येऊन तिजला घेऊन जावें. व आपण माणसांत आहात अशी खात्री करून द्यावी, ती तुमचे घरीं येऊन संसार करण्यास कबूल आहे, तरी आपण ८ दिवसांत येऊन घेऊन जावें. आपण घेण्यास वरील मदतींत न आल्यास मग तिचें गंधर्व लाऊन द्यावें लागेल. व हीच फारकती समजली जाईल. मग तुमचा नवरेपणाचा हक्क तिजवर राहणार नाहीं. ही नोटीस दिली तारीख २५-११-१० इ.

दस्तर नारायण वामन

सही

शिवराम वा देवल्या माहार नि. खुद्द हातची असे

नो नं. ण ९६

---

## नोटीस

बेशमी— नारायण सालिग्राम गुजराथी नसबाला रा० हिवरखेड ता० आकोट यांसः—

खालीं सही करणाराकडून देण्यांत येते कीं मौजे हिंगणी बु. ता० अकोट येथील शेत सर्वे नं ९४ एकर गुंठे १४८३४ आकार ३२

९५ पैकीं १०८१८ १६।

या दोन शेतांचे बाबतींत तुमचे जवळ गहाणखत असल्याचें समजल्यावरून त्यावरून जी रक्कम असेल ती गेल्या वर्षी मनीराम चंदीदीन कनोजी ब्राह्मण सावकार रा० हिवरखेड याजपाशीं तुह्मास देण्या करितां ठेवलेली असून ती रक्कम मनीराम हा देण्यास दोन तीन वेळां तुमचेकडेस आला असून तुह्मी ती घेतली नाहीं. सबब ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत सदर्हू मनीराम याजपासून ती घेऊन जावी. तसें न केल्यास आमचेवर कोणतीच नुकसानीची जबाबदारी नाहीं. व सर्व लोकांस जाहीर कळविण्यांत येतें कीं कोणाचा कांहीं बोजा सदर्हू शेतीवर असल्यास ही जाहिरात नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत त्यांनीं सदर्हू मनीराम याजकडेस आपले दस्तैवज, वहीखातें वगैरे घेऊन जाऊन हिशोबानें रास्त रक्कम असेल ती घेऊन तुमचा हक्क आमचे नांवानें बेचन करून द्यावे. दिलेल्या जाहिराती प्रमाणें ज्याचे कडुन वर्तन होणार नाहीं त्याची कोणत्याच कर्जाची व नुकसानीची जबाबदारी आमचेवर राहणार नाहीं. कळावें. तारीख १ माहे डिसेंबर सन १९१० इ०

सही

बाजीराव सदाशीव पाटील तर्फे वहिवाटदार उत्तमराव काशीराव देशमुख राहणार मौजे गोवर्ध पोस्ट हिवरखेड ता० आकोट दस्तुर खुद.

नो० नं० ण ६०

---

## नोटीस

रा० रा० सुपडा वल्लद छगनदास तेली गुजराथी राहणार बऱ्हाणपूर राजपुरा (रा० लक्ष्मीप्रसाद शेट] नवघरवाले यांचे समोर जि० नेमाड यांसः—

खालीं सही करणार हिजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून २।३ वेळां सासरीं नांदण्यास आले. होते. हल्लीं सुमारें आठ वर्षें झालीं मी माहेरीं असून आतां मावशीच्या येथें राहिलें आहे. आईबाप कधींच वारले. भावाचें माझें बनत नाहीं. सबब मावशीच्या घरीं अजमासें सहा महिनें झाले राहणें भाग पडलें. तेथें अती हाल होतात. माझ्या अंगावर सुमारें १॥ शें रुपयांचे दागदागिने होते ते म्यां अन्नवस्त्रांत खर्च केले. आतां अन्नानें दिवस काढणें फार दुरापस्त झालें आहे. करितां ही नोटीस पावतांच १५ दिवसांचे मुदतींत मला खावटी वगैरे बद्दल झालेला खर्च दरसाल रुपये १०० प्रमाणें देणे आहे तो देऊन टाकण्यास ऐवज घेऊन येऊन मला न्यावें. मी आपल्या येथें नांदण्यास खुषी आहे. असें आपणास वाजवी दिसत नसल्यास हीच फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन. मग मजवर आपला नवरेपणाचा हक्क न राहता माझ्या पाटाचे नवऱ्यावर कोणत्याही प्रकारें तोशीस राहणार नाहीं. आपसांत वांकडें नसावें ह्मणून ही नोटीस दिली आहे. या नोटिशीचा आपणास खर्च द्यावा लागेल. या बाबतींत आपणास पंच मार्फत कळविण्यांतही आलें आहे. पण त्याप्रमाणें कांहीं तजवीज अमलांत झाल्यांचे दिसत नाहीं. कळावें. तारीख १-१२-१० इ०

सही

कुंदनबाई मर्द सुपडू तेली गुजराथी हल्लीं वस्ती जळगांव जामोद नि० खुद्द.

दस्तुर हरी वल्लद देवाजी माळी गु० जळगांव.

नो० नं० ण ६१

---

WANTED.— At once active agents everywhere to sell large consignments of American goods including watches &c. Salary Rs. 20 and 5 o/o commission. For particulars apply with one anna stamp o—

Hardinge + Co,
Merchants,
133. Canning street, Calcutta.

## सत्यमेव जयते.

( सत्यशोधक समाजाचे पुस्तकांची जाहिरात )

शास्त्री नारो बाबाजी महाघट सत्यशोधक समाजाचे प्रसिद्ध उपदेशक क्षत्रीय मराठे ह्यांनीं वेदाचे व शास्त्राचे व पुराणाचे व अनेक ग्रंथांचे आधारें लोकांचे कल्याणाकरितां हा ग्रंथ व पुस्तकें तयार केलीं आहेत.

वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धति भाग १० ग्रंथ एकच. पहिल्या भागांत सर्व पूजेचे मंत्र व दुसऱ्या भागांत वटसावित्रीचें व्रत, हरतालि, काव्रत, शमिपूजन, तुलसीविवाह, होळीपूजा, सोमवतीपूजा, शनिपूजेचा विधि, तीर्थप्रायश्चित्ताचा विधि, दिपवाळीचें लक्ष्मीपूजन, सर्वत्र देवाचे अभिषेक, सत्यनारायणाचे पूजेची माहिती, गंगापूजन वगैरे अनेक किरकोळ विधिची माहिती मंत्रासह दिली आहे. भाग ३ ऋतुशांती, उपनयन संस्कार (मुंजी) ची माहिती मंत्रासह भाग ४ यांत लग्नसंबंधीं ह्मणजे साक्षगंध, साखरपुडा, शालमुदि, देवकुंडी, साहित्यविडा, जन्माका, मंगलाष्टकें, सुलग्न, सतवर्णे कन्यादान, कंकणबंधन, लाजाहोम, प्रतिज्ञामंत्र, फळ (तांबूल) किंवा साडे, वगैरे प्रकारचे विधीची तपशीलवार वेदोक्तमंत्रासह माहिती दिली आहे. भाग ५ देवपूजेचे वेदोक्तमंत्र, पुरुषसुक्त, ब्रह्मयज्ञ (संध्या) नित्यकर्माकरितां अग्निहोत्र. भाग ६ यांत यज्ञविधीची संपूर्ण माहिती, वास्तुशांति, ईश्वरप्रार्थना, स्वस्तिवाचन, शान्तिपाठ, वगैरे वेदोक्त मंत्रासहित विधी दर्शविला आहे. भाग ७ यांत अंत्येष्टिकर्म (मृतसंस्कार), श्राद्ध दशक्रिया दाहा दिवसांच्या दाहा क्रिया, अकरा व तेरा दिवसाची क्रिया ह्या सर्वत्र कर्मांची मंत्रासह तपशीलवार माहिती दिली आहे. भाग ८ यांत जोतिषासंबंधीं संपूर्ण माहिती उदाहरणासह दिली आहे. भाग ९ यांत सर्व देवांच्या आरत्या व समाजीयन मंडळींनीं केलेलीं पदें. भाग १० सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें, समाजाचे नियम. पुस्तकांची जाहिरात. अत्यंत महत्वाची दुसरी जाहिरात, ईश्वरप्रार्थनापर पदें. आरत्या व पदें याप्रमाणें एकंदर माहिती देऊन दहा भाग पुरे केले आहेत. हा ग्रंथ प्रत्येकानें संग्रहीं ठेविला असतां हव्यकव्य कर्म करण्यासंबंधी ब्राह्मणेतर वर्गास कोणत्याही पुस्तकांची जरूर पडणार नाहीं. वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धती भाग दहा व हिंदुधर्माचें खरें ज्ञान, ब्राह्मणांचा हक्क कांहीं नाहीं अशा बद्दल हायकोर्टांत झालेले ठराव, वादीचे अर्जाचे नकलेसह, इशारा श्रीजोती गोविंदराव फुलेकृत, ब्राह्मणेतर बंधूस प्रार्थना, मराठा शिक्षण परिषदेचा पोवाडा, देशीचळवळीचा पोवाडा, श्री० सयाजीराव महाराजांचा पोवाडा, राष्ट्रीय सभेचा पोवाडा, भीमराव महामुनिकृत सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें व सत्यशोधक समाजाचे नियम, व प्रतिज्ञापत्र, व उत्तम ग्लेझ कार्डावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र, हीं सर्व रंगीबेरंगी छापलेलीं असून प्रत्येकानें आरशांत जडून लावण्यासारखीं आहेत. व संग्रहीं कायमचीं ठेवण्यासारखीं आहेत' अशीं एकंदर सात पुस्तकें व तीन रंगीबेरंगी फार्म, व उत्तम कागदावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र; अशीं एकंदर तीन रुपये किंमतीस मिळतील. रोख पैसे पाठविले असतां किंवा व्ही. पी. नें मागविलीं असतां खालीं लिहिलेल्या पत्यावर मिळतील. पोष्ट खर्च निराळा पडेल.

### सुगंधित धूप

नित्य संध्या समयीं होम, हवन करण्यास अथवा पूजा, पाठ करण्याचे वेळीं अत्यंत [illegible] व हरतऱ्हेचीं औषधें मिश्र केलेलीं असून तो थोडा विस्तवावर टाकिला ह्मणजे उत्तम प्रकारचा सुगंध सुटतो. यामुळें दुर्गंधीत विषारी हवेचा नाश होऊन उत्तम हवा प्राप्त होते. ज्या घरामध्यें ईश्वरीय वेद विद्येचें नियमानें नित्य जपहोमादी पठण होतें त्या ठिकाणीं कलह, वैर, प्लेग, व्याधीरोग, अकालमृत्यू इत्यादी आपत्ती येऊं शकत नाहींत. हा धूप दर शेरास दीड रुपाया प्रमाणें मिळेल.

सत्यशोधक समाज ऑफिस

पोष्ट हिवरखेड रूपरावाचे ता० आकोट

नो. नं. ड ७९ जि० आकोला प्रांत वऱ्हाड

---

## विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार– खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणानें डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ८६ अण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग. मुंबई.

---

## ब्रह्मसिद्धांतमाला

अथवा

### वेदांताचें युक्लीड.

रा. खंडो कृष्ण उर्फ बाबा गर्देकृत हा अपूर्व ग्रंथ अगदीं सरळ सोप्या मराठी भाषेंत युक्लीड धर्तीवर लिहिला आहे या ग्रंथाचा लक्ष्यपूर्वक अभ्यास केला असतां ब्रह्मविद्येचीं तत्वें मनामध्यें चांगलीं ठसून वेदांतावरील कोणत्याही पुस्तकाचें मर्म तत्काळच समजेल. प्रकरणें १३, पृष्ठसंख्या ३४६, स्वदेशी मोहरेदार कागद, टाइप मोठा व ठळक, छपाई व बांधणी सुबक, किंमत १॥ टपाल हांसल निराळें पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें–

१ किर्लोस्करबंधु, किर्लोस्करवाडी, पो० कुंडल

२ म्यानेजर, श्रीरामतत्त्वप्रकाश प्रेस, बेळगांव.

नो० नं० प २९

---

# जेंव्हां डाक्टर व वैद्य यांची हीनिराशाहोत, तेंव्हां सुद्धा

मुख संचारक कंपनी मथुरा यांच्या

# सुधासिंधु

पासून गुण येण्याची आशा राहतेच. कारण २० वर्षां पासून, लाखों मनुष्या कडून याची परिक्षा झाली आहे. दर्याव वर्तमान पत्राच्यां संपादकांनी व डाक्टरांनी, या बद्दल सार्टीफिकिटें दिलीं आहेत. सरकारांतून ही या औषधाची रजिष्टरी झाली आहे. या औषधानें कफ, खोकला, दम, हींवताप, पटकी (काळरा) शूल, संग्रहणी, आंव, अतीसार, पोट दुखी, वात्या, मळमळ, हांत पाय व कंबर दुखणें, संधिवात लहान मुलांचे हिरवे पिवळे जुळाब, आणि खोकला सर्वांस गुण येतो किंमत प्रत्येक बाटलीस -॥- आणे. सर्व औषधें विकणारां जवळ मिळतें. बहुत करून प्रत्येक शहरांत आमचे एजंट आहेत च; प्रथम तेथें च शोध करावे जर न मिळेल तर आमचे कडून मागवावे. चालू वर्षांच पंचांग लवील फुकट मिळेल लहान गावात ही एजंट पाहिजेत; नियम मागवून पहावे

मांगविण्याचा पत्ताः—

क्षेत्रपाल शर्मा मालक

सुख संचारक कंपनी मथुरा

---

## जाहिरात

ऑईल एंजीन. पंप, दळण्यांचीं यंत्रें, तेलाचे घाणे, कापूस वटवण्याचे रेचे ह्मणजे जिन, इत्यादि संबंधीं कोणतीही माहीती पाहिजे असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

दिवाकर यशवंत फाटक.

मेसर्स डेकन स्टेशन कंपनींतील ऑईल एंजिन एक्सपर्ट (फील्डींग),

नो. नं. ड ८० उमरावती.

---

### गुण न आल्यास पैसे परत !

ठिकठिकाणीं एजंट पाहिजेत ! !

इच्छितांनीं पत्रव्यवहार करावा.

॥ ॐनमो श्रीवीतरागाय ॥

### स्वदेशी अमृताचा नवीन शोध.

## जायफलार्कमधु.

प्राचीनकाळच्या एका जुन्या लेखावरून वरील औषधाचा शोध अत्यंत कष्टानें लागला आहे. कर्नाटक प्रांतांतील कणतगुड्ड नांवाच्या वनस्पतीप्रसिद्ध पर्वतांत कांहीं वैद्यमंडळीच्या शोधानें ही वनस्पती ह्मणजे झाडपाला क्वचित् क्वचित् मिळाली आहे या वनस्पतींच्या रसांत जायफळाचा रसार्क मिश्र करून हा "जायफलार्कमधु" यंत्र साह्यानें तयार केला आहे. हा मधु किंचित् पातळ असून खाण्यास अमृताप्रमाणें गोड वसुवासिक आहे. हा मधु खात गेल्यास प्राप्त होणारे गुण सदरहू जुन्या ग्रंथांत लिहिले आहेत ते फार वेळ टिकणारी कामस्थिती अनुभवास येते. हा मधु खाल्यानंतर एक दोन दिवसांतच गुणांश समजूं लागतो. जननेंद्रियांतील गेलेली शक्ती पाहिल्यापेक्षां अंशमानानें अधिक वाढते. शरीरपिंड मजबूत आणि कांतीयुक्त होतो रंग, गाल व शरीरावयव मांसल होतात. क्षयानें अगर कोणत्याही रोगानें मनुष्यास आलेली प्रेतवत् कळा तीस दिवसांत जाऊन अंगावरील सर्व शिरा भरतात व मनुष्य रक्तमांसानें भरतो, शौचास साफ होऊन भूक चांगली कडकडून लागते हा दाखला पहिले दिवशींच पडतो. एका सप्तकांतच शरिराचें वजन वाढूं लागतें. पर्मा व गर्मी यांनीं दूषित झालेलें शरीर निर्दोष होतें. मदोन्मत्तता येते. या औषधास पथ्य नाहीं कामविकार द्विगुणित होतो. नवा रोग असल्यास १० दिवस पुरणाऱ्या एका बाटलीनें गुण येतो. व जुना रोग असल्यास ३ बाटल्यांनीं गुण येतो. १ बाटलीची किंमत १ रुपया. दोन बाटल्यांस १८१४, तीन बाटल्यांस २८१० दोन अगर तीन बाटल्या एकाच पार्सलांत भरून पाठवूं; ह्मणजे टपालखर्च जास्त पडणार नाहीं. टपाल खर्च वेगळा पडेल. कार्ड पाठवून आर्डर दिल्यास व्ही० पी० नें पाठवूं.

पत्ताः—सेक्रेटरी मेसर्स.

एम्. जी. आर.

नो. नं. ड ९३. श्रीजिनेंद्रप्रासादिक कंपनी,

हेड ऑफिस पोष्ट निपाणी. जि. बेळगांव

---

सूचना —कोणताही माल गुणकारी ठरला ह्मणजे जिकडे तिकडे त्याची नक्कल सुरू होते. परंतु नांवाप्रमाणें गुणास पात्र होत नाहीं. अमचे येथें नकली औषधाचे कारखानेदार नुकतेच डोकें वर करूं लागले आहेत तरी आमच्या ग्राहकांनीं आमचा ट्रेडमार्क व सीलबंद तपासून घेणें.

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाइसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांचे होम सर्जन असिस्टंट सर्जन अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी आमच्या औषधे नारिक हर्डे वर्तमानपत्रांतुन ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्यहून आमची औषधे रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट अझ्झास दिलें आहे. हे अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण इंमानांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णगुणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्यस्तंभक,<br>
रक्तशोधक, मनोल्हासक कांति व बुद्धिवर्धक सुवर्ण माक्षीक<br>
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जो धातु तो शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें तो दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरुपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदां तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हे अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य इतर धातुपात उष्णतेनें इंद्रियशिथिलता, कडकी. गर्मीसंबंधीं सुरलेले विकोप मुत्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय प्रमांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडुरोग मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याध. वातरोग, निद्रानाश पित्तावर. बाळंतरोग, मधुमेह जनाट परमा, मुष्टमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त यांची शुद्ध वृद्धी, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचूं लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यास पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपानखर्डे सोबत किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील.

दरः—एकदम २५ गो० १ रु०, ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १९५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः—यानें वडस. साहा, फुल, खुपऱ्या. बिंदु, कांच इत्यादि डोळ्याचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. २॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा लिडीक मुत्राची लाली, संकोच पुत्साव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नपता सात दिवसांत जातात लिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें मिळत नाहीं. बा० किं० १॥ चार बाटलीस रु० ५

३ दंतबलवर्धक पूडः—दंत संबंधीं सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें मुल्य ३ तो० ८ आणे

६ गजकर्ण—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ट. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः—औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नाहींत. १० पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधान हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनो संग्रहीं तापावर गोळ्या, गाठीस मलम, वात चढू नये म्हणून मातावर मात्रा ठेवून वाचा. एकवार अनुभव पहावा णाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवू औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म खाक, गुटीका, आसवे, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोगिनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाचो निदान चिकित्सा कळवूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक जाहिरात पुरस्कृत करून जो तो पुढें यऊं पहात आहे.

आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळे एकानें जो धंदा पुढें केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावा आमचे जाहितीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून अमच्या आंग्लिश वगैरे मासिकांतून तो पुर्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक यांची आम्हास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपला धोरणी व्यवसाय ज्याचा तो स्वतंत्र आहे आम्हास ग्राहकांस सुचविणें इष्ट कीं ज्यांचा कारखाना आज सतत १५।२० वर्षें अव्याहत सुरू असून ज्याच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें. ज्यांच्या औषधांनें कित्येकांची ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणलें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटपटीं यशहि बरेंच आलें आहे, करितां सकळ आर्यबंधुस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरावीं, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागणें तीं खालील पत्त्यावर बिनचूक मागवावी म्हणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.**

---


ORIENTAL GOVERNMENT

# LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED IN 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

Head—Quarters—Nagpur C. P.

## FUNDS EXCEED THREE CRORES AND FORTY SEVEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating heir clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others employing portion of their annual income or profits in effecting life policies create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT.

Nagpur


---


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४४ ] आकोला—सोमवार तारीख १२ माहे दिसेंबर सन १९१० इ० [ अंक ४६



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिसींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील त्यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडलें.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्य नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।१२।०९ } एजंट
नं ७३

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ ३/३ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
आकोला २१.९.१०} एजंट.

### NOTICE.

D. Y. Phatak oil-engine expert for Fielding oil engines (as supplied by Messrs. Duncan Stratton and Co. of Bombay) can be consulted as to the purchase condition and value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:- C/o N. G. Ketkar Esq.
Pleader
Amraoti.

No. N. Dh. 81

## त्वरा करा त्वरा करा.

अशी संधी पुन्हां यणार नाहीं.

महा घड्याळें घेणारास



एक घड्याळ बक्षीस.

दरएकची कि ३। रु.

पोष्ट खर्च माफ.

**उत्तम प्रकारचे इमिटेशन रास्कोप सिस्टिम**

नांवचे खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा हणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान,

मिळण्याचा पत्ता
खोजा वल्लीभाई इस्माल
मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं. ण ४१

WANTED.— At once active agents everywhere to sell large consignments of American goods including watches &c. Salary Rs. 20 and 5 o/o commission. For particulars apply with one anna stamp :o—

Hardinge + Co,
Merchants,
133. Canning street, Calcutta.


### नोटीस

रा० रा० रामचंद्र पुंजाजी पाटील मोकदम राहणार कौलखेड जहागीर ता० आकोला यांस—

खालीं सही करणार यशवंता वल्लद रामजी पाटील राहणार सेलू तालुका मुर्तीजापूर तर्फे मुखत्यार तुकाराम भिमजी याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझे मालकानें तुह्मास शेती खरेदी देण्याबद्दल सवदा केला आहे. करितां तुह्मास नोटीसीनें जाहिर करण्यांत येतें कीं आह्मास पैशाची तूर्त फार जरूरी आहे तरी ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत तुह्मी आमचे गांवीं येऊन आह्मांस रुपये देऊन शेतीचें खरीदीखत करून घेऊन जावें आह्मी काळी जमीन ताब्यांत देण्यास तयार आहोंत तरी या प्रमाणें करण्यास चुकूं नये कळावें ता. ८-१२-१०

सही
यशवंता वल्लद रामजी पाटील तर्फे
मु० तुकाराम भिमाजी पाटील
नो. नं. ण ७० द खु

### नोटीस,

विद्यमान सब जज साहेब बहादूर आकोलें यांचे कोर्ट.

कि० दि० मो० नं० ८ सन १९१०

सक्सेशन सर्टिफिकेट मिळविण्याचा अर्ज.

रुख्याबाई जवजे पुतळया वारकरी रा० कांजा ता० मुर्तीजापूर. अर्जदार वादी.

सर्वत्र लोकास कळविण्यांत येतें कीं अर्जदार यानें सॅक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल दिला अर्ज आमचे कोर्टांत ता० १९।१२।१० रोजीं नेमिला आहे. त्या तरखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यांनीं सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हजर व्हावें तसें न केल्यास पुढें कोण त्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें. ता० ८।१२।१० इ०

M. C, Tivary.
सबजज
आकोला.

नो० नं० ण ७१

### सर जॉन ह्यूएट यांचें भाषण.

—०*०—

अलहाबाद येथें औद्योगिक प्रदर्शन उघडण्याचे प्रसंगीं त्या प्रांताचे अधिपति सर जॉन ह्यूएट यांनीं केलेलें भाषण अनेक प्रकारें विचारणीय होतें. त्यांनीं वर्णिलेली प्रदर्शनाची महती व विशेषतः अलहाबादच्या प्रदर्शनांत शिक्षण-विषयक ठेविलेला भाग व त्यांपासून होणारा उपयोग यांच्या संबंधानें कोणाचाही मतभेद असेल असें आह्मांस वाटत नाहीं. त्याचप्रमाणें सध्यांच्या काळीं हिंदुस्थानची उन्नति शेतकी, उद्योग-धंदे, व्यापार वगैरे दिशांनीं होणें अत्यंत अवश्य आहे. या विषयींही वाद नाहीं पण व्यापारी, कारागीर, व शेतकरी एवढेच काय ते देशाचे हितकर्ते व देशाच्या राजकीय स्थिती बद्दल विचार करणार ते व्यर्थ काथ्याकूट करणारे होत, हिंदुस्थानाला सध्यां राजकीय विषयाच्या चर्चेची आवश्यकताच नाहीं असें जें सदर प्रांताधिपतींनीं सांगितलें, त्याला मात्र विचारी लोकांकडून संमति मिळेल असें आह्मांस वाटत नाहीं राष्ट्राच्या सुधारणेच्या अगदीं पायरीवर राजकीय चर्चेला सुरुवात व्हावयास पाहिजे असा निर्बंध कोणत्याही देशा संबंधानें कोणत्याही काळीं घालून देतां येणार नाहीं. समाजाच्या उन्नती बरोबरच राजकारणाचीही उन्नती झालेली आहे. इतकेंच नव्हे, तर समाज जसजसा औद्योगिक बाबतींत पुढें पुढें पाऊल टाकीत जाईल त्या मानानें राजकारण अधिक घोटाळ्याचें व बिकट होऊन बसेल, असा नियम आहे. हिंदुस्थान या नियमाला अपवाद नाहीं हिंदुस्थान हा देश एका काळीं राजकीय, औद्योगिक, धार्मिक, सर्व दृष्टीनें इतर राष्ट्रांच्या फार पुढें होता त्या देशाला हल्लींच्या सारखी विपन्नावस्था कशानें आली व तींतून वर डोकें काढण्या साठीं त्यानें काय केलें पाहिजे या प्रश्नाचा विचार जर तेथील लोकांनीं करावयाचा नाहीं तर करावयाचा कोणी ? पण सर जान ह्यूएट साहेब व त्यांच्या मताचे ॲंग्लोइंडियन अधिकारि या अत्यंत महत्वाच्या प्रश्नाचा बागुलबोवा पुढे उभा करून त्याच्या पासून दूर पळण्यास हिंदुस्थानच्या लोकांस सांगत आहेत आणि उद्योगधंद्यांत व व्यापारी शिक्षणांत तुमी आपल्या बुद्धीचा प्रभाव दाखवा, राजकारणांत तिला ढवळाढवळ करू देऊं नका, असें गंभीरपणें सांगत आहेत ! राजकारणांत न पडण्या विषयीं शाळेंतल्या मुलांना जो कडक निर्बंध घालण्याचे प्रयत्न चालले आहेत त्यांना आमची पूर्ण संमति आहे; पण हिंदुस्थानचे सुशिक्षित पुढारीसुद्धां शाळेंतील मुलां इतकेच अपरिपक्व बुद्धीचे व नादान आहेत अशी जर सर जॅान ह्यूयेट यांची समजूत असेल तर तो त्यांचा भ्रम युक्तिवादानें दूर करणें हें आह्मी आमचें कर्तव्य समजतों.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— हवा रुक्ष असून चांगली आराग्यदायक आहे. थंडीचें मान कमी असल्या मुळें धुकें व दवाची वृष्टी हीं रब्बीच्या पीकाल्या चांगलीशी मिळत नाहीं.

पीकपाणी— जवारीचें पीक रुपयांत आठ पासून १० आणे पर्यंत असून कपाशीचें पीक देखील तितकेंच कमी आहे पण भावानें जोर बरा दिला.

प्लेग— उमरावतीला प्लेगाचे मृत्यु दर रोज १०।१२ पर्यंत मंदावले आहेत. संग्रूळ दस्तगीर व वीस लहान खेडीं प्लेगा व्यापत चाललीं आहेत. यवतमाळास प्लेग वाढत असून जिल्ह्यांतील ६ खेडीं प्लेगानें ग्रासलीं आहेत आमच्या जिल्ह्यांतील कारंजा व आणखी १९ खेडीं तसेंच बुलढाणा जिल्ह्यांतील मलकापूर, चिखली, नांदुरा जळगाव व २७ खेडीं प्लेगानें कमजोर जर्जर आहेत.

प्लेगाच्या देवी— स्थानत्यागाचा उपाय ज्यांस साध्य नसेल त्यांनीं देवी काढण्याचा उपाय अवश्य करावा. हा उपाय प्लेग प्रतिबंधक रामबाण आहे असें तज्ज्ञ लोक सांगतात आणि ह्मणूनच मेजर ग्लेडन साहेब आपल्या दवऱ्यामध्यें लोकांस या संबंधी आग्रहानें उपदेश करीत आहेत.

सर्कस— प्रोफेसर परशरामराव चल्ला कोळगोल राहणार तासगाव–दक्षिण महाराष्ट्र याची सरकस येथें आली आहे. ४ सिंह, २ वाघ, १ हत्ती, १० घोडे, उंट, माकडें कुत्रे वगैरे जनावरांचे खेळ फार प्रेक्षणीय आहेत. झोल्याचीं कामें, बायासिकल वरील कसरत, पैलवानी इत्यादि प्रकार चित्तवेधक होतात. शिकारखाना पाहून देखील करमणूक चांगली होते.

१ या शिवाय बनारस येथें कामाचे | त्याग करोत, माझा जगाशीं असलेला संबंध | भीष्माचार्यांनीं आजन्म ब्रह्मचर्य पतकरलें

## वणी येथील कुलस्त्रियांची हुरडा पार्टी,

( लिहून आलेला मजकूर. )

वणी येथील सुप्रसिद्ध गृहस्थ रावसाहेब ठ्ठल पुरुषोत्तम पुराणिक, स्पेशल मॅजि- ट, यांच्या धर्मपत्नि सौभाग्यवति चंद्रभागा ई यांनीं रविवारीं ता. ४ दिसेंबर रोजीं, वांतील बहुतेक कुलस्त्रियांना हुर्डा पार्टी ली. स्त्रियांची संख्या शंभरावर असेल. पार्टी वणी जवळच चिखलगांव नांवाचें ई आहे तेथें झाली. सकाळीं बाईनीं पल्या सुनेला पाठऊन घरोघर आमंत्रणें लीत. रावसाहेबांनीं प्रत्येक कुटुंबांतील याकरितां गाडीबैलांचीही व्यवस्था केली ी. चिखलगांव येथें कुणब्याधुणव्याच्या --४० झोंपड्या आहेत. अर्थात् इतक्या या स्त्रीसमुदायाची तेथील कोणत्याही र्डींत सोय होणें अशक्यच होतें; ह्मणून साहेबांनीं त्यांच्या करितां एक सुंदर प स्वच्छ जागेंत उभारला होता. संध्या- ळीं ९ वाजण्याचे सुमारास बहुतेक या आल्या. सौ. चंद्रभागा बाईनीं त्यांचा ाचारा प्रमाणें आदरसत्कार केला. हुरडा खाण्यास सुरुवात झाली. ाही उत्तमापैकीं होता प्रथमतः बेत सुधाच आहे असें वाटलें; कारण हुरडा ा तीळगूळ यांच्या पलीकडे कांहीं नाहीं त्यांस वाटलें. बायकांनीं समोर आलेला हुरडा चट केला. घरांत ९--१० सें असलीं ह्मणजे त्यापैकीं एकाद अधाशीही असतो. इतक्या बायकांतून ोंजणी तशा असतील तर त्यांत कांहीं नाहीं. खाणें संपल्यावर प्रत्येक बाईला लागलें कीं, आतां हुरडा संपला कांहींशा निराशेनेंच ह्मटलें तरी चालेल, ास लागल्या. त्यपैकीं कांहीं अधीर कांनीं असा देखील उद्गार काढिला ाय मेला हा भिकार हुरडा! दहीं तर नाहीं; नुसत्या चटण्याला देखील ा कां आह्मी होतों "? एकीनें तर असें ह्मटलें सें जर मला पुर्वीं माहीत असतें तर मी बाई आले हा कोरडा हुरडा फाका- " अशी कुजबुज चालली तेव्हां चंद्रभागा बाईनीं त्यांस ह्मटलें कीं ांत कंटाळूं नका. हुरडा अद्यापि संपला नंतर त्यांनीं स्वतः तयार ा एक एक पदार्थ येण्यास सुरुवात . हुरड्याचा शिरा [ गोड ] हुरड्या- तिखटमिठाचा शिरा, हुरड्याचे लाडू, ाचीं बोंडें वगैरे जितके पदार्थ हुर- े करणें शक्य होतें तितके सौ. चंद्र- बाईनीं तयार करून टेवलेलेच होते. काय पुसतां. ह्या बहुविध पदार्थांची रेलचेल झाली तशी ते पाहून स्त्रियांची प्रफुल्लित झाली व पुनः मोठ्या आनं- आश्चर्य चकित होऊन सौ. चंद्रभागा ो एकमेकींशीं प्रशंसा करूं लागल्या. ज्यांनीं निराशेचे उद्गार काढिले होते तर आपल्या मानाच लज्जेनें खालीं या. " भिकार हुरडा " याचे जागीं मंती हुरडा " पानावर येऊन पड- मग त्या एकंदर स्त्रीसमुदायाच्या आनं- काय विचारतां ! सर्वांचें यथास्थित [ वास्तविक ह्मटलें असतां तें भोजनच झाल्यावर पानसुपारी वगैरे देऊन चंद्रभागा बाईनीं त्यांची बिदागी केली. यांचे सौजन्य--आदरातिथ्य आणि चांगुलपणा पाहून त्या स्त्रीगणास त्यांचें कौतुक वाटलें असेल यांत नवल काय ?

वणी हा गांव साधारण मोठा असून येथें ब्राह्मणांची वस्ती बरीच आहे या पैकीं इनामदार व साहुकार मंडळी असून श्रीमंतही बरेच आहेत. परंतु त्यांपैकीं बहुतक किंबहुना सर्वच ह्मटलें तरी चालेल, जुन्या मतांचे आहेत. त्यांचे आचारविचार जुन्या पंथाचे असल्यास ते स्वाभाविकच होत. अशा ठिकाणीं पुरुषांमध्यें देखील या तऱ्हेच्या पार्ट्या [ हा शद्ब जरी इंग्रजी आहे तरी नेहमींच्या परिपाठामुळें त्याचा अर्थ आबाल- वृद्धांस माहीत आहे ह्मणून ताच येथें वापरला आहे ) क्वचित् होतात मग स्त्रि- यांमध्यें त्या होण्याची गोष्टच नको. असें असूनही रावसाहेब पुराणिक आणि त्यांच्या पत्नींनीं अशी पार्टी येथील कुलस्त्रियांना देण्याचें मनांत योजून त्या प्रमाणें ती गोष्ट घडवून आणिली त्या बद्दल त्यांचें अभिन- दन करणें अगदीं रास्त आहे रावसाहेब पुराणिक हे श्रीमंत असून सुशिक्षित आहेत. इंग्रजी भाषेंतही यांचें प्रावीण्य आहे आपल्या कडील स्त्रियांना गृहकामांत किती परिश्रम करावे लागतात. व त्या संसारांत रात्रं- दिवस कशा मग्न असतात. अशा स्थितींत त्यांना त्या संसार विवंचनेंतून, मग थोड्या- शा कालांतरानें कां होईना, घटकाभर दूर करून त्यांस आनंद व करमणूक होईल अशी योजना करणें किती इष्ट आहे हें जाणून रावसाहेब पुराणिक यांनीं ह्या पार्टीची योजना केली व आपले मनाचा मोठेपणा व्यक्त केला यांत कांहीं संशय नाहीं. या बाबतींत त्यांच्या इतकेंच किंबहुना जास्त श्रेय त्यांच्या धर्म पत्नी सौ० चंद्रभागाबाई यांस दिलें पाहिजे. कारण बाई मुळेंच हा प्रसंग मुख्यत्वेंकरून घडून आला. सदर्हू स्त्रीसमाजांत ब्राह्मणेतर स्त्रियाही बऱ्याच होत्या. सामाजिक दृष्टीनें असली पार्टी होणें किती महत्वाचें आहे हें सांगणें नको. एकंदर झालेल्या प्रकारावरून सौ० चंद्राभागा बाईचें सर्व वर्तन अनुकरण करण्या सारखें आहे.

---

## आर्यजननीचे कन्या आणि पुत्रसंघ,

(मागील अंगावरून पुढें चालू)

ज्यास आपण सुधारलेले लोक समजतों त्यांचे ठिकाणीं ही अशा तऱ्हेच्या संकुचित विचाराचे लोक आढळून येतात, परंतु ते तांदुळांतील खड्याप्रमाणें आहेत. त्यांचें ह्मणणें अथवा त्यांचीं मतें सत्याचे कसोटीस लागणारीं नसतात ह्मणून त्याची विशेष चिंता बाळगण्याचें कारण नाहीं. स्वार्थबुद्धीनें उत्पन्न झालेला राष्ट्राभिमान, व धर्माभिमान हा फार वेळ टिकणारा नसतो, त्याचें कारण नाहींसें होताच त्याचे बरोबर तदु- त्पन्न अभिमान व प्रयत्नही नाहींसा होतो. या सिद्धांताचे पुष्ट्यर्थ आपले देशांत अनेक उदाहरणें प्रत्यही दृष्टीस येत आहेत. आ- पला संबंध ज्या स्वातंत्र्य प्रिय राष्ट्रांशीं ईश्वरकृपेनें आला आहे त्याचा उपयोग करून घेणें. आपला कल विशेषेंकरून अध्यात्मविद्येकडे आहे इत्यादि गोष्टी अक्षरशः खऱ्या आहेत, परंतु जो धर्म सम्यक व राष्ट्र परिस्थितीस सोडून राहील, व जी अध्यात्मविद्या व्यवहारांत प्रकाशित होणार नाहीं, ज्या विद्येपासून विश्वकुटुंबत्वाची कल्पना वाढून आपण व्यक्ति या नात्यानें एका एक अवयव आहों असें समजणार नाहीं, व आपली या विश्वांतील जबाबदारी कळ- णार नाहीं तर आपण ज्यास धर्म ह्मणतों तो धर्म नव्हे. व ज्यास अध्यात्मविद्या ह्मणतो ती अध्यात्मविद्या नव्हे. माझ्या मतें अशा एकतर्फी धार्मीक मनुष्यापेक्षां व एक तर्फी तत्त्वज्ञान्या पक्षां नास्तीक व खावें, प्यावें, चैन करावी असें ह्मणणारा चार्वाक हे श्रेष्ठ आहेत. आपला ज्या लोकांशीं राजकीय औद्यगीक व सामाजिक संबंध आला आहे त्या लोकांचे सान्निध्यानें आपणास शिकण्या सारिख्या अनेक गोष्टी आहेत. ते स्वातंत्रता अत्यंत प्रिय मानितात. तसेंच त्यांस स्वात- न्त्र्याचें जसें प्रेम आहे तशीच ती स्वतंत्रता दुसऱ्यास असावी अशी त्यांची इच्छा असते ही गोष्ट ऐतिहासीक अनेक अनेक उदाहर- णानें सिद्ध करता येईल. परंतु आपण या उच्च देणगीस पात्र आहोंत हें आपले क्रियेनें दाखविलें पाहिजे. अंतःकरणांत लोकसेवा करावी असें आहे, परंतु लोक- सेवेची दिशा माहित नसल्या कारणानें हातून गैरसमजानें व अज्ञानानें अनन्वीत व राष्ट्रशांतता भंग होण्यासारखीं, संस्थापीत राजसत्तेस विघातक अशीं कृत्यें घडलीं जाऊं नयेत; इतक्या करितां संघाची स्थापना आहे व या संस्थेस ज्या प्रमाणें मोठमोठ्या श्रीमान व विद्वान प्रजाजनाची सहानुभूति आहे, त्या प्रमाणें मोठमोठे संस्थानिक व अत्यंत थोर पदवींचे सरकारी कामगारांची पूर्ण सहानुभूति व मदत आहे. संस्था स्थापन झाल्या नंतर आपले अत्यंत लोक- प्रिय व उदारमतवादी, शांत व धीर लॉर्ड मिंटो यांनीं संघाचे अध्यक्षास पत्र लिहिलें आहे तें असें:– Sons of India vol 1, No .4 पान १ यावरून समजून येईल कीं सर- कारी मोठमोठे जबाबदार अधिकारी गव्हर्नर जनरल, व बहुतेक सर्व इलाख्यांचे गव्हर्न- राची संघाबद्दल पूर्ण सहानुभूति आहे. यां पैकीं मद्रासचे गव्हर्नर हे संघाचे पुरस्कर्ते व संरक्षक आहेत. या शिवाय संस्थानिकां पैकीं म्हैसोर, बडोदा वगैरे ठिकाणचे संस्था- निक संरक्षक आहेत व त्यांचे दिवाण सुप्रसिद्ध कौन्सिलचे सभासद आहेत. कांहीं सरकारी अधिकारी अद्याप या संस्थेबद्दल उदासीन आहेत. तसें त्यांचें उदासीन राहणें नाहींसें करून त्यांची पूर्ण सहानुभूति मिळविणें सर्वस्वी संघांतील सभासदावर अवलंबून आहे. शंभर दुर्गुणी मुलांपेक्षां एक सद्गुणी पुत्र चांगला. त्याप्रमाणें संघांत येणाऱ्या सभासदाचें वर्तन नैतीक दृष्टीनें शुद्ध असून त्यांचे अतःकरणांत उदारपणाचा राष्ट्राभिमान जागृत असला पाहिजे. पूर्वी सांगितले प्रमाणें स्वतःचे राष्ट्रावर प्रेम ह्मणजे दुसऱ्या राष्ट्राबद्दल अप्रीति अथवा द्वेष मात्र नव्हे. खरोखर अशाच तऱ्हेचे संघ पृथ्वी- वरील प्रत्येक देशांत होऊन त्यांचें एक मुख्य कौन्सिल राहील तर किती चांगलें होईल! पृथ्वीवर दिसणारें दुःख हें केवळ अज्ञात अशा कारणानेंच फल नाहीं, तर त्यांतील बरींच दुःखें मनुष्यप्रयत्नानें ना- हींशीं होऊन स्वर्गसुखाचा अंशतः तरी अनुभव खचीत मिळेल. ता. १७ मे १९०९- च्या सन्स ऑफ इंडिया मासीक पुस्तकांत माझे मित्र रा. रा. नारायण गणेश परांजपे यांनीं "अनाथ मित्र मंडळ" यावर एक निबंध लिहून आपण ज्या मोहाल्यांत, ज्या शहरांत, व प्रांतांत राहतों तेथील दुःखाचा नायनाट करण्याचे कांहीं उपाय सुचविले आहेत. ते प्रत्येकानें वाचावे अशी मी शिफारस करितों. ' मनुष्य आणि जनावर या मध्यें मुख्य भेद, मनुष्यकोटींत बुद्धि- पुरःसर स्वार्थत्याग आहे तसा तो पशुमध्यें नाहीं ' हा स्वार्थत्याग मनुष्यामध्यें त्यांच्या त्यांच्या आत्मोन्नत स्थितीवर अवलंबून आहे. एकाचा स्वार्थत्याग स्वतःचे शरीरसुखा पुरता व दुसऱ्याचा स्वार्थत्याग हा स्वशरीर, मन, व सर्व स्वधन विश्वाचे सुखा करितां आहे. या दोन स्थितींमध्यें विश्वांतील सर्व मानुष जाती येते. प्रत्येकास स्वार्थत्याग करण्याची इच्छा असते. परंतु त्याचा विनियोग मात्र प्रसंगावर अवलंबून असतो. ज्याप्रमाणें प्रत्येकाचे ठिकाणीं स्वार्थत्यागाचें बीज असतें तसेंच प्रत्येक मनुष्याचे ठिकाणीं दुसऱ्या- कडून मदत मिळावी अशा तऱ्हेची वासना असते. परंतु या दोहोंचा मेळ बसणें फार कठीण होतें, व ह्मणूनच दुःखाचें राज्य नांदत आहे. या दोहोंची ह्मणजे गरज भागविणारा व ज्यास गरज आहे त्याची भेट करून देणारा कोणी मिळाल्यास गरज भागून दुःखाचें सहजच परिमार्जन होणार आहे.

**उदाहरणार्थ**– कोणास अन्नदान कर- ण्याची, कोणास, निराश्रितास आश्रय देण्याची, कोणास पैशासंबंधीं मदत देण्याची, कोणास विद्यादानाची, कोणास दुसऱ्या करितां अं- गमेहनत घेण्याची, कोणास कांहीं, कोणास कांहीं, अशी कमीजास्ती मदत करण्याची इच्छा असते. व त्यांचे इच्छेनुरूप प्रसंग आल्यास ते शक्त्यनुसार मदत करण्यास राजी असतात. दात्यां प्रमाणें दान घेणारेही हजारों आहेत. जसें कोणास शरीर पोषणार्थ पुरेंसें अन्न मिळत नाहीं, कोणाचे घरांत अडचण असल्यामुळें रोगी मनुष्याचे शुश्रुषे करितां कोणी मनुष्य मिळत नाहीं, कोणास केवळ पैशाचे अभावामुळें अनंत अडचणी सोसाव्या लागतात, कोणा विद्यार्थ्यास शि- कण्याची इच्छा असून शिक्षण देणाऱ्याची गरज असेल, कोणास वैद्याची मदत पाहिजे असेल तर कोणास वकीलाची मदत पाहिजे. कोणाची कांहीं अडचण तर कोणाची कांहीं अडचण असते. अशा प्राकारानें जगीं सर्व सुखी असा कोण आहे? असा प्रश्न उत्पन्न झाला आहे व त्यास उत्तर ' कोणी नाहीं ' हेंच देण्यांत येतें. माझे मतें हें ठीक नाहीं. एका व्यक्तीस सर्व गोष्टी अनुकूल असणार नाहींत परंतु ज्यांस अनुकूल असतील त्यांनीं त्या बंधू प्रेमानें पूर्ण केल्यास व्यक्तीचे अपूर्णत्व बरेंच अंशानें नाहींसें होणार आहे. अनाथ मित्र मंडळ अशा गोष्टी करूं शकतें व कांहीं ठिकाणीं मी सांगितल्या इतक्या व्यापक तऱ्हेनें नाहीं तरी विशिष्ट गोष्टींकडे संघांतील कांहीं शाखांचे लक्ष लागले आहे. मुंबई येथील सेवासदनानें अनाथदुःखनिवारणार्थ चालविलेले प्रयत्न अशाच तऱ्हेचे आहेत ही संस्था अत्यंत उपयोगी आहे. संघांतील नागपूर शाखेचे सभासदही " मित्र मंड- ळाची कल्पना कशी अमलांत येईल या- बद्दल विचार करीत आहे.

संघांचे मुख्य चालका कडून खालीं लिहिलेलीं महत्वाचीं कामें हातीं घेण्यांत आलीं आहेत.

१ संघाकडून १९१० सालची " सन्स आफ इंडिया ' नांवाची डायरी छापली गेली.

१ " सन्स आफ इंडिया ' नांवाचें मासीक पुस्तक निघत असतें.

१ इंडियन युनिव्हर्सिटी स्थापन करण्या- बद्दल प्रयत्न.

संघाचे मदतीनें बनारस येथें शिक्षण परिषद १९०९ भरली होती.

१ या शिवाय बनारस येथें कामाचे व्यवस्थे करितां निरनिराळे ग्रूप स्थापन केले आहेत.

हिंदुस्थानांत सुमारें दीड वर्षाचे अवकाशांत अनेक ठिकाणीं संघाच्या शाखा स्थापन झाल्या आहेत त्यांत खालीं लिहिले प्रमाणें मुख्य ठिकाणें दिलीं आहेत.

१ बनारस, लखनौ, दिल्ली, नादोद भावनगर, मुरादाबाद, राजकोट, मुंबई, पुणा, कराची, मद्रास, कर्नूल बंगलोर वगैरे, या ठिकाणीं काम चांगलें चाललें आहे.

संघांतील शाखाकडून मुख्यतः खालीं लिहिल्या प्रकारचीं कामें हातीं घेतलीं आहेतः—

१ स्त्रीशिक्षण संस्था.

१ जनावरास निर्दयपणानें न वागावेण्याबद्दल प्रयत्न.

१ घरगुती तऱ्हेनें करण्या सारखे उद्योग धंदे काढणें.

१ अजारी मनुष्याची शुश्रुषा.

१ निरनिराळे लोकोपयोगी विषयांवर भाषण करणें.

१ धंदेवाले लोकाकरितां रात्रीची शाळा काढणें.

१ अस्पृश्य जातीचे मुलाकरितां शाळा काढणें.

१ मद्यपानापासून लोकांस परावृत्त करणें.

१ अंध व बहिऱ्या करितां शाळा.

१ कंगाल व रस्त्यांत फिरणाऱ्या मुलांकरितां शाळा काढणें.

वगैरे जाहिर रीतीनें निरनिराळया शाखाकडून कामें घेतलीं आहेत व शिवाय दिलेल्या वचना प्रमाणें प्रत्येक सभासद निदान लोकसेवेचें दररोज एकतरी काम करण्याचा प्रयत्न करीत असला पाहिजे.

मुख्य कौन्सिलची रचना खालीं लिहिले प्रमाणें आहे.

**अध्यक्ष**– मिसेस अनी बेझंट.

**संरक्षक**– हिज एक्सलन्सी

१ सर आर्थर गव्हर्नर, रा. मद्रास.

२ गायकवाड सयाजीराव साहेब.

३ म्हैसुरचे महाराज.

१ **सभासद**– एस. सुब्रह्मण्यम अय्यर हा, जज्ज.

२ नामदार चंदावरकर.

३ शारदाचरण मित्र, रि. हा. जज्ज.

४ बडोद्याचे दिवाण साहेब.

५ म्हैसुरचे दिवाण साहेब.

६ त्रावणकोरचे चीफ जज्ज.

७ रा. बै. लालबैजनाथ.

८ नामदार गंगाप्रसाद.

९ शशीचंद्र बोस, बी. ए.

१० रा. साहेब प्यारेलाल.

११ रा. नारायण गणेश परांजपे.

१२ डा. ए. एन. सांबारे,

१३ पंडित छेदालाल.

१४ मिस आई डेल.

१५ बाबू भगवानदास, एम्. ए.

१६ रावसाहेब इकबाल नारायणगर्टू.

१७ एम्. बी. राणे, एम्. ए.

१८ इ. ए. उडहाऊस्, एम्. ए

१९ लक्ष्मीनारायण, एम्. ए.

२० जॉ. एस्. आरंडेल, एम्. ए.

या संघाची मुख्य चालक जिनें लोकसेवे करितां आपणांस वाहून घेतलें आहे, तुकारामानीं ह्मटल्या प्रमाणें "जे का रंजले गांजले त्यासि ह्मणवी आपुले" हेच जिचें व्रत आहे अशा अद्वितीय विभूतीचे शुद्ध रंगी त्यामध्ये वाचून " माझे मित्र माझा त्याग करोत, माझा जगाशीं असलेला संबंध तुटून जावो, ती एक सत्यनिष्ठा मला शुद्ध ठेविलीच पाहिजे. तें सत्य मला निर्जन अशा अरण्यामध्यें सोडून देवो, मी त्यास सोडणार नाहीं. तें सत्य माझें प्राण हरण करो. त्या सत्यावर माझा पूर्ण विश्वास राहील. माझी विनंती येवढीच आहे कीं माझे थडग्यावर दुसरीं कोणतींहि अक्षरें न लिहितां इतकेंच खोदलें जावें कीं—— "तिनें सत्यव्रत पाळण्याचा प्रयत्न केला." तिला सर्वशक्तिमान, जगत्चालक परमेश्वर चिरायू करो अशी प्रार्थना करून आपण सर्वांनीं शांत मनानें ऐकिलें याबद्दल आपले आभार मानून आपली रजा घेतों.

सन्स ऑफ इंडिया मासीक पुस्तकाची वर्गणी दरसाल बारा आणे आहे. ज्या कोणास मासीक पुस्तक पाहिजे असेल, त्यांनीं आपलें नांव येथील शाखेंत नोंदून द्यावें अगर तें सेक्रेटरी, सन्स ऑफ इंडिया मासीक पुस्तक, बनारस सिटि या पत्यावर लिहून मागऊं शकतात.

चिंतामण हरी मराठे.

---

## भक्तिवात्सल्य नाटक

[ मागील अंकावरून पुढें चालू. ]

### अंक ४ था.

प्रवेश १ ला.

**स्थल**–नरसिंहाचे देवळाचा आंतील भाग.

**दासोपंत**–

पद

तूं बलाहक तृषित चातक हाक फोडुनि बाहितों मी ॥ कृपाजल घन वर्षवोनी शांतवी या जगत्स्वामी ॥ भक्तकाजा गुंतलासी ह्मणुनि मजशीं विसलल्यासी ॥ रमाजनकागृहीं किंवा शेष शयना झोंप घेशी ॥ १ ॥

( बाहेर येतो. )

**विप्र**— स्वामी, उदयीक सूर्योदयाबरोबर हा बादशहा आपल्याला मुसल्मान करणार.

**दासोपंत**– होय बाबा !

साकी

असेल माझा शुद्ध भावजरि श्री दत्तात्रय पायीं ॥ अधिभौतिक संकटा मधोनी काढिल मज लवलाही ॥ उडी घालोनी ॥ जलनिधि तारणी तरणी ॥ धृ ॥

**विप्र**– मला वाटतें या संकटांतून पार पडण्यास एकच उपाय आहे.

**दासोपंत**– तो कोणता ?

**विप्र**— आपण येथून पळून जाणें हाच.

**दासोपंत**—- पळून जाणार कुठें आपण ?

**विप्र**— बेदरचे राज्याचे हद्दीबाहेर निघून जाऊं.

**दासोपंत**— इतकेंच मग दोन दुःखें ओढवून घेण्याची तुमची ही सल्ला आहे. अशा ठिकाणीं मला घेऊन चला कीं, त्या ठिकाणीं अधिभौतिक, आधिदैविक, वा आध्यात्मिक उपाधींचा मला संसर्गही होणार नाहीं.

**विप्र**– अशी जागा ह्मणजे कैवल्य धामच आहे.

**दासोपंत**— आणि तें देणार श्रीदत्त समर्थ आहे. भक्ताला दुःखभार आणि देवाला अवतार या दोन्ही गोष्टी एक समयावच्छेदेंकरून होत असतात. याच बेदरचे दरबारांत दामाजी करितां श्री पांडुरंग महार होऊन आला होता. त्यांत पितृभक्तिकरितां भीष्माचार्यांनीं आजन्म ब्रह्मचर्य पतकरलें. धर्मांगद पित्याचें वैष्णवी व्रत राखण्याकरितां मोहिनीला स्वताचें शिरकमल देण्यास तयार झाला. चिलयानें स्वताचें मांस अतिथीला चारलें. पुंडलिकानें मातृपितृभक्तीपुढें प्रत्यक्ष देवाचीहि परवा न करितां त्याला भीमातीरीं विटेवर उभे केलें. असें असतां मी आपल्या ताताला वचन परांङ्मुख करून पूर्वजांना अधोगतीला नेऊं काय ?

**शिपाई**— ( प्रवेश करून ) आज करार पुरा हो चुका लिये बादशहानें आपको मज्जीतमे ले आनेका होकम किया है. बहोतसे बम्मन फकीर, मुरषद, काजी, मुल्लाजी वगैरा सब व्हांही जमा होनेके है.

**दासोपंत**– खाविंदाचे चरणीं माझी अशी विनंती सांगा कीं, मला वाड्यांतच घटकाभर एकांत बसण्याची परवानगी द्यावी.

( शिपाई जातो. )

पद

पहा पंडुचे पुत्र कांतारवासी ॥ तरी आठवीती सदा श्रीपतीशी ॥ नितांतापदा दैत्य सूनुस देता ॥ स्मरे त्वत्पदा तो धरी शांतता ॥ करूं चूर्ण हें शीर आपन्नता ॥ नता या परी बुद्धि दे नाम ध्यासी ॥ १ ॥

चला विप्रवर्य श्रीचें दर्शन घेऊन बादशहाचे वाड्यांत जाऊं. ( जातो. )

**विप्र**– आज कांहीं तरी दैविक चमत्कार होणार खास. येवढ्या मोठ्या संकटाची भीति या सत्पुरुषाच्या मनाला तिलप्राय नाहीं. सुखदुःख केवळ मनाचे तरंग सापेक्ष मानतो तो. अशा या सत्वांश विभूतीचा हे यवन राजा, तूं काय अंत पहातोस. आजपासून या सत्पुरुषाचे पायीं हा देह अर्पण केला. या आपदेंतून गुरुमहाराजांची सुटका झाली नाहीं तर मी अग्निकाष्ट खाणार.

( जातो. )

अपूर्ण.

---

## वऱ्हाडसमाचार.

मार्गशीर्ष शु. ११ शके १८३२ दुर्मतिनामसंवत्सरे

### व्यक्ति व इतिहासाची घटना

राष्ट्राच्या इतिहास घटनेंत व्यक्तीचा किती हात असतो याची कल्पना फारच थोड्यांना असते. आमच्या प्राच्यदेशांत तर एकेक देशाचा इतिहास ह्मणजे बहुधा एका व्यक्तीचाच असतो. मतराव्या शतकांतला मराठ्यांचा इतिहास ह्मणजे नुसत्या शिवाजी महाराज्यांचें चरित्र नव्हें तर काय? त्याच प्रमाणें मोगल बादशाहीचा इतिहास ह्मणजे विवक्षित कालांतल्या कोणतातरी एकाद्या थोर बादशहाचें चरित्र नुसतें आढळून येईल. पाश्चात्य देशांत सुद्धां असाच प्रकार पुष्कळ वेळा आढळतो, एका व्यक्तीचा राष्ट्रीय घटनेवर जो विलक्षण परिणाम केव्हां केव्हां घडलेला असतो तो लक्षावधि प्राण्यांच्या संयुक्त जीवनांच्या परिणामापेक्षां अधिक असतो. अर्वाचीन काळांत इटली देशाचा गॅरीबॉल्डी घ्या, किंवा प्राचीन कालांतला कार्थेजचा हानीबाल घ्या. या एकेका प्रतापरवीच्या किरणाचें जें प्रतिबिंब तत्कालीन इतिहासांत उठलेलें आहे त्याच्या शतांशा इतकें तरी तेज त्या देशच्या इतर व्यक्तींच्या चरित्रांत दिसतें काय ? मध्ययुगांत युरोपखंडांत शार्लमेन राजा झाला नसतां तर तें सबंध युग काळोखांत राहिलें नसतें काय ? ग्रीसला, डेमास्थेनिस किंवा म्यॅसीडोनला फिलिप व अलेक्झांडर असे पितापुत्र, लाभले नसते तर त्या देशांचे इतिहास हल्लींच्या सारखे तेजस्वी झालें असतें असें कोण ह्मणेल ? रुसो आणि व्हालटेर यांच्या लेखांचा फ्रांसांतील राज्यक्रांतीशीं असलेला संबंध तोडून टाकला तर त्या ऐतिहासिक महत्वाच्या घटनेचे धागे कधीं तरी जुळवितां येतील काय ? कॉबडेन याचा घनगंभीर ध्वनि कानीं पडला नसता तर इंग्लंडच्या लोकांची कॉर्न लॉ रद्द करण्याविषयीं प्रवृति कधीं झाली असती काय ? विल्बर फोर्स व बॅक्स्टन या दोघांचीं नांवें गुलामगिरीच्या इतिहासांतून पुसून टाका ह्मणजे पशुवत गणलेल्या लक्षावधि मनुष्य प्राण्यांचे छल, हालहपेष्टा, रक्तपात व शिव्याश्राप यांचे धनी किती सुधारलेल्या लोकांस अजून सुद्धां व्हावे लागले असते ? स्वदेशांत दुसरा चार्लस झाला नसता तर युरोपांतल्या दक्षिण भागांत तरी मुसलमानांचा हायदोस राहिला असता कीं नाहीं? एक शिवाजी नसता तर सगळे महाराष्ट्र मुसलमान झाले असते आणि एक जार्ज वाशिंग्टन् नसता तर अमेरिकेच्या स्वातंत्र राज्याची उभारणी कधीं झाली नसती.

इतिहास ह्मणजे केवळ रुक्ष तत्वज्ञान नव्हे, किंवा कल्पना सृष्टींतलें काव्य नव्हे. तर कर्तृत्ववान पुरुषाच्या कर्तृत्वाचें तें क्षेत्र आहे. 'एकश्चंद्रस्तमाहन्ती नच तारागणाऽपि' हें संस्कृत कवीचें वाक्य किती खरें आहे. एकटा सॉक्रेटीस दहा हजार दांभिक, लपटी, तत्वज्ञात्यांना गोंधळून लावण्यास पुरे होता. एकटा महमद अरबस्तानांतल्या नास्तिक वाद्यांना ताळ्यावर आणण्यास समर्थ झाला. एक गौतम बुद्ध, एक कोट्यावधि लोकांना अज्ञानरूपी अंधकारांतून बाहेर काढून त्यांना मोक्षप्राप्तीचें खरें द्वार दाखविण्यास कारण झाला. एका नांवावर राज्यक्रांती, धर्मक्रांती, समाजक्रांती वगैरे अनेक क्रांतिचक्रें फिरल्याचीं उदाहरणें मागल्या काळीं घडलीं व हल्लींही घडत आहेत, अद्वैत मताची स्थापना एकट्या शंकराचार्यांनीं केली नाहीं काय ? उत्क्रांतितत्त्वाचा शोध डारविनच्या नांवाशीं बद्ध झालेला नाहीं काय? तुरुंगांतील सुधारणेच्या गोष्टी मनांत येतांच जॉन हॉवर्ड या महात्म्याचें व त्याच प्रमाणें रोग्याची शुश्रुषा करण्याच्या संबंधांत मिस् फ्लॉरेन्स नाईटिंगल या पुण्य कुमारीचें नांव ज्याच्या तोंडीं येणार नाहीं तो भाग्यहीन असला पाहिजे ! सारांश व्यक्ति आणि इतिहास घटना यांच्यांतील संबंध अत्यंत महत्वाचा आहे, परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं इतिहासकार पुष्कळ वेळा व्यक्तीला सोडून देऊन इतिहास घटनेला महत्व देतात 'देवा सोडूनिया देऊळा भजती' असा लोकांचारच आहे.

---

### सहकारी पत पेढ्या.

लेख नंबर १.

[ हे लेख शेतकऱ्यांस उद्देशून लिहिले आहेत. ]

आपणाला ठाऊक आहे कीं आपल्या वऱ्हाडांतला कापूस व सरकी विलायतेंत जाते, व तेथें जो भाव असेल त्या भावावर आपला माल येथें विकतो. कापसाच्या कामांत आपले मोठे प्रतिस्पर्धी अमेरिका खंड होय. तेथील जमीन उत्तम व सुपीक,

ळे ऱ्ह शेतकरी शिकलेले व आपल्या कामांत कुशल, या मुळें त्यांना आपल्या जमिनींतून सुधारलेल्या यंत्रांच्या, सुधारलेल्या शेतकीच्या व रसायन शास्त्रानें तयार केलेल्या नवीन नवीन खतांच्या योगानें थोड्या काळांत, व थोड्या खर्चानें उत्तम व पुष्कळ माल उत्पन्न करून बाजारांत आणितां येतो. उत्तम मालाला भाव जास्त, व तसा माल पुष्कळ तेव्हां त्यांना पुष्कळ फायदा होतो. आपणाला भावही कमी येतो, व आपला मालही कमी, तेव्हां आपणाला फार थोडा फायदा राहतो. त्यांच्या इतका जरी नाहीं तरी त्याहून थोडा कमी पण हल्लींपेक्षा पुष्कळ जास्त असा फायदा आमच्या शेतकऱ्यांस का होऊं नये. ? ते खटपट करितील, सचोटीनें वागतील, परस्परांना साहाय्य करितील, व भांडवल वाढवितील तर त्यानाही फायदा मिळेल. ही वळ आहे गमाविली तर ते बुडतील.

परदेशांतला माल आपल्याकडे वर्षानुवर्ष जास्त येत आहे, कां ? आपल्या देशांत होणारा माल आपल्या बाजारांत परदेशी मालाशीं टक्कर मारूं शकत नाहीं. कां ? उदाहरण परदेशी साखरेचा भाव दर मणीं नऊ रु., बनारशीचा सोळा रुपये ! केवढें अंतर ! स्वदेशी साखर परदेशी साखरेशीं सुधारलेल्या रीतीनें उत्पन्न वाढविल्या शिवाय व साखर तयार करण्याचा खर्च कमी केल्याशिवाय कशी टक्कर मारणार ? उत्पन्न वाढविणें व माल तयार करण्याचा खर्च कमी करणें ह्मणजे सहकारी पत पेढीच्या साहाय्यानें भांडवल कमी व्याजावर काढणें, व शेतींत लागवडीची सुधारणा करणें होय. सारांश, आपला माल बाहेर कमी जातो, बाहेरचा आपल्या इकडे फार येतो, आपल्या मालाचा नंबरही वर लागत नाहीं, याचें कारण हें कीं—आपली जमीन करण्याची तऱ्हा जुनी, आपलीं आऊतें जुनीं, आपलें ज्ञान कमी, आपला एकमेकांवर विश्वास कमी ह्मणून एकमेकांस सहाय्य देतों कमी, व यामुळें एकमेकांची पत कमी असल्यानें, आपणांस व्याज भरावें लागतें फार, व खर्च होतो फार. ही स्थिति कांहीं अशी तरी सुधारावी ह्मणून सरकारानें सहकारी पत पेढ्या काढण्याबद्दल कायदा केला आहे. त्यानें सहकारी पत पेढ्यांस कांहीं सवलती दिल्या आहेत, त्यापुढें सागूं. पण सहकारी पत पेढी खेड्याच्या किंवा गांवच्या लोकांनीं आपल्या पायांवर उभें राहून चालविली पाहिजे, असा सरकारचा हेतु आहे. तेव्हां खेड्यांतले किंवा गांवांतले प्रतिष्ठित लोक पुढें आले पाहिजेत. प्रकृत लेख शेतकऱ्यांस उद्देशून लिहिले आहेत तेव्हां खेड्यांतीलच पत पेढ्यांचा तूर्त विचार करूं.

### तेव्हां ही सहकारी पत पेढी आहे तरी काय ?

असें विचाराल त्याचें उत्तर हें. जमीन करायाला शेतकऱ्याला भांडवल लागतें ना ? नवीन जमीन काढणें असो किंवा जुन्या जमीनींतून जास्त खटपट करून व खत घालून जास्त उत्पन्न काढणें असो भांडवल लागतें. तें भांडवल कोणाकडून मिळणार ? हल्लींच्या स्थितींत खेड्यांतील एकएका शेतकऱ्याची पत थोडी, तव्हां पीक बुडालें तर भांडवल बुडणार या भीतीनें सावकार व्याज फार घेतो. दुहोत्रें व्याज हा साधारण प्रकार आहे. क्वचित दर शेंकडा ३६ रु. सालीना व्याज लावितात, असेंही आढळांत येतें. यांत मनुती वगैरे धरलीच नाहीं. याजवर व्याजानें शेतकऱ्याजवळ नफा फारसा राहत नाहीं, व पीक बुडालें तर व्याजावर व्याज चढून कर्ज वाढत जातें, व शेतकरी ना उच्छेद होतो व अखेर बुडतो व शेतीची ही खराबी होते. तेव्हां पतदार शेतकऱ्याची सोय व्हावी, सावकारास ही आपलें भांडवल बुडण्याची जोखीम कमी होईल अशी सोय व्हावी, या हेतूनें सहकारी पत पेढीची योजना करण्यात आली आहे.

### सरकारचें हें काम नव्हे.

आतां कोणी ह्मणेल अशा पेढीची आवश्यकता काय ? सरकार जें तगाई देतें, ती वाढवीत कां नाहीं ? तर याला उत्तर हें. हें काम सरकारच्या आटोक्याबाहेर आहे. लाखों नव्हे कोट्यावधी शेतकऱ्यांशीं व्यवहार करण्याला सरकाराजवळ माणसें कोठें आहेत? हीं माणसें—अधिकारी—वरचेवर बदलून जाणार ! त्यांना शेतकऱ्याच्या अंतःस्थ स्थितीची माहिती साद्यंत कशी ठेवतां येणार ? कोणाची पत किती, कोणाची किती हें सागतां कसें येणार ? बरें; पतीवर सरकारानें कर्ज दिलें, तर त्या कर्जाचा विनियोग कसा कसा केला हें पाहायाला कोण येणार ? व असे सरकारी कामगार वरचेवर आले, तर शेतकऱ्याना किती त्रास वाटणार? तेव्हां हें काम सरकाराला प्रत्यक्ष आपल्या होतीं घेता येत नाहीं. व घेण्याची त्यांची इच्छाही नाहीं-तगाई निक्रिरीची ह्मणून शेतकऱ्यांना नापसंत व सरकारास ही फारशी पसंत नाहीं सरकार आजपर्यंत शेतकऱ्याना तगाई देत आलें आहे, पण ती मागण्या करितां अर्ज करावा, मग चौकशी व्हावी, रिपोर्ट व्हावे, व शेवटीं मंजुरात यावी तो शेतकऱ्याला आपली निकड दुरुस्त कोणाकडून तरी कर्ज काढून भागवावी लागते, असें कैक वेळां दिसून आल्यावरून शेतकरी या जिकिरीत पडत नासे झाले. व सरकारी कामगारांना आपलीं इतर कामें संभाळून तगाई देण्याच्या पूर्वी जी बारीक चौकशी करावी लागते ती करण्याला त्यांना वेळ मिळत नाहीं तेव्हां बहुतेक अर्ज प्रथमारंभींच नामंजूर हातात. शेवटपर्यंत अर्ज पोहोंचून रकम मंजूर झाल्यावर ती हातीं पडे तों शेतकऱ्यास जे हेलपाटे खावे लागतात, जो त्रास भोगावा लागतो, व आपते वेळीं ही रकम मिळत नाहीं ह्मणून जी निराशा होते, त्यांची कल्पना शेतकरीच करूं जाणें. या गोष्टी सरकारच्या कानावर गेल्या आहेत ह्मणून तगाईची पद्धत वाढविण्यास सरकार फारसें खुष नाहीं. या कारणाकरितां शेतकऱ्यांनीं या कामीं आपआपल्या पायांवर उभें राहण्यास शिकावें, अशी सरकाराची इच्छा आहे. हा स्वावलंबनाचा धडा व त्याबरोबरच बेतावातानें खर्च करून पदरीं नव्हे तर बँकेंत शिलुक टाकण्याचाही धडा सरकार शिकवूं इच्छीत आहे. हा धडा शिकविण्याकरितां सरकारानें रेजिस्ट्रार, असिस्टंट रेजिस्ट्रार, तालुका आफिसर, व तहशीलदार यांस नेमिलें आहे. यानीं गांवोगांव जाऊन या पेढ्या स्थापन करण्यास लोकांना उत्तेजन द्यावें, पेढ्याचे उद्देश समजून सागावे, पेढ्या चालवाव्या कशा ही रीत सांगावी, हिशेब ठेवण्याचा प्रकार समजावून द्यावा, व पेढ्याचे हिशेब बरोबर ठेविले आहेत कीं नाहींत हें नेमिलेल्या आडिटरच्या ( हिशेब तपासनीसाच्या ) मार्फत पहावें. नोंदणीचा खर्च व स्टांपाचा खर्च सरकारानें तूर्त माफ केला आहे. व पेढ्यांवरील उत्पन्नावर इन्कम टॅक्सही कर सोडिला आहे. जरूर पडल्यास क्वचित् प्रसंगीं सरकार भांडवलांत भर घालण्यास ही तयार होईल.

पेढींतील सभासदाचा शेर किंवा त्याला मिळणारा पैशाचा फायदा ( Interest ) हा कोर्टाच्या दरखास्तीनें जप्त होणार नाहीं, असें ही ठरविलें आहे. या सवलती व माफी कमी महत्वाच्या नाहींत. सावकाराचें शेतकऱ्याकडे येणें निघतें, त्याचा जर तपशील पाहिला तर रोखे वरचेवर बदलून घेण्याच्या वेळीं स्टांपाचा खर्च, लिखाई, रेजिस्ट्रेशन फी यांची आकारणी व त्यावरील व्याज याचा केवढा तरी भाग आहे असें दिसून येईल. सरकार आपणाला मदत देत आहे, तेव्हां आपण ही त्यांना मदत करून आपलेंच हित करून घेऊं नये काय ?

## ऐतिहासिक माहिती.

'इतिहाससंग्रह'चा जुलै १९१० चा अंक नुकताच हातीं आला. त्यांत पुढील निवडक ऐतिहासिक माहिती आहे.

इंग्रज इतिहासकारांनीं म्हैसूरच्या युद्धाचीं जीं वर्णनें दिलीं आहेत, त्यांत पुष्कळ वेळा पक्षपात व अतिशयोक्ति फार असतात. उदाहरणार्थ—मारिस साहेबांचा इतिहास कोणताही लढाई घ्या. तींत इंग्रजांचे शेदोनशें शिपाई व शत्रूकडचे दहापाच हजार सरदार व शिपाई पडल्याचीं वर्णनें आढळावयाचीं. पण टिपूवर इंग्रजांनीं १७९१-९२ सालीं जी मोहिम केली तिचीं बरींच साद्यंत वर्णनें हरिपंत फडक्यांनीं पेशव्यांना कळविलीं आहेत. या वर्णनांत इंग्रजाच्या बहादुरीविषयीं योग्य प्रसंगीं प्रशंसा असून सत्य प्रकार निष्पक्षपातानें वर्णिला आहे. श्रीरंगपट्टणाचे वेढ्याचे वेळीं एक दोन वेळ इंग्रज मागें सरल्याचें व इंग्रजांकडील पांच सातशें गोरा व एक हजार इतर पलटणें मिळून सुमारें १॥। हजार सैन्य व टिपूचें २ हजार सैन्य पडल्याचें स्पष्ट लिहिलें आहे. निजाम, मराठे व इंग्रज या तिघांनीं मिळून टिपूस जेरीस आणिल्यानंतर टिपूशीं तह झाला त्यांत इंग्रजांनीं अतस्थ रीतीनें टिपूपासून स्वतःला कांहीं ज्यास्ती घेतलें असा बोभाटा होता. पण 'पाहतां खरें वाटत नाहीं' असें हरिपंतानीं आपला स्पष्ट अभिप्राय दिला आहे.

२ देवराव हिंगणे हे वकिलीच्या कामासाठीं महेश्वरास आले होते. त्यांनीं होळकरशाहीची स्थिति पुढील शद्बांत वर्णिली आहे—"सुभेदाराचें ( तुकोजीरावाचें ] शरीर अर्धें वायूनें गेलें आहे. जेष्ठ चिरंजीव काशीराव यांचा एक हातपाय वायूनें कमी जन्मताच आहे व तद्वतच बुध्य, मगलत, कायम मिजाजी आहे ! कनिष्ठ चिरंजीव मल्हारराव त्यांची अवस्था जघन्यच आहे. तुतण्या बापूजी होळकर यासी द्रोहबुद्धि विशेष कीं माझे पुत्र मागें पडतील. यास्तव पुत्रांस ल्हडीस घालावें मुल्यास पुत्रमोह ! व्यसनासक्ति सर्वांस ! मादक वस्तूंचा संग्रह ! ............ मुल्य या दौलतीस अहल्याबाईचें पुण्य, धर्म, व बुद्धि, कायम मिजाज, एकवचन, व श्रीमंताचे चरणीं निष्ठा, व लौकिकावर दृष्टि, कर्तृत्व व पुरुषार्थ आहे. " किती सुंदर वर्णन?

३ महादजी शिंदे यांचा काल माघ शु० १३ बुधवारीं वयूची भावना होऊन अवसीचे प्रहर रात्रीस झाला.

४ हरिपंत फडक्यांचे सैन्यांत सन १७८६ सालीं मरीचा उपद्रव होऊन फार माणसें मेलीं त्यांत कोणी धोंडभट वैद्य होते. यावरून रा पारसनीस असें अनुमान [नव्हे सिद्धांत] काढतात कीं मराठ्यांच्या सैन्यामध्यें सांप्रतच्या मिलिटरी सर्जन प्रमाणें 'लष्करी वैद्य' असत. हें अनुमान भक्कम पुराव्यावरून काढलेलें नाहीं हें उघडच आहे. त्या काळीं सगळ्याच श्रीमंत व्यापारी व सरदार लोकांजवळ आश्रितांमध्यें वैद्य असतच. त्याप्रमाणें फडक्यांच्या सैन्याबरोबर कांहीं धोंडभट असेत ह्मणजे त्यावरून हल्लींच्या मिलिटरी सर्जन प्रमाणें शिपायांच्या जखमा वगैरे बांधण्यास व औषधपाणी करण्यांत लष्करी वैद्यांची तरतूद होती असें ह्मणणें धाडसाचें आहे.

५ पेशव्यांमध्यें अराज्यनिष्ठ व कारस्थानी लोकांवर चांगली नजर असून, त्यांना प्रसंगविशेषीं दूरदूरच्या ठिकाणींही अटककरीत असत. प्रेममुख जोहरी नांवाचा एक जयनगरचा इसम निजामच्या पदरीं होता. तो कांहीं राजकारणानिमित्त जगनगरास ह्मणजे जयपुरास परत जात होता. त्याची बातमी पेशव्यांचे हैदराबादचे वकील गोविंदराव काळे त्यांनीं नानांस दिली त्या बरोबर नानांनीं त्यास बऱ्हाणपूरच्या टापूमध्यें कैद करविलें.

६ अहल्याबाई होळकर हिजला मुक्ताबाई ह्या नांवाची एक कन्या होती, ती यशवंतराव फणसे ह्यांस दिली होती. यशवंतराव ना० ३ नोव्हेंबर इ. स. १७९१ रोजीं मृत्यु पावले. त्यांच्या बरोबर मुक्ताबाई सती गेली. त्यामुळें अहल्याबाईस परम दुःख जालें. त्या प्रसंगाचें एक अस्सल पत्र उपलब्ध झालें आहे, तें वाचनीय आहे. त्यावरून अहल्याबाईच्या शोकग्रस्ततेची कल्पना करितां येते. त्या पत्रामध्यें मुक्ताबाईबरोबर आणखी दोन स्त्रिया सती गेल्या, असाही उल्लेख आहे. त्यावरून मुक्ताबाईस आणखी कांहीं सवती होत्या असें दिसतें.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडा दर्शनी | | ९९।।।– |
| मुंबई ब्यांकेची सोन्याची चीप दर तोळ्यास | | २४ |
| चांदी | | ७३।। |
| जवारी नवी | ५९ | ६० |
| गहूं | ४। | ५। |
| गहूं बनसी | | ११० |
| चणे | | ४५ |
| तेल | | ८ |
| सरकी | | ११।। |
| तुप | १० | ११ |
| कापूस | ८२ | ८५ |
| आकोला जीन | | १०६ |

## जाहिरात


वर्षफळ—प्रत्येक महिन्याचे फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ८= जन्म काल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

पत्ता—
मा० गो० पंडित,
मु० व पो० लोणखेड
प. खानदेश

नो० नं०ण० ३०

ॐ

## सत्यमेव जयते.

( सत्यशोधक समाजाचे पुस्तकांची जाहिरात )

शास्त्री नारो बाबाजी महाघट सत्यशोधक समाजाचे प्रसिद्ध उपदेशक क्षत्रीय मराठे यांनीं वेदाचे व शास्त्राचे व पुराणाचे व अनेक ग्रंथांचे आधारें लोकांचे कल्याणाकरितां हा ग्रंथ व पुस्तकें तयार केलीं आहेत.

वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धति भाग १० ग्रंथ एकच. पहिल्या भागांत सर्व पूजेचे मंत्र व दुसऱ्या भागांत वटसावित्रीचें व्रत, हरतालि, कावत, शमिपूजन, तुलसीविवाह, होळीपूजा, सोमवतीपूजा, शनिपूजेचा विधि, तीर्थप्रायाश्चित्ताचा विधि, दिपवाळीचें लक्ष्मीपूजन, सर्वत्र देवाचे अभिषेक, सत्यनारायणाचे पूजेची माहिती, गंगापूजन वगैरे अनेक किरकोळ विधिची माहिती मंत्रासह दिली आहे. भाग ३ ऋतुशांती, उपनयन संस्कार (मुंजी) ची माहिती मंत्रासह भाग ४ यांत लग्नसंबंधीं ह्मणजे साक्षगंध, साखरपुडा, शालमुदि, देवकुंडी, साहित्यविडा, नन्नाका, मंगलाष्टकें, सुलग्न, सतवर्णे, कन्यादान, कंकणबंधन, लाजाहोम, प्रतिज्ञा मंत्र, फळ (तांबूल) किंवा साडे, वगैरे प्रकारचे विधीची तपशीलवार वेदोक्तमंत्रासह माहिती दिली आहे. भाग ५ देवपूजेचे वेदोक्तमंत्र, पुरुषसुक्त ब्रह्मयज्ञ (संध्या) नित्यकर्माकरितां अग्निहोत्र. भाग ६ यांत यज्ञविधीची संपूर्ण माहिती, वास्तुशांति, ईश्वरप्रार्थना, स्वास्तिवाचन, शान्तिपाठ, वगैरे वेदोक्त मंत्रासहित विधी दर्शविला आहे. भाग ७ यांत अंत्येष्टिकर्म (मृतसंस्कार), श्राद्ध दशक्रिया दाहा दिवसांच्या दाहा क्रिया, अकरा व तेरा दिवसाची क्रिया ह्या सर्वत्र कर्मांची मंत्रासह तपशीलवार माहिती दिली आहे. भाग ८ यांत जोतिषासंबंधीं संपूर्ण माहिती उदाहरणासह दिली आहे. भाग ९ यांत सर्व देवांच्या आरत्या व समाजीयन मंडळींनीं केलेलीं पदें. भाग १० सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें, समाजाचे नियम. पुस्तकांची जाहिरात. अत्यंत महत्वाची दुसरी जाहिरात, ईश्वरप्रार्थनापर पदें. आरत्या व पदें याप्रमाणें एकंदर माहिती देऊन दहा भाग पुरे केले आहेत. हा ग्रंथ प्रत्येकानें संग्रहीं ठेविला असतां हव्यकव्य कर्म करण्यासंबंधी ब्राह्मणेतर वर्गास कोणत्याही पुस्तकांची जरूर पडणार नाहीं. वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धती भाग दहा व हिंदुधर्माचें खरें ज्ञान, ब्राह्मणांचा हक्क कांहीं नाहीं अशा बद्दल हायकोर्टीत झालेले ठराव, वादीचे अर्जाचे नकलेसह, इशारा श्रीजोती गोविंदराव फुलेकृत, ब्राह्मणेतर बंधूस प्रार्थना, मराठा शिक्षण परिषदेचा पोंवाडा, देशी-चळवळीचा पोंवाडा, श्री० सयाजीराव महाराजांचा पोंवाडा, राष्ट्रीय सभेचा पोंवाडा, भनिराव महामुनिकृत सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें व सत्यशोधक समाजाचे नियम, व प्रतिज्ञापत्र, व उत्तम ग्लेझ कार्डावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र, हीं सर्व रंगीबेरंगी छापलेलीं असून प्रत्येकानें आरशांत जडून लावण्यासारखीं आहेत. व संग्रहीं कायमचीं ठेवण्यासारखीं आहेत' अशीं एकंदर सात पुस्तकें व तीन रंगीबेरंगी फार्म, व उत्तम कागदावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र; अशीं एकंदर तीन रुपये किंमतीस मिळतील. रोख पैसे पाठविले असतां किंवा व्ही. पी. नें मागविली असतां खालीं लिहिलेल्या पत्यावर मिळतील. पोष्ट खर्च निराळा पडेल.

### सुगंधित धूप

नित्य संध्या समयीं होम, हवन करण्यास अथवा पूजा, पाठ करण्याचे वेळीं अत्यंत उपयोगी ह्यामध्यें नानाप्रकारच्या सुगंधीत वस्तु, केशर, कस्तुरी, इ० किंमतीचे पदार्थ व हरतऱ्हेचीं औषधें मिश्र केलेलीं असून तो थोडा विस्तवावर टाकिला असतां उत्तम प्रकारचा सुगंध सुटतो. यामुळें दुर्गंधयुक्त विषारी हवेचा नाश होऊन उत्तम [illegible] प्राप्त होतें. ज्या घरामध्यें [illegible] नियमानें नित्य जपहोमादि [illegible] ठिकाणीं कलह, वैर, प्लेग, व्याधी [illegible] अपमृत्यू इत्यादी आपत्ती येऊं शकत नाहींत. हा धूप दर शेरास दीड रुपाया [illegible] मिळेल.

सत्यशोधक समाज ऑफिस

पोष्ट हिवरखेड रूपरावाचे ता० आकोट

नो. नं. ड ७९ जि० आकोला प्रांत वऱ्हाड

---

## विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार– खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जागरणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणानें डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- आलिबाग. मुंबई.

---

## ब्रह्मसिद्धांतमाला

### अथवा

### वेदांताचें युक्लीड.

रा. खंडो कृष्ण ऊर्फ बाबा गर्देकृत हा अपूर्व ग्रंथ अगदीं सरळ सोप्या मराठी भाषेंत युक्लीड धर्तीवर लिहिला आहे. या ग्रंथाचा लक्ष्यपूर्वक अभ्यास केला असतां ब्रह्मविद्येचीं तत्वें मनामध्यें चांगलीं बिंबून वेदांतावरील कोणत्याही पुस्तकाचें मर्म तेव्हांच समजेल. प्रकरणें १२, पृष्ठसंख्या ३४५, स्वदेशी मोहरेदार कागद, टाइप मोठा व ठळक. छपाई व बांधणी सुबक, किंमत १॥ टपाल हांसल निराळें पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें–

१ किर्लोस्करबंधु, किर्लोस्करवाडी, पो० कुंडल

२ म्यानेजर, श्रीरामतत्त्वप्रकाश प्रेस, बेळगांव.

नो० नं० ण २९

---

जेंव्हां डाक्टर व वैद्य यांची हीनिराशा होत, तेंव्हां सुद्धा सुख संचारक कंपनी मथुरा यांच्या

## सुधासिन्धु

पासून गुण येण्याची आशा राहतेच. कारण २० वर्षां पासून, लाखों मनुष्या कडून याची परिक्षा झाली आहे. बऱ्याच वर्तमान पत्राच्यां संपादकांनी व डाक्टरांनी, या बद्दल सार्टीफिकिटें दिलीं आहेत. सरकारांतून ही या औषधाची रजिष्टरी झाली आहे. या औषधाने कफ, खोकला, दम, हींवताप, पटकी ( काळरा ) शूल, संग्रहणी, आंव, अतीसार, पोट दुखी, घात्या, मळमळ, हांत पाय व कंबर दुखणे, संधिवात लहान मुलांचे हिरवे पिवळे जुळाब, आणि खोकला सर्वांस गुण येतो किंमत प्रत्येक बाटलीस -॥- आणे. सर्व औषधें विकणारा जवळ मिळते. बहुत करून प्रत्येक शहरांत आमचे एजंट आहेत व; प्रथम तेथें च शोध करावे जर न मिळेल तर आमचे कडून मागवावे. चालू वर्षाचे पंचांग सर्वांस फुकट मिळेल लहान गावात ही एजंट पाहिजेत; नियम मागवून पहावे

मांगविण्याचा पत्ताः—

क्षेत्रपाल शर्मा माळक

सुख संचारक कंपनी मथुरा

---

## जाहिरात

ऑईल एंजीन. पंप, दळण्यांचीं यंत्रें, तेलाचे घाणे, कापूस वटवण्याचे रेचे ह्मणजे जिन, इत्यादि संबंधीं कोणतीहो माहीती पाहिजे असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

दिवाकर यशवंत फाटक.

मेसर्स डंकन स्टेटन कंपनींतील ऑईल एंजिन एक्स्पर्ट (फील्डींग),

नो. नं. ढ ८० उमरावती.

---

### गुण न आल्यास पैसे परत !

ठिकठिकाणीं एजंट पाहिजेत ! !

इच्छितांनीं पत्रव्यवहार करावा.

॥ ॐनमो श्रीवीतरागाय ॥

### स्वदेशी अमृताचा नवीन शोध.

## जायफळार्कमधु.

प्राचीनकाळच्या एका जुन्या लेखावरून वरील औषधाचा शोध अत्यंत कष्टानें लागला आहे. कर्नाटक प्रांतांतील कण्तगुड नांवाच्या वनस्पतीप्रसिद्ध पर्वतांत कांहीं वैद्यमंडळीच्या शोधानें ही वनस्पती ह्मणजे झाडपाला क्वचित् क्वचित् मिळाली आहे या वनस्पतींच्या रसांत जायफळाचा रसार्क मिश्र करून हा '' जायफळार्कमधु '' यंत्र साह्यानें तयार केला आहे. हा मधु किंचित् पातळ असून खाण्यास अमृताप्रमाणें गोड व सुवासिक आहे. हा मधु खात गेल्यास प्राप्त होणारे गुण सदरहू जुन्या ग्रंथांत लिहिले आहेत ते फार वेळ टिकणारी कामस्थिती अनुभवास येते. हा मधु खाल्यानंतर एक दोन दिवसांतच गुणांश समजुं लागतो. ज्ञानेंद्रियांतील गेलेली शक्ती पहिल्यापेक्षां अंशमानानें अधिक वाढते. शरीरपिंड मजबूत आणि कांतीयुक्त होतो. रट्टे, गाल व शरीरावयव मांसल होतात. क्षयानें अगर कोणत्याही रोगानें मनुष्यास आलेली प्रेतवत् कळा तीस दिवसांत जाऊन अंगावरील सर्व शिरा भरतात व मनुष्य रक्तमांसानें भरतो, शौचास साफ होऊन भूक चांगली कडकडून लागते हा दाखला पहिले दिवशींच पडतो. एका सप्तकांतच शरिराचें वजन वाढूं लागतें. पर्मा व गर्मी यांनीं दूषित झालेलें शरीर निर्दोष होतें. मदोन्मत्तता येते. या औषधास पथ्य नाहीं कामविकार द्विगुणित होतो. नवा रोग असल्यास १० दिवसां पुरणाऱ्या एका बाटलीनें गुण येतो. व जुना रोग असल्यास ३ बाटल्यांनीं गुण येतो. १ बाटलीची किंमत १ रुपया. दोन बाटल्यांस १८१४, तीन बाटल्यांस २८१० दोन अगर तीन बाटल्या एकाच पार्सलांत भरून पाठवूं; ह्मणजे टपालखर्च जास्त पडणार नाहीं. टपाल खर्च वेगळा पडेल. कार्ड पाठवून आर्डर दिल्यास व्ही० पी०नें पाठवूं.

पत्ताः—सेक्रेटरी मेसर्स.

एम्. जी. आर.

नो. नं. ड ९३. श्रीजिनेंद्रप्रासादिक कंपनी,

हेड ऑफिस पोष्ट निपाणी. जि. बेळगांव

---

सूचना.—कोणताही माल गुणकारी ठरला ह्मणजे जिकडे तिकडे त्याची नक्कल सुरू होते. परंतु नांवाप्रमाणें गुणास पात्र होत नाहीं. अमचे येथें नकली औषधाचे कारखानेदार नुकतेच डोकें वर काढूं लागले आहेत तरी आमच्या ग्राहकांनीं आमचा ट्रेडमार्क व सीलबंद तपासून घेणें.

म्हैसूराज्य व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांचकडील आनररी असिस्टंट सर्जन मार्जी ज. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं आमच्या औषधें बारीक रीतीनें तपासून व पत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्यांतून आमचीं औषधें रोगांवर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आम्हास दिलें आहे. हे अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शेंकडा एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजीविनी

दातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्यस्तंभक,
रक्तशोधक, मनोत्साहक कांति व बुद्धिवर्धक सुवर्ण माक्षिक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शारिरीक मुख्य राजा जी धातु ती शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरूपी शत्रू उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा नाश होय सुखाचें मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षी पाहिजे ता दिवसांत एकदां तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथिलता, कमकी. गर्भाशयंची मुरळेके विकोष मुत्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, धातीतील रोग, मठ पाठ मर्माग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडुरोग मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याध. वातरोग, निद्रानाश पिसावर. बाळंतरोग, मधुमेह नमाट परमा, दुष्टमैथुननें आलेली कुजता इत्यादि अनेक विकार साफ नें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्ध वृद्धी, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व साखर पथ्य लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकेटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर किंमतीची घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल अनुपानखर्च सोबत दिला व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील.

दरः—एकदम ३९ गो० १ रु०, ७९ गो० २ रु० ११९ गो० ३ रु० १२९ गो० ४ रु० २७९ गो० ६ रु० ११० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः—यानें पडळ. साहर, फुल, खुपऱ्या. बिंदु, कांच इत्यादि डोळ्यांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा दिवसांत मुत्राची लाली, संकोच पुस्त्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें मिळत नाहीं. बा० किं० १॥ भार बाटलीस रु० २

४ दंतवज्रवर्धक पूडः—दंत संबंधीं सर्व विकार उत्तम बरे होतात

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें पुड्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्णः—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात रु. ६ आणे

७ सर्व शिपज्वरः—औषध घेतांच कसाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नाहींत. १० पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधानें हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरू होतांच सर्वांनीं संग्रहीं तापावर गोळ्या, गांठीस मलम, घात चढू नये म्हणून धातावर मात्रा ठेवून याव। एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेल, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा क्याटलॉग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म खाक, गुटीका, आसवें, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्ची सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोगीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाचें निदान चिकित्सा कळवूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून वाटेल त्यानें करावा आमचे जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिर्ले वगैरे गावांतून ते पुर्वावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आम्हास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली बोरवी व्यापार ज्याची तो स्वतंत्र आहे आम्हास ग्राहकांस सुचविणें हव कीं आमचा कारखाना आज सतत १६।२० वर्षें अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधानें कोट्यवधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आम्ही जाहिरात न वाढवितां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकारीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उन्नतावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटाटीस यशहि बरेंच आलें आहे. करितां सकळ आर्यबंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरावीं, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागणें ती खालील पत्यावर बिनचुक मागवावी म्हणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ता:—सुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

---

ORIENTAL GOVERNMENT

## LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED IN 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

Head—Quarters—Nagpur C. P.

**FUNDS EXCEED THREE CRORES**

**AND**

**FORTY SEVEN LAKHS**

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating heir clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others employing portion of their annual income or profits in effecting life policies create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT.

Nagpur

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाड समाचार.

Berar Samachar.

वर्ष ४४ ] आकोला—सोमवार तारीख १९ माहे दिसेंबर सन १९१० इ० [ अंक ४१



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

१ ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील त्यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.



### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मार्गे राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक / G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ ( एजंट
नं ७३

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकेचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकेच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ ३/४ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक G. A. Phillips.
आकोला २१।९।१० ( एजंट.

### NOTICE.

D. Y. Phatak oil-engine expert for Fielding oil engines (as supplied by Messrs. Duncan Stratton and Co. of Bombay) can be consulted as to the purchase condition and value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:- C/o N. G. Ketkar Esq
Pleader
Amraoti

No. N. Dh. 81

### त्वरा करा त्वरा करा.

अशी संधी पुन्हां यणार नाहीं.




उत्तम प्रकारचे इमिटेशन
रस्कोप सिस्टिम

नांवचे खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान,

मिळण्याचा पत्ता
खोजा बक्षीभाई इस्माल
मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं. ण ४१

WANTED.— At once active agents everywhere to sell large consignments of American goods including watches &c. Salary Rs. 20 and 5 o/o commission. For particulars apply with one anna stamp to—

Hardinge + Co,
Merchants,
133. Canning street, Calcutta.


### नोटीस,

सयद अनवर साहेब चवकीदार राहणार पातुरशेखबाबू यांस:—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं चिचखेड येथील सर्व्हे नंबर २६ ए. ८ गुं. ३० आकार रु. ८॥. निशाणी 'इनम' हें शेत चालू सालाकरितां तुह्मी स्वामीत्वाचे ९० रुपये कबूल करून वाहण्यास घेतलें आहे. ते रुपये नागदिवाळीला देण्याचा करार पुरा झाला असून तुह्मी अद्याप रक्कम पोंचती केली नाहीं. यापुढें तुह्माला ९० रुपयावर दरमहा दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज द्यावें लागेल या नोटिशीनें आठ दिवसांची मुदत दिली आहे. माझी सवत नामे सारजाबाई इला इस्टेटीसंबंधानें व्यवहार करण्याचा अधिकार नाहीं. तेव्हां तुह्मी लबाड लोकांच्या नादीं लागून तिला रक्कम देऊं नये ह्मणून मुद्दाम अगाऊ जाहिर खबर दिली आहे. आठ दिवसांत रकमेचा उलगडा न झाल्यास कोर्ट मार्फत योग्य ती तजवीज करून सर्व रक्कम नुकसानीसुद्धां वसूल करण्यांत येईल. कळावें. तारीख ११।१२।१० इसवी

सही
चंद्रभागाबाई कवजे नारायणराव
देशमुख तर्फे कुलमुखत्यार
लक्ष्मणराव डोंगरसिंग देशमुख
मुलकी पाटील रा०
पातुरशेखबाबु द. खु.

नो० नं० ण ७२

### जाहिरात

सर्वत्र गांवचे आणि परगांवचे लोकांस कळविण्यांत येतें कीं, मी माझें तर्फे जयराम वा विठोबा राहणार कारल यांस मुखत्यार नेमिले होते ते त्याचें मुखत्यारपत्र त्याचेंपुरतें रद्द केलें आहे. या पुढें त्याच्याशीं माझ्या संबंधाचा कोणतेच प्रकारचा व्यवहार करूं नये. आणि यापूर्वी जो कांहीं केला असेल तो मजला येऊन कळवावा. आठ दिवसांच्या आंत न कळविल्यास त्याचे जबाबदारीस मी पात्र नाहीं. कळावें ता. १४-१२-१० इ.

दस्तूर गोविंद बापूजी पी. रा. आकोला.

सही
सकरपुरी गुरु मंगलपुरी राहणार सोनाळे
ता० जळगांव द० खु०

नो. नं ण ७३

### नोटीस.

नोटीस बेशमी जयराम वा॥ विठोबा राहणार कारल ता० आकोट यांस—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं, मी तुह्मांस माझे तर्फे कोर्टातील कामें करण्यास मुखत्यार नेमिले होते. तुमची वर्तणूक खोटेपणाची वकीलाचे येथील जमाखर्चावरून दिसून आल्यावरून तुह्मास सूचना करण्यांत येते कीं मी तुमच्यापुरतें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. या पुढें माझे करितां तुह्मी कोणतेंच प्रकारचें काम करूं नये. आणि जे रुपये पंचवीस वकीलास न देताना स्वतः तुह्मी आपले उपयोगास आणले ते माझे मजला आणून द्यावेत, असें न कराल तर जंगम मालाचा लबाडीनें गैरशिस्त उपयोग केल्याबद्दल तुमचेवर फौजदारींत काम चालवीन. जितके दिवस तुह्मी माझे तर्फे काम केलें तो सर्व हिशेब मजला समजावून द्यावा. असें नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत न कराल तर पुढें मी तुमचा कोणतेच प्रकारचा जबाबदार नाहीं. कळावें ता. १४-१२-१० इसवी दस्तूर गोविंद बापूजी पी. रा. आकोला

सही
सकरपुरी गुरु मंगळपुरी राहणार सोनाळे
ता० जळगांव द० खु०

नो. नं. ण ७४

### नोटीस

नोटीस बेशमी— जानू वल्लद तिमाजी करगाळे जात माळी राहणार पातुरशेखबाबू यांस:—

खालीं सही करणार यांजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं मौजे मुभानपूर ता० बाळापूर येथील शेत सर्वे नंबर १४२ एकर ७१३३ आकार रुपये ८। निशाणी वडाचे. हें शेत चालू साला करितां स्वामीत्वाचे रुपये ६० देण्याचे कबूल करून तुह्मी वहाण्यास घेतलें आहे. ते रुपये नागदिवाळीला देण्याचा करार पुरा झाला असून तुह्मी आजपावेतों रक्कम पोंचती केली नाहीं. यापुढें तुह्माला ६० रुपयावर दरमहा दरशेकडा २ रुपये प्रमाणें व्याज द्यावे लागेल. तुह्मास या नोटिशीनें ८ दिवसांची मुदत दिली आहे; माझी सवत नामे सारजाबाई इला इस्टेटीसंबंधानें व्यवहार करण्याचा अधिकार नाहीं. तेव्हां तुह्मी लबाड लोकांच्या नादीं लागून तिला रक्कम देऊं नये. ह्मणून मुद्दाम आगाऊ जाहिरखबर दिली आहे. आठ दिवसांत रकमेचा उलगडा न झाल्यास कोर्ट मार्फत योग्य तजवीज करून नुकसानीसह सर्व रक्कम कोर्ट खर्चासुद्धां वसूल करण्यांत येईल. कळावें. ता० ११-१२-१० इ०

सही
चंद्रभागाबाई कवजे नारायणराव देशमुख
तर्फे कुलमुखत्यार लक्ष्मणराव डोंगरसिंग
देशमुख मुलकी पाटील रा०
पातुरशेखबाबू द० खु०

नो नं० ण ७५

### नोटीस.

नोटीस बेशमी आनंदा वा॥ रोडी तेली राहणार मोरगांवभाकऱ्याचें तालुके आकोला यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे मोरगांवभाकऱ्याचें येथील शेत सर्वे नंबर ३७ पैकीं १४ एकर ९ गुंठे आकार रुपये २७ याचें खातें तुमचें नांवें असून हें शेत अंबाई मर्द खंडु इंच मालकीचें असून सदरहु अंबाई ही माझी चुलती होती. ही मेल्यानंतर शेताचें खातें तिची मुलगी मुक्ता इचें नावानें झालें व तिच शेत वाहात होती. मुक्ता ही अजमासें पांच वर्षे झालीं मयत झाली. तिजला जवळचा वारस कोणी नाहीं तिनें सदरहु शेत पांच वर्षे जगदेव पाटील यांस वहितीस दिलें होतें त्याची पांच वर्षे पुरीं झाल्या नंतर सदरहु शेतावर तुमचा हक्क नसतांना तुह्मी संभु माळी व नामो वोची यांस बटाईनें दिलें आहे. सदरहु शेताचा हिंदुधर्माप्रमाणें मालक आहे. तरी ही नोटीस पावल्या तारखे पासून आठ ८ दिवसांचे आंत सदरहु शेताचा बटाईचा माल तुह्मी अगर बटाईदारांनीं माझे घरीं आणून द्यावा. न दिल्यास तुमचेवर व बटाईदारावर फिर्याद करून कोर्टखर्चासह मालाची नुकसानी भरून घेतली जाईल. तसेंच सदरहु शेत तुह्मी कोणास गहाण खरेदी देऊं नये. बटाईनें व पठ्यानें वहितीस देऊं नये. दिल्यास तो सर्व व्यवहार रद्द असून रकमेचा बोजा सदरहु शेतावर राहणार नाहीं व तसेंच सर्व लोकांस जाहिर रितीनें कळविण्यांत येतें कीं सदरहु शेत आनंदा वा॥ रोडी तेली यांजपासून कोणी गहाण खरेदी बक्षीस घेऊं नये व पठ्यानें अगर वहितीनें सुद्धां घेतल्यास तो सर्व व्यवहार रद्द समजला जाऊन जें नुकसान होईल त्याबद्दल फिर्याद करून घेतलें जाईल व या नोटिसीचा खर्च भरून घेतला जाईल. कळावें. तारीख ११।१२।१० इसवी

सही
सखाराम वा॥ सोनाजी तेली राहणार
आकोला नबाबपुरा निशाणी खुद.

नो० नं० ण ७६

८ दिवसात दुकान आमचा …

## नोटीस

नोटीस बेशर्मा गणू वल्द सोनाजी मामटी राहणार बाठोंड हल्लीं मुक्काम पातुर शेखबाबु यांस.

खालीं सही करणार याजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं मौजे जीराईत पातुर ता० बाळापूर येथील शेत सर्वे नंबर १९७ एकर ४०६ आकार रुपये ७ निशाणी खोरीचे. हें शेत चालू साला करितां स्वामीत्वाचे रुपये ३५ देण्याचे कबूल करून तुह्मी वहाण्याला घेतलें आहे. ते रुपये नागदीपवाळीला देण्याचा करार पुरा झाला असून तुह्मी आजपावेतों रक्कम पोंचती केली नाहीं. यापुढें तुह्माला ३५ रुपयावर दरमहा दरशेकडा २ रुपये प्रमाणें व्याज द्यावें लागेल. तुह्मास या नोटिशीनें ८ दिवसांची मुदत दिली आहे. माझी सवत नामे सारजाबाई इला इस्टेटीसंबंधानें व्यवहार करण्याचा अधिकार नाहीं. तेव्हां तुह्मी लबाड लोकांच्या नादीं लागून तिला रक्कम देऊं नये. ह्मणून मुद्दाम आगाऊ जाहिरखबर दिली आहे. आठ दिवसांत रकमेचा उलगडा न झाल्यास कोर्ट मार्फत योग्य तजवीज करून नुकसानी सह सर्व रक्कम कोर्ट खर्चासुद्धां वसूल करण्यांत येईल. कळावें. ता० ११-१२-१० इ०

सही

चंद्रभागाबाई जवजे नारायणराव देशमुख तर्फे कुलमुखत्यार लक्ष्मणराव डोंगरसींग देशमुख मुलकी पाटील रा० पातुरशेखबाबू द० खु०

नो नं० ण ७७

---

## नोटीस,

नोटीस बेशमी सोनाजी वल्द नवलाजी माळी राहणार पातुरशेखबाबू ता० बाळापूर यांस:—

खालीं सही करणार यांजकडून कळवण्यांत येतें कीं मौजे बागाईत पातुर येथील सर्व्हे नंबर १६ ए. गु. २०३९ आकार रु. ४ निशाणी 'मळा' हें शेत चालू सालाकरितां तुह्मी स्वामीत्वाचे ५० रुपये कबूल करून वाहण्यास घेतलें आहे. ते रुपये नागादिवाळीला देण्याचा करार पुरा झाला असून तुह्मी अद्याप रक्कम पोंचती केली नाहीं. यापुढें तुह्माला ५० रुपयावर दरमहा दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज द्यावें लागेल. या नोटिशीनें आठ दिवसांची मुदत दिली आहे. माझी सवत नामे सारजाबाई इला इस्टेटीसंबंधानें व्यवहार करण्याचा अधिकार नाहीं. तेव्हां तुह्मी लबाड लोकांच्या नादीं लागून तिला रक्कम देऊं नये ह्मणून मुद्दाम अगाऊ जाहिर खबर दिली आहे. आठ दिवसांत रकमेचा उलगडा न झाल्यास कोर्ट मार्फत योग्य ती तजवीज करून सर्व रक्कम नुकसानीमुद्धां वसूल करण्यांत येईल. कळावें. तारीख ११।१२।१० इसवी

सही

चंद्रभागाबाई जवजे नारायणराव देशमुख तर्फे कुलमुखत्यार लक्ष्मणराव डोंगरसिंग देशमुख मुलकी पाटील रा० पातुरशेखबाबु द. खु.

नो० नं० ण ७८

---


## के० प्रो० बाळाजी प्रभाकर मोडक यांनीं तयार केलेली

## जंत्री

शालिवाहन, विक्रम, राजशक, सुरसन, फसली, हिजरी, आणि इसवी साल, महिना, तिथि, तारीख, व वार दाखविणारी. यांत इ. सन १७२८ पासून इ. सन १९१३ पर्यंत सर्व माहिती तपशीलवार व पद्धतशीर दिलेली सांपडेल.

ऐतिहासिक..................काढितां येईल.

पुरवणीसह जंत्रीच्या प्रतीस किं. रु. २॥

इ. स. १८९४ ते १९१३ पर्यंतची फक्त. पुरवणीच घेणें असल्यास किं. आणे ६

वि. ब. मोडक.

* रविवार पेठ कोल्हापूर सिटी.

स. म. कंदी.

* याच पत्यावर प्रो. मोडक यांची खालील पुस्तकेंही विकत मिळतील.

| | रु० |
|---|---|
| रसायन शास्त्र निरिंद्रिय उ. भाग १ | ....२ |
| रसायन शास्त्र सेंद्रिय पू. भाग १ | ३ |
| सदर भाग २ | ५ |
| सृष्टिशास्त्र (उष्णता) पूर्व भाग २ | १॥ |
| सृष्टिशास्त्र (विद्युत् आणि चुंबन) उ. भाग १ | २॥ |
| सृष्टिशास्त्र ध्वनि आणि प्रकाश उ. भाग २ | २॥ |
| पदार्थ वर्णन (खनिज पदार्थ) | ॥। |
| पदार्थ वर्णन उद्भिज्ज व प्राणिज पदार्थ | १ |
| प्राणी शास्त्र | १। |

ऐतिहासिक माहिती करितां जुने कागदपत्र पाहणारांस, मुलकी व दिवाणी कामगारांस, वकीलांस, जुन्या सनदा, जुने दस्तऐवज वगैरे पाहूं इच्छिणारांस शाळांत व सर्व कचेऱ्यांत या जंत्री वरून एकदम तारीख, तिथि, वार, महिना, व इतर तपशील काढितां येईल.

नो. नं. ण ७९


---


## जाहिरात

वर्षफल—प्रत्येक महिन्याचे फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ८= जन्मकाल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

पत्ता—

भा० गो० पंडित,

मु० व पो० लोणखेड

प. खानदेश.

नो० नं०ण० ३०


---

## नोटीसिचा जबाब.

नोटीस बेशमी रतनसिंग रजपुत राहणार मुंडगांव तालुका आकोट जिल्हा आकोला.

यांस:—

खलीं सही करणार यांजकडुन नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी दिलेली ता. २०।१०।१०ची नोटीस मला ता. १२।११।१० ला पावली. परंतु ती नोटीस खोटी आहे. कारण तुह्मी खरेदीचे रुपये अगोदर घेतलेल्याची पावती आहे व निशा वगैरे कांहीं न घेतां खरेदी नोंदून दिलें आहे. आह्मी गहाण दिलें तर तुमचेच कर्जाचे रुपये व तुमचे खरेदीचे भरण्यांतील रुपयांत गहाण दिलें आहे. वरून तुह्मांस जबाब देण्यांत येतो कीं तुह्मी शेतांत वगैरे जाऊं नये व पुन्हां खोटी नोटीस केल्यास तुमचेवर काम चालविलें जाईल कळावें. ता. १९ माहे डिसेंबर सन १९१० इसवी.

सह्या

मोतीराम वल्द कालुरम.

रामसिंग वल्द रतनसिंग उभयता रा. मुंडगांव निशाणी आंगठा असे.

नो० नं० ण ८०

---

## नोटीस.

रा० रा० गुलाबराव दौलतराव देशमुख व मल्हारराव दौलतराव देशमुख उभयतां राहणार कवडगांव ता० चिखली यांस:—

लक्ष्मीबाई जवजे आबाराव देशमुख रा० हल्लीं राजुरे ता० मलकापूर नोटिशीनें जहिर करितें कीं माझ्या नवऱ्यास मरण्यास अजमासें ४ वर्षें झालीं. माझ्या पोटीं पुत्रसंतान नाहीं. स्थावरजंगम मालमत्तेची व त्याचप्रमाणें घरचा कारभार पाहण्यास कोणी नसल्यानें मला दत्तक घेणें जरूर आहे. सबब आपल्या बिरादरापैकीं कोणी विश्वासु समजुतदार मुलगा असल्यास किंवा अशा प्रकारचा इसम तुमचे पाहण्यांत नसल्यास मला दत्तक माझ्या पसंती प्रमाणें घेण्यास परवानगी असावी. या बाबतींत काय तो जबाब नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८।१५ दिवसांत लेखी द्यावा. त्यानंतर मग तुमचे कांहीं सांगणें नाहीं समजुन मी वाटेल त्यास दत्तक घेईन. कळावें ता० १२।१२।१० इ.

सही

लक्ष्मीबाई जवजे आबाराव देशमुख रा० राजुरे नि. बांगडी

दस्तुर मुगुटराव केशवराव देशमुख रा. राजुरे द० खु०

नो० नं० ८१

---

## नोटीस

देवाजी, झिंगराजी, व रायभानजी वल्द जनाजी धोत्रे सर्वत्र राहणार धोत्रेजहागीर ता. मुर्तिजापूर यांना —

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आह्मास गहाणखत लिहून दिलें. त्या गहाणखताच्या व्याजाच्या फेडींत शेत सर्वे नंबर १०७ यातील गुदस्त सालचें उभें पिक आह्मास देऊन त्याबद्दल करारचिठ्ठी रुपये २७५ ची ता. २०।१०।१९०९ इसवी रोजीं लिहून दिली. त्या प्रमाणें आह्मांस फक्त बिनपाण्याचा कापुस एक खंडी बारा मण याचे बाजारभावाप्रमाणें गुदस्त सालचे रु. ६५ व पातीचा हलका बारा मण याची किंमत रु. १५ एकुण रुपये ८० चा व पेंड्या १४०० दरशेकडा एक रुपया प्रमाणें रु. १४ एकूण रु. ९४ चा माल आह्मास पावला. बाकी सर्व माल तुह्मी बळजबरी करून घेऊन गेलांत तर आह्मांस रुपये १७५ ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत आणून देणें जर आणून दिले नाहींत तर गहाणखत दावयाचे वेळीं व्याजांत रु. ९४ वसूल घेतला जाईल अधिक घेतला जाणार नाहीं ही नोटीस दिली सही. ता. १२।१२।१०

सह्या

सदोबा गोदाजी साबळे राहणार खीनखीनी तालुके मुर्तिजापूर निशाणी रेघ.

दस्तुर भालचंद्र नथो राहाणार आकोला.

नो० नं० ८२

---

## नोटीस

नोटीस बेशमी सिताबाई जवजे नवलाजी ठाकरे कुणबी राहणार व्याळे तालुका बाळापूर जिल्हा आकोला ईस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तूं मजला दत्तक घेऊन आज मित्तीस बारा महिने झाले, व तूं आपली सर्व स्थावर जंगमइस्टेट माझे नावांनीं करून दिली. व शेत सर्वे नंबर १२ याचें खातें संभाजी वा। नारायण मळसणे याचे नांवानीं असून त्यांतही माझा निम्मे हिस्सा आहे. तो व स्थावर जिनगी विक्री अगर गहाण, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, किंवा खरेदी करून कोणी घेऊं नये घेतल्यास ज्याचा तोच जबाबदार राहिल. व त्याचा ताबा आह्मी देणार नाहीं, याउपर कोणी व्यवहार केल्यास रितीप्रमाणें तजविज करणें भाग पडेल, कळावे. ता० १०-१२.१०

सही,

खुशाल वा। नवलाजी निशाणी खुद्द हातचा अंगठा.

नो. नं. ण ८३

---

## नोटीस

नोटीस बेशमी शेवंती मर्द मोतीपुरी गोसावी हल्लीं मुक्काम भोड ता० अकोलें. ईस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात देण्यात येतें कीं, तूं माझी लग्नाची बायको असून तूं दोन वर्षें आपले भावाचे घरीं गेली आहेस व तुजला मी स्वतः बरेच वेळेंस आणण्यास आलों असतां येतें ह्मणून कबूल करतेस ? पण येत नाहींस या करितां मुद्दाम या नोटिशीनें कळवितों कीं, तूं माझे येथून जेव्हां गेलीस त्या वेळेस जे तूं आमचा डागीने चांदीसोन्याचे घालून गेलीस त्या डागीन्यासुद्धां तूं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचें आंत माझे घरीं यावें. जर तूं न आलीस तर तुझेवर रितीप्रमाणें दावा करून तुला डागीन्यासुद्धां ताब्यांत घेतला जाईल हें खूप समजावें. ही नोटीस लिहून दिली सही. ता. ११ माहे दिसेंबर सन १९१०

सही,

मोतीपुरी गुरु केशवपुरी राहणार चांगलवाडी ता० आकोट याची निशाणी खुद्द.

नो. नं. ण ८४

---

## नोटीस

अबदुल कयुम महमंद अली रा० ताजनापेठ घर नं० ६४१ आकोला

यांस:—

जुसफ अबदुल रहेमान कच्छी हा नोटीस देतो कीं वरील घराचा सहा आण्याचा हिस्सा तुह्मास नूरखानुचे फिर्यादीचे रुपये ४०० देण्यासाठीं विकला होता. ती रक्कम अद्याप दिली नसल्यामुळें तो व्यवहार रद्द असे. सदरहू घरापैकीं दहा आण्याचा हिस्सा रा० महमंद अली अबदुल हुसेन यांणीं अजमासें ४ महिने झाले विकला आहे. सदरहू संबंध घरांत तुह्मीच राहत आहां. त्या मकानाचें भाडें वरील मुदतीपासून तुमचवर चढत आहे. तें भाडें तुह्मी नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर

घ्यावी. नाहीं तर आम्ही कायदेशीर रीतीनें वसूल करूं कळावें ता. १०।१२।१०

बईची जबनीशी सरकारांत आहे कीं ज्या वेळीं मी नंबर विकत त्या वेळीं

नोटीस देशमुख — दुखेखा वल्द सरदारखा मुसलमान रा० पातूर शेखबाबू ता०





## नोटीस

श्री मर्द गोपाजी माळी रा. पिंजर आकोला. हिस:

नोटीस देणार गोपाजी वल्द गोरख ... रा. पिंजर ता. आकोला तुमची ...डसमाचार पत्रांतील तारिख ९ जून ...१९११ची नोटीस पावली. नोटीसी प्रमाणें माझे येथें नोटीस पावतांच राहावयास ...वें व माझ्याशीं चांगले प्रकारें संसार करावा. मी तुजला पूर्वीपासून बाळगण्यास तयार असून तूंच माझे येथें राहिली नाहींस सबब तूं पोटगीसाठीं केलेले कर्जां बद्दल मी जबाबदार नाहीं. व माझे येथें राहण्यास आल्याशिवाय मी तुजला पोटगी देणार नाहीं. कळावें ता० १७-६-११ इ.

सही

गोपाजी वा गोरख नि० खु० हातची

नो. नं. २६७ दस्तुर जानकीसींग बाहादुरसींग

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस मी खालीं सही करणार जाहिर नोटीशीनें कळवितों कीं तोताराम वल्द दवलत व रामु वल्द दवलत उभयता राहणार लासूर हे खालीं सही करणाराचे औरस पुत्र आहेत परंतु ते दोन्ही ...ी माझे मताप्रमाणें व चांगल्या रीतीनें वागत नसून माझे जिनगीची अफरातफर करण्याच्या विचारांत आहेत. त्याच्या जवळ यांच्या मालकीची अगर कमाईची कोणताही जिनगी नाहीं. तरी त्याजपासून कोणतीही जिनगी कोणी विकत घेऊं नये अगर कोणत्या प्रकारें घेऊं नये व त्यांच्याशीं कोणताही व्यवहार करूं नये. केल्यास याची जबाबदारी आमचेवर नसून ते सर्व व्यवहार निरर्थक होऊन व्यवहार करणारे विनाकारण बुडूं नयेत ह्मणून ही नोटीस दिली सही कळावें ता० २२-६-११

दस्तुर नामदेव सदाशीव वकील आकोला

सही

दवलत रतन पाटील निशाणी हातची रेघ

नो. नं. २६८

## नोटीस

नोटीस बेशमी कासमखा वा॥ उमरखा व वजीरखा वा॥ मुरादखा मुसलमान उभयता रा० आकोला शहर यांस नोटीस देणार लक्ष्मी मर्द मपत अनाजी तांबटकार रा० आकोला शहर इजकडून नोटीस देण्यांत येते कीं ता. २२।१२।१० इसवीचे पाट्यावरून बोकापूर तालुके आकोला येथील शेत ... ११ एकर ३०२४ गुंठे यांतील ... आमचे मालकीचा आह्मी तुह्मांस ... ह्मणजे १९१०।१९११ व ... १२ या दोन वर्षांचे पीक ... दिला असून त्या पट्या... सदरहु आमचें शेत ताबडतोब ... वहीवाट करण्याची तसें न ... तुह्मी तसेंच आजपर्यंत ... न आह्मास खास दिसतें ... बंधीं काहीं तरी विश्वा... चे मनांत आहे. जरी ... पट्टा लिहून घेतला आहे, सदरहु शेत तुमचे

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मी तुम्हास मुखत्यारपत्र ता० ७।१२।१० इ रोजीं दिलें होतें कारण आतां माझ्या सर्व असाम्याची आ पसांत समजूत होवून गेली आहे. या नोटिशीनें आपणास कळविण्यांत येतें कीं. मी आपणांस मुखत्यारपत्र दिलें तें नोटी-स पावल्या तारखेपासून रद्द केलें आहे. कळावें ता० १७-१२-१०

सही मारवाडींत

सुखदेव कन्हयालाल द० खु०

C/o कन्हयालाल चुनीलाल साहु

नो. नं. ण ८९ दुकान आकोट

---

नोटीस बेशर्म—- दुलेखा वलद सरदारखा मुसलमान रा० पातूर शेखबाबू ता० बाळापूर यांस:—

खलीं सही करणार याजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं मौजे पट्टी अंबराई येथील शेत निशाणी बेरीची पट्टी हें शेत चालू साला करितां सामायकाचे रुपये ३० देण्याचे कबूल करून तुम्ही वहाण्यास घेतलें आहे ते रुपये नाग-दिवाळीला देण्याचा करार पुरा झाला असून तुम्ही आजपावेतों रक्कम पोचती केली नाहीं. यापुढें तुम्हाला ३० रुपयावर दरमहा दरशेकडा २ रुपये प्रमाणें व्याज द्यावें लागेल. तुम्हास या नोटिशीनें ८ दिवसांची मुदत दिली आहे. माझी सवत नामें सारजाबाई इला इस्टेटीसंबंधानें व्यवहार करण्याचा अधिकार नाहीं. तेव्हा तुम्ही लबाड लोकांच्या नादीं लागून तिला रक्कम देऊं नये. ह्मणून मुद्दाम आगाऊ जाहिरखबर दिली आहे. आठ दिवसांत रकमेचा उलगडा न झाल्यास कोर्ट मार्फत योग्य तजवीज करून नुकसानीसह सर्व रक्कम कोर्ट खर्चासुद्धां वसूल करण्यांत येईल. कळावें ता० ११ १२ १० इ०

सही

चंद्रभागाबाई जवजे नारायणराव देशमुख तर्फे कुलमुखत्यार लक्ष्मणराव डोंगरसींग देशमुख मुलकी पाटील रा पातुरशेखबाबू द० खु०

नो नं० ण ९०

---

## नोटीस,

नोटीस बेशर्मी—- देवजी वलद बाहिर माळी वगाडे राहणार पातूर शेखबाबू ता० बाळापूर यां :--

खालीं सही करणार यांजकडून कळवण्यांत येतें कीं मौजे सुभानपूर ता. बाळापूर येथील सर्व्हे नंबर १४ ए. गुं. १२०१२ आकार रु. २० निशाणी 'गवाहिचे' हें शेत चालूं सालाकरितां तुम्ही स्वामीवाचे ५० रुपयें कबूल करून वाहण्यास घेतलें आहे. ते रुपये नागादिवाळीला देण्याचा करार पुरा झाला असून तुम्ही अद्याप रक्कम पोचती केली नाहीं. यापुढें तुम्हाला ५० रुपयावर दरमहा दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज द्यावें लागेल या नोटिशीनें आठ दिवसांची मुदत दिली आहे माझी सवत नामें सारजाबाई इला इस्टेटीसंबंधानें व्यवहार करण्याचा अधिकार नाहीं. तेव्हां तुम्ही लबाड लोकांच्या नादीं लागून तिला रक्कम देऊं नये ह्मणून मुद्दाम अगाऊ जाहिर खबर दिली आहे आठ दिवसांत रकमेचा उलगडा न झाल्यास कोर्ट मार्फत योग्य ती तजवीज करून सर्व रक्कम नुकसानीसुद्धां वसूल करण्यांत येईल. कळावे. तारीख ११।१२।१० इसवी

सही

चंद्रभागाबाई जवजे नारायणराव देशमुख तर्फे कुलमुखत्यार लक्ष्मणराव डोंगरसिंग देशमुख मुलकी पाटील रा० पातुरशेखबाबु द. खु.

नो० नं० ण ९१

---

[ मागील अंकावरून पुढें चालूं. ]

## अंक ४ था.

### प्रवेश दुसरा

स्थल— अरण्यांतील दरी.

( घाबरलेला स्वार्थपरायण आश्चर्यानें डोंगराच्या कड्याकडे पहात प्रवेश करतो )

**स्वार्थपरायण**– काय धाडसाची बायको. एवढा उंच कडा चढून त्या खिडकींतून ती बाहेर पडली कशी! गुहेचीं सर्व तोंडें बंद करून अन्नपाणी टाकण्या करितां एक खिडकीच कायती मोकळी ठेविली होती मी. वाहवा! आजपर्यंत अनंत स्त्रिया, धनवान लोक, आणून याच गुहेंत कोंडून ठेवून अंतीं याच हातानें त्यांचे गळे दाबून पुढील खोल दरींत त्यांना फेंकून दिलें. त्यांच्या प्रेतांनीं ती दरी ही भरत आली आहे. पण असा मरदार छातीचा कोणीच आढळला नव्हता मला. आणि ह्मणूनच मी या गुहेवर विश्वासून बसलों होतों. पण—

पद

किती विशाल धृतिची युवती ॥ होति ॥
वाहवा वा ॥
दुरगम या गव्हरा मधोनी ॥ लंघुनि गिरिपथ आक्रानिती ॥ झालि ॥ कुंठित केले तिनें मला परि ॥ मशक वधी जणु उरगपती
॥ जणु ॥ १ ॥

आतां ती बिजापुराला जातांच मला पकडण्या करितां लोक घेऊन येईल. सर्वच बाजूंनीं माझा कोंडमारा होण्याची वेळ आली आहे आता. व्याधी अंग व्यापीत आहे. व ही नवीन चिंता सर्वथैव ग्रासीत आहे. कष्टानें साध्य झालेलीं हीं दोन्ही फळें चाखण्यास मिळतीं तर फार उत्तम होतें. असो. आज नलिनीची कोणतीही तकरार न जुमानतां आपली मनीषा पूर्ण करून घेणार. कारण आतां वेळ केव्हां कशी येईल याचा नेम नाहीं. माझ्या या सुरक्षित गुप्त ठिकाणाचा माग ती चांडा-ळीण जगाला देणार. मग कटाचा स्फोट होऊन माझा सर्वथैव घात होणार. शिवाय—

पद

शोषिता जल जलधीचें फोडिता शिळेचें ॥
खणुनि कुंभिनीचें कळतें अंतरंग सारें
॥ धृ० ॥
भापणें व्यक्त होतें तें काधि कधी शठाचें ॥
मृदु तसें विमलादर्शसम काय ज्याचें ॥
हृदय प्रगट नुमजे कोणा तया कामिनीचें ॥ १ ॥

या विषयीं मनाशीं बालंबाल खात्री झाली. पुढें मग मृद्दातांचाहि तपास करूं. पहा-डांनीं तटबंदी केलेल्या या रानांतून ती बाहेर पडली नसेल बहुतकरून.

( जातो. )

( दुसरा प्रवेश समाप्त. )

---

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | ९९॥। |
| मुंबई व्यांकेची सोन्याची चीप दर तोळ्यास | | २३॥।=॥ |
| चांदी | | ७२॥ |
| जवारी नवी | ४० | ५० |
| गहूं | | ४॥। |
| गहूं बनशी | | ११० |
| चणे | | ३॥। |
| तेल | | ८ |
| सरकी | | ११॥ |
| तुप | १० | ११ |
| कापूस | ८० | ९० |

बांकीपूर येथील डेप्युटी मॅजिस्ट्रेटसाह्यांच्या कोर्टांत मेसर्स एस. रोसिउद्दीन आणि आर. बी लाल या बॅरिस्टरद्वयांनीं आर. रेल्वेचे असि. ट्रॅ. सुपरिन्टेंडन्ट .सी. सी. चेसने यांजविरुद्ध फिर्याद केली आहे. फिर्यादीचें असें ह्मणणें आहे कीं कांहीं दिवसांपूर्वी बांकीपुर स्टेशनावर मि० लाल हे दुसऱ्या वर्गाचें तिकिट घेऊन पाहिल्या वर्गाच्या डब्यापुढें उभे असतां आरोपीनें त्यांच्यावर हल्ला केला व बेअदबी केली. मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं आरोपीवर समन्स सोडलें आहे.

सन १९११ च्या सप्टेंबर महिन्यापर्यंत कलकत्ता ज्यूट मिल्स हल्लींप्रमाणें आठवडाभर तास चालू राहणार आहेत, असें ह्मणतात.

गेल्या शनिवारीं कोमिल्ला येथील पोलिसांनीं एक मेडिकल प्रॅक्टिशनरच्या आणि एका व्यापाऱ्याच्या घरांची झडती घेतली, या झडतींत 'मातृपूजा' आणि 'मातृमूर्ति' हीं व स्वदेशी व्रतावर रचलेल्या पद्यांचीं दोन पुस्तकें पोलिसांना मिळालीं आहेत.

बरमा चीफ कोर्टाच्या पुनर्रचनेसंबंधानें बरमा सरकारनें केलेल्या सूचनांना हिंदुस्थान सरकारची संमति मिळाली आहे. या रचनेप्रमाणें डेप्युटी राजिस्ट्रार आणि क्लार्क ऑफ क्राउन यांचा पगार १००० ते १२०० रु., रेफरी यांस ७०० ते ८०० रु., प्रत्येकीं असि. राजिस्ट्रारास ४०० ते ६०० रु. असे पगार गहणार आहेत ता. २२ नवेंबरनंतर हे नियम अंमलांत यावयाचे होते.

ईस्ट आफ्रिका या प्रांताचे गव्हर्नर सर पर्सी गिरर्ड हे रूटरच्या बातमीदाराजवळ ह्मणाले:—"हिंदी लोकांसंबंधानें ईस्ट आफ्रिका सरकारच्या धोरणांत मुळींच फेरबदल झाला नाहीं. या देशांत शेंकडा ८५ प्रमाणांत इकडील व्यापार हिंदी लोकांच्या ताब्यांत आहे तेव्हां तें धोरणच त्यांना पसंत असलें पाहिजे."

शिक्षण व स्थानिक सरकार या प्रश्नांसंबंधीं विचार करण्याचा हक्क न्यू डिपार्टमेंटला असावा, अशाबद्दलचा एक ठराव हिंदुस्थानसरकारच्या गॅझेटांत प्रसिद्ध झाला आहे. या खात्याच्या ताब्यांत शिक्षणखातें देण्याचें कारण त्या खात्यांत फार महत्वाच्या गोष्टी उत्पन्न झाल्या आहेत व त्यांचा निकाल लवकरच लागला जाणें आवश्यक आहे; त्याचप्रमाणें म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डस यांच्या शिक्षणाच्या बाबतींत महत्वाचें अंग असल्यानें तीं खातीं न्यू डिपार्टमेंटच्या अधिकारांत दिलीं आहेत.

पतियाळा संस्थानच्या महाराजसाहेबांनीं आपल्या संस्थानांतील एंजिनियर मि. ब्रॅवेल्स यांना युरोपखंडांत वैमानिक विद्या शिकण्याकरितां पाठविलें होतें. मि. ब्रॅवेल्स ही विद्या शिकून व एक इंग्लंडमध्यें तयार झालेलें विमान खरेदी करून आले आहेत.

संकेश्वर मठाचे श्रीशंकराचार्य यांचे कारभारी असा बहाणा करून पुणें येथील कित्येक असामींपासून, त्यांच्या हातून धर्मबाह्य वर्तन घडल्याबद्दल दंडाची रक्कम घेतल्याच्या आरोपावरून गणेश आबाजी देशपांडे या नावाच्या गृहस्थास कालरोजीं पुणें येथील ऑनररी मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं दोन वर्षें सक्त मजुरीची शिक्षा दिली.

---

## श्रीमती आनी बेझंट यांचे निबंधाचे आधारें.

ब्रह्मविद्येचे दृष्टीनें बालकाचें स्वरूप आपण सहज समजतों त्यापेक्षां इतकें भिन्न समजलें जातें कीं, त्यामुळें बालक आणि त्याचे पालक यांचे संबंधांत विलक्षण तऱ्हेची क्रांति होते. पूर्वी आपण समजत होतों कीं ईश्वर मनुष्यास आपले इच्छेनुरूप वाटेल त्या कुलांत जन्म देतो, अथवा मनुष्यांचे ठिकाणीं जी बुद्धी दृष्टीस पडते ती त्याचे मातापितरांचे बुद्धिश्रेष्ठतेवर, तसेंच त्याचे वाडवडिलांच्या अनुवंशीक गुणांवर अवलंबून असते कित्येकांस वाटतें कीं प्रथम मनुष्य जन्म घेतो तेव्हां त्याचें अंतःकरण अगदीं अमूर्त अथवा शुद्ध असून ज्या परिस्थितींत त्याचा जन्म झाला असेल त्या अनुकूल व प्रतिकूल परिस्थितीचा त्यावर परिणाम होऊन त्याचा स्वभाव व बुद्धि बनते. कांहीं जणांचें ह्मणणें मनुष्याच्या बुद्धिची तेजस्विता व मनोविकारवैचित्र्य हीं त्याचे वाडवडिलांवर अवलंबून असतात; त्यांत बाह्य उपाधींनें फारच थोडा फरक पडला जातो. कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी जीव हा अगदीं नवीन उत्पन्न झालेला, भूत काळाशीं त्याचा संबंध नाहीं, असा नाहीं. कित्येकांचा समज असा आहे कीं मूल जन्मल्या नंतर त्यास ज्ञान प्राप्त होतें व तें ज्ञान वाढविलें पाहिजे, त्यास वळण लाविलें पाहिजे, त्यास उत्तम शिक्षण दिलें पाहिजे, व त्याचे वडिलांनीं त्यास आपल्या हुकमतींत ठेविलें पाहिजे; तो या जगांत आला तो अगदीं नव्यानेंच आला आहे. ब्रह्मविद्या अथवा थिऑसफीची बालकासंबंधीं कल्पना— जीव हा अनादि व अमर असून या कर्मभूमीवर त्याचे हजारो जन्म झाले आहेत, त्याचे मनोविकार बुद्धिदार्ढ्यादी गुण जन्मोजन्मीं मिळविलेल्या अनुभवानें तयार झाले आहेत, त्याचा स्वभाव ह्मणजे भूतकाळाचें दर्शक एक चिन्ह आहे, त्याच्या बुद्धिची धारणाशक्ति त्याचे पूर्वजन्मसुकृतावर अवलंबून असते व त्यानंतरच बाह्योपाधीचा परिणाम होणें न होणें अवलंबून असतें. तो बाह्योपाधींनें तयार होणारा पदार्थ नाहीं, वडिलांनीं वाटेल तसें वळण देण्यासारखी वस्तू नाहीं, परंतु तो जीवात्मा अत्यंत विचारार्ह आहे, त्यास मदत करण्या पूर्वी [शिक्षण देण्या पूर्वी] त्याची स्थिति समजून घेणें अत्यंत अवश्यक आहे, हें समजून घेतलें पाहिजे. त्या जीवाचें शरीर हें खरेंच अगदीं नवीन, जंगली घोड्या सारखें असून तें त्याचे स्वाधीन नसतें, शरीरावर त्याचा अंमल चालत नाहीं. परंतु तो [जीवात्मा] कदाचित् त्याचे आईबापापेक्षां गुरुतुल्य मोठा व विद्वान असा असेल. विचारी पुरुषास बालक ही अत्यंत विचारणीय वस्तु आहे, व ह्मणून विचारी पुरुष आपल्या इच्छेचा त्या बालजीवावर अमल बजावीत नाहीं; तसेंच त्याचें तें बालवय व त्याची ती बालमूर्ती हीं पाहून तो त्याजवर अंमल बजावण्याचा मला अधिकार आहे असें समजत नसून तो त्या बालशरीराचे ठिकाणीं राहणाऱ्या जीवात्म्याची प्रवृत्ती समजून घेण्याचा व त्या रक्तमांसमय शरीरांत राहणाऱ्या जीवात्म्यास काय पाहिजे आहे याचा विचार करतो; या हाडामासाचे पिंजऱ्यांत राहणाऱ्या जीवात्म्यास प्रोत्साहन देत असतो. तो त्या बाल जिवावर प्रभुत्व न

या रीतानें पालक हा मुलाचा कधींही स्वामी होतच नाहीं. तो पक्कें ओळखून असतो कीं प्रत्येक जीवात्म्याचा मार्ग व त्याची मार्गक्रमणपद्धति हीं वेगवेगळीं आहे व ह्मणून तो त्यास मोठ्या पूज्यबुद्धिनें व सनताळूपणानें वागवितो. समताळूपणानें वागविण्याचें कारण तो जीवात्मा अगदीं नवीनच सृष्टीमध्यें आला असून त्याचें शरीर अत्यंत बलहीन असतें. पूज्य मानण्याचें कारण त्या जीवात्म्याची त्याच्या सनातनत्वदृष्टीनें पवित्रता; त्याचें आत्मरूप सार्वभौमत्व कोणीही घेऊ शकत नाहीं. अशा रीतीनें प्रत्येक अर्भक मग तें कोणत्याही देशांत जातींत व कुलांत उत्पन्न झालेलें असा तें अत्यंत पवित्र आहे.

अपूर्ण.

---

## वऱ्हाडसमाचार.

मार्गशीर्ष वद्य ३ शके १८३२ दुर्मतिनामसंवत्सरे

---

## आचार व प्रसार.

हिंदुधर्मावर टीकाकारांचा एक आक्षेप हा आहे कीं तो प्रचारक धर्म नाहीं; ह्मणजे जे हिंदुकुलांत जन्मतील तेच तेवढे हिंदु, इतर धर्मीयांना मतांतर करून हिंदु होतां येत नाहीं. या आक्षेपांत कांहीं तथ्य आहे. ह्मणजे बौद्धधर्म किंवा ख्रिस्तीधर्म हे ज्या अर्थानें प्रचारक धर्म आहेत त्या अर्थानें हिंदुधर्म हा कधींही प्रचारक धर्म ह्मणतां येणार नाहीं. पण अगोदर प्रचारक धर्म ह्मणजे तरी काय? वाटेल त्या जातीच्या व धर्माच्या लोकांना वाटेल तेव्हां घेता येणारा व आचरतां येणारा जो धर्म तो प्रचारक धर्म हा अर्थ कीं काय? नाहीं. तर ज्या धर्माच्या मताचा प्रसार करण्याचा यत्न होत असतो त्याला प्रचारकधर्म अशी संज्ञा संकुचित अर्थानें देण्याचा प्रघात पडला आहे.

युरोपीयन पंडित जगांतील एकंदर धर्मांचे दोन वर्ग करतात. एक राष्ट्रीयधर्म व दुसरा सार्वलौकिक धर्म. पहिल्याला इंग्रजींत न्याशनल व दुसऱ्याला युनिव्हर्सल रिलिजन ह्मणतात. ते हिंदुधर्म व यहुदीधर्म यांना पहिल्या वर्गांत व बौद्ध, मुसलमान आणि ख्रिस्तीधर्म यांना दुसऱ्या वर्गांत घालतात. पण विचार करून पाहिलें तर ज्या अर्थानें या तीन धर्मांना सार्वलौकिक ही संज्ञा देतात त्या अर्थानें हिंदुधर्म हा त्यांच्यापेक्षां अधिक सार्वलौकिक आहे. हे तिन्ही धर्म मतबद्ध धर्म आहेत. हिंदुधर्म मत विशेषावर स्थापिलेला धर्म नाहीं. हिंदुधर्माचा प्राण ह्मणजे त्याचीं विशिष्ट मतें नाहींत, तर आचार हा आहे. मतें निराळीं ह्मणून हिंदुधर्म कोणास टाकीत नाहीं. हिंदुधर्मांत कबीरपंथी, दादूपंथी, नानकपंथी लोक आहेत. हिंदुधर्मानें सर्वांना विचारस्वातंत्र्य दिलेलें आहे. ही उदारता हें हिंदुधर्माचें एक मोठें विशेष आहे.

मतबद्ध धर्मांत ही उदारता असणें शक्य नाहीं. आपल्या धर्ममताव्यतिरिक्त अन्य मतांत सत्य आहे किंवा त्यांतही मुक्तीचा मार्ग आहे ही गोष्टच त्यांना प्रा-

आपल्या धर्माबाहेरचे असंख्य लोक रौरव नरकाला जाणें हें त्यांच्यानें पाहवत नाहीं, व ह्मणून परम कारुणिक भावनेनें प्रेरित होऊन ते आपल्या मताप्रमाणें मुक्तीचा खरा मार्ग दाखविण्यास ह्मणजे स्वतः च्या धर्माचा प्रचार करण्यास झटतात. अशा धर्मांनाच मिशनरी धर्म ह्मणतात.

सत्याची ही संकीर्ण भावना हिंदुधर्मांत नाहीं. सत्य हें अनंतरूप आहे हें त्यांचें मत त्यामुळें सत्यदर्शन ज्याला झालें असेल तो कोणत्याही धर्माचा व जातीचा असो, त्याला ते देवाचा अंश समजतात. याच अर्थानें हिंदु लोक पीराला भजतात, येशू ख्रिस्ताला नवस करतांना आढळतात; व नास्तिक ह्मटलेल्या बुद्धाला तर त्यांनीं देवाच्या दशावतारांत मुद्दां स्थान दिलें आहे! हिंदुधर्माची उदारता-त्याची सार्वलौकिकता— ती हीच. मुसलमान धर्म घ्या, किंवा ख्रिस्ती धर्म घ्या. ते मतबद्ध धर्म असल्यामुळें अशा प्रकारची सार्वलौकिक बुद्धि त्यांच्यांत दिसावयाची नाहीं. हा त्यांचा दोष आहे असें नाहीं. त्यांच्या धर्माचा पाया निराळ्या पद्धतीनें घातला गेला आहे येवढेंच.

हिंदुधर्म हा मतबद्ध धर्म नाहीं, आचारबद्ध धर्म आहे. मतबद्ध धर्म असतां तर त्यांना आपल्या मताचा प्रचार करणें हें अवश्य कर्तव्य वाटतें. आपणांस जें सत्य कळलें आहे तें दुसऱ्यापाशीं प्रकट केल्याशिवाय व आपल्या बरोबर दुसऱ्याला मुक्तीचा लाभ करून दिल्याशिवाय त्यांच्या मनाची तळमळ शमत नाहीं. आपल्या मताची छाप दुसऱ्यावर पाडावयाची ह्मणजे इतर मतांचा जो ठसा त्याच्या मनावर अगोदर पासून बसलेला असेल तो काढून टाकावा लागतो; अर्थात् इतर धर्मांचीं मतें चुकलेलीं आहेत. आमचीं खरीं आहेत, तीं टाका आणि हीं घ्या, असें ह्मणावें लागतें. असें केल्यावाचून कोणत्याही प्रचारक धर्माला अन्यगति नाहीं. हिंदुधर्माची गोष्ट अगदीं निराळी आहे. कोणाचीं मतें कशींही असोत; त्यांत सत्यांश आहे तो देवाचाच अंश आहे, त्याविषयीं आदर दाखविणें हें आपलें कर्तव्य आहे; ज्यानें त्यानें आपल्या मताप्रमाणें आचार ठेवणें हेंच पुण्य आहे अशी त्याची समजूत आहे. ह्मणून तो आपलेंच मत पुढें करून इतर मतांना मार्गे लोटण्याचा यत्न कधींही करीत नाहीं. जो ज्या जातींत व धर्मांत जन्मला असेल त्यानें आपल्या जातिधर्माप्रमाणें प्रामाणिकपणें आचार ठेवावा; त्यांतच त्याचा [illegible] आहे, व त्यांतच त्याला मुक्ति मिळेल [illegible] त्याची भावना आहे. हिंदुधर्म हा मिशनरी धर्म नसण्याचें मुख्य कारण हें आहे. ही हिंदुधर्माची उदार भावना व आचारबद्धता-मतबद्धता नव्हे- त्या धर्माचें विशेष आहे. त्यामुळें बाकीचे धर्म प्रचारक धर्मांच्या वर्गांत पडले असतां हा एकटाच धर्म पाहिल्या ह्मणजे आचारबद्ध धर्मांत आज शेंकडों वर्षें राहिला आहे.

---

## सहकारीपतपेढी,

लेख नंबर २

सहकारीपतपेढ्यांसंबंधानें पुष्कळ सावकार साशंक आहेत. व ते या पेढ्यांना मदत देत नाहींत इतकेंच नाहीं तर त्या चांगल्या चालू नयेत ह्मणून आंतून खटपट करितात अशी गुणगुण कर्णोपकर्णीं येते. परंतु त्यांनीं

### सहकारीपतपेढी शेतकऱ्यांची सोय लावील व सावकाराचीहा सोय लावील. कशी ?

एखाद्या शेतकऱ्याजवळ जमीन पुष्कळ व चांगली असेते, व त्यामुळें त्याची पतही प्रथम चांगली असते. या पतीच्या आधारावर तो सावकाराकडून पुष्कळ कर्ज काढितो, व्यर्थ खर्च करितो व शेवटीं गोत्यांत येतो. त्याची शेती अखेरीस सावकाराच्या ताब्यांत जाते व शेतकरी केवळ उपरी सालदार होऊन तेंच शेत सावकाराकरितां वाहतो. मालकीचें शेत होतें, तेव्हां तो शेतींत लक्ष घालीत असे, तसें आतां कोठें घालणार ? तेव्हां शेतीचें उत्पन्न कमीकमी होत जातें व अखेरीस शेत अगदीं खराब झालें, ह्मणजे सावकाराचेंही नुकसान होतें व शेतकऱ्यांच्या नावावर चढलेलें कर्ज फेडण्यास तो असमर्थ होऊन केवळ नाउमेद असा मजूर बनतो. अशा नाउमेद मजुराची संख्या वाढली ह्मणजे शेतीची खराबी, सावकाराची खराबी, व परंपरेनें राष्ट्राची खराबी होते. सामान्य शेतकऱ्यास प्रथम बिन अटीवर आपल्या पतीवर कर्ज काढण्याची सवलत दिली तर असे अनर्थ घडतात ह्मणून त्याच्या पतीला कांहीं बांध—कांहीं अट—आणि तीही त्याच्या व सावकाराच्या सोयीकरितां त्यांच्याच हिताकरितां घालणें जरूर आहे. पतीला ही अट घातली ह्मणजे ही पत सहकारि होते; व त्या पतीच्या पायावर काढलेली पेढी सहकारीपतपेढी होते.

### सहकारीपतपेढी कोठें काढितां येईल. ?

ज्या एका खेड्यांत अगर गांवांत कांहीं शेतकरी अगर इतर धंद्यांचे लोक, एके ठिकाणीं शेजार शेजारीं राहतात. व ते एकमेक कसें वागतांत, कसें राहतात, एकमेकांना चार उपदेशाच्या गोष्टी सांगून वाईट मार्गापासून परावृत्त करितात--चांगल्या मार्गास लावूं शकतात अशा खेड्यांत ही सहकारी पतपेढी चालूं शकेल. व ही चालविण्याला कांहीं अब्रूदार सचोटीचे लोक मिळाले पाहिजेत. त्यांनीं आपआपसांत असा ठराव केला पाहिजे कीं आपण प्रत्येकीं किंवा सर्व मिळून जें कर्ज काढूं, त्या बद्दल सर्व मिळून व शेवटीं व्यक्तिशः प्रत्येकांच्या कर्जाबद्दल जबाबदार राहूं ह्मणजे समजा एखाद्या पेढींतील तीन असामींनीं रु. ४००, ३००, व १०० रु. पेढीच्या मार्फत कर्ज घेतलें व त्यांपैकीं कोणी एक किंवा हे तिघे कर्ज फेडण्यास नालायक झाले, तर त्या एकाचें किंवा तिघांचें कर्ज बाकीच्यांनीं व्यक्तिशः किंवा सर्व मिळून फेडण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. ही जबाबदारी फारांत फार प्राकृत स्थळीं ८०० पण साधारणतः १०० रु. पर्यंत येईल. तरी ती अनियमित आहे. अशी अनियमित जबाबदारी पेढींत सामील झालेल्या इसमांनीं घतली, तरच प्रत्येक इसमाची पत व सर्वांची पत वाढेल व ती वाढली ह्मणजे भांडवल कमी व्याजानें मिळण्याची सोय होईल व सावकारही भांडवल बुडण्याचा धोका कमी झाल्यानें कमी व्याजानें या पेढीस भांडवल देण्यास तयार होईल सावकार पतपेढीचा मित्र होऊं शकेल. मित्र होण्यांत त्याचें हित आहे. असा सावकार पेढीतही सामील होऊं शकतो. तेव्हां सावकारोंनें या सहकारी पतपेढीस सामील होऊन मदत करावी, यांत त्याचें ही हित आहे तें कसें हें पुढें सांग-

सर्व इसमांनीं ही अनियमित ( अपरंपार ) जबाबदारी घेतली, त्या अर्थी त्यांना कोणाला किती कर्ज द्यावें, व तें कों लावावें, हें ठरविण्याचा अधिकार असला पाहिजे. व हा अधिकार वार्षिक साधारण सभा पेढींतील पंच ( व्यवस्थापक चालकांतील व तो चालविण्याला लायक असे पंच पेढीनें वर्षानुवर्ष नेमिले पाहिजेत.

तेव्हां पहिला फायदा हा होईल कीं पेढीच्या सभासदास कर्ज मिळेल, पण बेताचें मिळेल, ज्याच्यायोगानें तो बुडेल असें मिळणार नाहीं. व यावर त्याला व्याज कमी दरानें द्यावें लागेल. सहकारी पत पेढीस सर्वांच्या अनियमीत जबाबदारीवर कर्ज शेंकडा ६।, ७॥ च्या दरानें मिळेल. असा तर्क आहे. अर्बन सेंट्रल बँक आकोला इजकडून ८।९ च्या दरानें मिळेल हें कर्ज पेढीनें आपल्या भागीदारास कर्जाऊ दिलें, तर त्याकडून पेढीला व्याज दरसाल दर शेंकडा १२ रु. मिळेल. तेव्हां जेथें पूर्वी शेतकऱ्यास दरसाल दरशेंकडा २४ रु. व्याज द्यावें लागत असे, तेथें आतां त्यास १२ रु च व्याज द्यावें लागेल. ह्मणजे शेंकडा त्याचे बारा रुपये वांचले. दुसरा अप्रत्यक्ष पण महत्वाचा फायदा झाला तोहा. सहकारी पत पेढी नसतांना फाजील कर्ज त्यानें काढिलें असतें, व तें अद्वातद्वा खर्चिलें असतें. तें ही वाचलें, व त्यावरचें व्याजही वाचलें. यामुळें त्याला **दताचा खर्च करण्याचा पहिला धडा मिळाला व त्याबरोबर त्यानें आपली पत वाढविली व सर्वांची वाढविली.** हे लाभ फार महत्वाचे आहेत, व यावर पुढच्या सर्व कार्याची इमारत रचावयाची आहे.

सहकारी पतपेढीसही नफा झाला. कारण तिनें कर्ज ६।-७॥ च्या दरानें काढिलें व १२ च्या दरानें दिलें. तेव्हां शेंकडा ६।-४॥ रु. नफा झाला. हा नफा त्यापेढीनें रिझर्व फंडांत ( गंगाजळींत ) टाकिला पाहिजे. ह्मणजे हळूं हळूं हा रिझर्व फंड वाढत जाईल व त्या वरचेंही व्याज त्यांत सामील होईल यांत प्रत्येक शेतकरी प्रवेश फी देईल, ती व तीवरचें व्याज याची भर पडत जाईल. सवलतीच्या दरानें जे कोणी भागीदार किंवा इतर बाहेरचे लोक पतपेढीची स्थापना झाल्यावर किंवा पुढें कांहीं रक्कम ठेव ह्मणून ठेवतील ती रक्कम भागीदारांकडे व्याजीं दिल्यावर या रकमेच्या वरचें सवलतीचें व्याज देऊन जो नफा उरेल, तोही रिझर्व फंडांत सामील होईल. दगदग न करितां बरबसल्या थोडें कां होईना पण निश्चयानें नियमित वेळीं येणाऱ्या व्याजावर जे संतुष्ट असतील ते पेढींत ठेव ठेवायाला राजी होतील. सहकारी पतपेढीला सवलतीनें कर्ज देण्याकरितां अकोले येथें सेंट्रल अर्बन बांक काढिली आहे. हिच्या जवळ भांडवल सध्यां १९००० इतकें आहे; हें लवकरच २९००० पर्यंत वाढेल. शिवाय इजकडे सवलतीच्या दरानें ठेवी कांहीं वर्षांच्या मुदतीनें ठेवण्यास कांहीं लोक राजी झाले आहेत. सहकारी पतपेढ्यांनीं अर्ज केला तर त्यांना या सेंट्रल बांकेतून कर्ज मिळेल. तेव्हां कर्ज कोठून मिळेल ही शंका राहीली नाहीं बिनपतीचे असामी अशा रीतीनें सहकारी पतपेढ्या चांगल्या चालूं लागल्या ह्मणजे ज्यांना मुळींच पत नव्हती तेही चांगले वागून तिच्या इसमास कोणतीचे पेढी सामील करून घेण्यास तयार होणार नाहीं, हें खरें. पण बिनपतीच्या इसमांच्या सोयी करितां कोणतीही पेढी असूं शकत नाहीं. सावकारांची जर चांगली समजूत घातली कीं कर्ज उत्तम तारणावर हलक्या दरानें दिलें तर त्यापासून पूर्वी पेक्षां त्याचा फायदाच होईल. तर तेही सहकारी पतपेढ्यांस मदत देण्याला राजी होतील हल्लीं एखादा सावकार कर्ज भारी दरानें देतो. पण त्याला तारण अगदीं लेचेंपचें असतें. त्यामुळें केव्हां केव्हां कर्जही बुडतें व व्याजही बुडतें. ( जें कर्ज कोर्टमार्फत फेडून घ्यावें लागतें, त्यावर कोर्ट फी, वकीली, दरखास्त इत्यादि खर्च फार पडून अखेर पदरांत पडते ती रक्कम फार थोडी असते. ही रक्कम दरखास्तींत दाखल झालेल्या रकमेच्या एक चतुर्थांश असते. सावकारांनीं सांगावें खटले चालविण्याची, काय दगदग आहे ती. ती कमी झाली तर बरें नाहीं काय? )

## नवें पीनल कोड पाहिजे.

साठ वर्षांपूर्वी मेकॉले साहेबांनीं जें पीनल कोड रचिलें तें अद्याप चालूं आहे! मधून मधून त्यांत कांहीं सुधारणा झाल्या, पण त्या केवळ शाब्दिक; पण मूळ तत्त्वांत फरक झालेला नाहीं. पण आतां मूळ तत्त्वांतच दुरुस्ती व्हावयास पाहिजे आहे गेल्या साठ वर्षांत शिक्षणप्रसार व पाश्चात्यांचा संसर्ग यांमुळें आमच्या लोकांच्या आचारविचारांत व कल्पनांत जबर क्रांति घडलेली आहे. अशांना ६० वर्षां पूर्वीच्या कायद्यानें चालणें भाग पडणें हा अन्याय आहे. सुधारलेल्या काळाला अनुरूप असें सुधारलेलें पीनल कोड पाहिजे. लांचलुचपत व रयतेवर जुलूम, या संबंधांत सरकारी अंमलदारांत वचक बसेल असे नियम पाहिजेत, प्रथम गुन्हेगारावर थोडीशी कमी करडी नजर पाहिजे; विशेषतः तरुण गुन्हेगारांकरितां शिक्षेचें प्रमाण निराळें ठरवावयास पाहिजे. विधवेच्या हातून गर्भपातासारखें कृत्य आपल्या अब्रूच्या रक्षणासाठीं घडल्यास तिच्या अनाथ स्थितीकडे, व पुनर्विवाहाला जो सामाजिक विरोध आहे त्याकडे आणि कामशांतीविषयींची जी मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ति तिकडे लक्ष देऊन, तिला कमी शिक्षा द्यावयास पाहिजे. अशा स्थितींत गर्भपात किंवा बालहत्या हीं खरोखर सदोष मनुष्यवध मानणें चुकीचें आहे. हिंदु व मुसलमान स्त्रियांच्या हक्काकडेही पूर्वीच्या पीनल कोडांत लक्ष देण्यांत आलें नाहीं. तें द्यावयास पाहिजे आहे. कित्येक कलमें अद्याप संदिग्ध आहेत, त्यांची फोड व्हावयास पाहिजे आहे. सारांश, अनेक दृष्टींनीं हल्लींच्या काळास अनुसरून सुधारणा करण्यास पीनल कोडांत जागा आहे सिव्हिल प्रोसीजर हें जसें नुकतेंच सुधारलें गेलें, तसें पीनल कोडही सुधारावयास पाहिजे आहे. आमच्या प्रांतातर्फे व्हाइसराय साहेबांच्या कौन्सिलांत विराजमान होणारे सभासद ना० रावबहादुर मुधोळकर हे स्वतः प्रागतिक मताचे व अनुभवी कायदेपंडित असल्यामुळें ते हा विषय हातीं घेतील व इतर कायदेपंडिताची सल्ला घेऊन या संबंधानें उचल करतील अशी आशा करणें निरर्थक होणार नाहीं अशी आह्मांस उमेद आहे.

---

आपले सर्वमान्य बादशहा पांचवे जॉर्ज यांच्या राज्यारोहण समारंभाबद्दल जिकडे तिकडे चर्चा चालू आहे. अशा वेळीं ज्या ठिकाणीं सदर आरोहण विधि होत असतो त्या आसनासंबंधाची थोडीशी ऐतिहासिक माहिती दिली असतां ती मनोरंजक वाटेल ह्मणून येथें देत आहों.

इंग्लंडच्या राजांचा राज्यारोहणाचा विधि वेस्ट मिनिस्टर ॲबे मध्यें होत असतो. दुसऱ्या एडवर्ड बादशहाच्या वेळेपासून हा विधि येथेंच होत आला आहे. येथेंच राजांचें सिंहासन आहे. हें ओक नांवाच्या लांकडाचें केलेलें असून त्याच्या खालीं एक ओबडधोबड, चौरस शिळा आहे. हिची लांबी २६ इंच, रुंदी १६॥। इंच, व जाडी १०॥ इंच आहे. अशी आख्यायिका सांगतात कीं जेकब नांवाच्या साधूला देवदूत शिड्या लावून स्वर्गाला गेल्याबद्दल जो दृष्टांत झाला तो तो साधु या शिळेवर डोकें टेंकून पडला असतांना झाला होता. या दृष्टीनें या शिळेविषयीं भाविक लोकांना फार पूज्यबुद्धि वाटते. ही शिळा प्रथम ईजिप्त देशांत गेली होती. तेथून स्पेन, नंतर आयर्लंड देश फिरून मग स्काटलंडांत गेली व तेथून इंग्लंडांत आली. पण इंग्लंडांत येण्यापूर्वीसुद्धां ही शिळा भाग्यशाली समजली जात असल्यामुळें अनेक राजांचें राज्यारोहण या शिळेवर झालें होतें. या शिळेवर ज्याचें आरोहण झालें नाहीं तो खरा कायदेशीर राजाच नव्हे ही समजूत दीड हजार दोन वर्षें चालत आली आहे. पूर्वी ही शिळा अगदीं उघडी होती. स्काटलंडचा राजा दुसरा केनेथ यानें तिच्या भोंवती लांकडी पट्या वगैरे मारून तिला खुर्चीचा आकार दिला. रॉबर्ट ब्रूसच्या वेळेपर्यंत ह्मणजे इ० स० १२९६ पर्यंत ती स्कॉटलंड देशांत होती. पहिल्या एडवर्ड बादशहानें ती इंग्लंडांत आणिली, आणि तिच्यावर चढता यावें ह्मणून एक पायरी बसविली. ही पायरी बसविण्याला, व शिळेचें रंगरंगोटीचें काम करण्याला खर्च १ पौंड, १९ शि० ७ पे० आला, तो त्या राजानें खाजगींतून दिला, असा इतिहास इंग्लंडच्या जून्या कागदपत्रांतून सांपडतो.

---

## येत्या राष्ट्रीय सभेस सूचना,

राष्ट्रीय सभेचें कार्य अधिक व्यवस्थितपणें चालावें ह्मणून कलकत्त्याच्या एका दोघा गृहस्थांनीं तिला केलेल्या सूचना वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांतल्या बऱ्याच ग्राह्य होतील असा आह्मांस भरंवसा आहे. पण यांहीपेक्षां अधिक महत्वाच्या आणि अत्यंत जरूरीच्या अशा दोन तीन सूचना ' मुंबईसमाचार ' पत्रानें केल्या आहेत आणि त्यांचा विचार राष्ट्रीय सभेच्या यंदाच्या बैठकींतच होणें जरूर आहे. यंदाच्या राष्ट्रीय सभेंत बादशहा पांचवे जार्ज यांच्या राज्यारोहणाबद्दल अभिनंदनाचा ठराव येईलच. त्याबद्दल वाद नाहीं. पण केवळ अशा ठरावापाशीं थांबणें रास्त नाहीं. १९११ सालची कांग्रेसची बैठक होण्या पूर्वीच बादशहांची स्वारी हिंदुस्थानांत येऊन पोंचेल व त्यांनीं इकडे कोण कोणाच्या मुलाखती घ्यावयाच्या वगैरे गोष्टी त्याच्या अगोदर कित्येक महिने सरकारी रीतीनें ठरून जाईल. या साठीं यंदाच्या राष्ट्रीय सभेनें बादशहाच्या आगमना नंत

ाण्यासाठीं डेप्युटेशन नमण्याचा व
आतांपासून पत्रव्यवहार करण्याचा
ास केला पाहिजे. बादशहाचा हिंदु
लोकांविषयींची सहानुभूति सुप्रसिद्ध
तेव्हां डेप्युटेशनची मुलाखत घेण्यास
ून हरकत येण्याचा संभव नाहीं.
ही ही आतां नाहीं. लार्ड मिंटो
ा वळेपासून राजकीय वातावरणाचें
पालटलें आहे व लार्ड हार्डिंग
कारकीर्दीत त्याला अधिक सौम्य
येईल असा रंग दिसतो. अशी
अनुकूल स्थिति असल्यामुळें मानपत्र
ा मार्फत पाठवून खुद्द बादशहा-
ांग्रेसच्या उद्देशांची व कार्याची दाद
, हे अत्यंत अगत्याचें आहे. मान-
कोणकोणत्या गोष्टी घालावयाच्या व
भाषा कशा प्रकारें असावी तें ठर-
एक कमिटी नेमली जावी व तींत
, पारशी व इंग्रज यांची संख्या
असावी. राजद्रोही सभांबद्दलचा
अमीरात बंद करण्याबद्दलची एक
त्या मानपत्रांत असावी. या सगळ्या
व्यावहारिक उपयोग किती होईल
ा इंग्लंडच्या राजकारणांची अंतस्थ
माहीत आहे आणि हल्लींच्या बाद-
सहानुभूतीचा मोर्ले साहेबांच्या सुधा-
किती निकट संबंध आहे हें ठाऊक
ांना स्पष्ट करून सांगण्याची अव-
नाहीं. आणखी एक सूचना अशी
ीं ना० आगाखान, व ना० अमीर
गैरे मुसलमान पुढारी आतां कांग्रेस
मन घालूं लागले आहेत. त्यांचें
धिक घेतां येईल अशी तजवीज
ुढचे वर्षी इंग्लंडांत कांग्रेसचें काम
जोरानें चालवावें व त्यासाठीं ना०
ातू मुंदराव दातवीं, व फे० मेथा,
मुसलमान गृहस्थ यांची योजना
कांग्रेसनें करावी. यंदाच्या पार्ल-
निवडणुकींत लिबरल पक्षाचीच
होईल हें आतां बहुतेक नक्की झालें
व्हां अशा वेळीं इंग्लंडांत केलेल्या
चा श्रेयस्कर परिणाम होईल असा
आहे. या सगळ्या सूचनांचा
राष्ट्रीय सभेंत पूर्ण विचार होईल
मेद आहे.

---

## ...ष्ट्रीय जागृतीचा सप्ताह.

आठवडा म्हणजे हिंदुस्थानच्या
जागृतीचा सप्ताह म्हटला पाहिजे.
प्रमाणें खिस्तधर्मी राष्ट्रांतून हा आठ
स्ताच्या जयंती प्रीत्यर्थ आनंदांत,
या सहवासांत व सहभोजनांत आणि
क सुखोपभोगांत घालविण्यांत येतो,
या आठवड्याची वाट खिस्तधर्मी
ार उत्कंठेनें पहात असतात, तसा
तऱ्हेच्या सुशिक्षित लोकांत आणि
, सामाजिक, एकेश्वरी मतविषयक,
क इ. गोष्टींसंबंधानें विचार कर-
हा आठवडा अतिशय चळवळीचा
कामाच्या धामधुमीचा होईल. या
ांत अलाहाबाद येथें राष्ट्रीय सभेची
ुरू होईल; व तिच्याच अनुसं-
ओघानें सवड सांपडेल त्याप्रमाणें
निषेधक मंडळीची कान्फरन्स,
क परिषद, एकेश्वरमताची परिषद,
परिषद, व वैदिक मंडळींचें अधि-
हीं व्हावयाचीं आहेत. या शिवाय
क परिषद व प्रदर्शन या गोष्टी

झाल्या. पण या अधिवेशन मंडपात मुख्य थिऑसफिस्ट मंडळीचें ही अधिवेशन व्हावयाचें आहे. त्यासाठीं दूरदूरच्या प्रांतांतले ब्रह्मज्ञानवेत्ते व जिज्ञासु यांना मिसेस ॲनी बिझांट बाई व दुसरे ज्ञानी पुरुष आणि स्त्रिया यांच्याकडून जें ज्ञानामृताचें भोजन मिळणार आहे त्यासाठीं औत्सुक्यानें जमणारे शेकडो आहेत. अशा आठवड्याला राष्ट्रीय महोत्सवाचा आठवडा किंवा राष्ट्रीय जागृतीचा सप्ताह हेंच नांव योग्य आहे

---

दुसऱ्याही एका अर्थानें 'महोत्सव' अथवा सप्ताह हें नांव सार्थ आहे. बहुधा उत्सव म्हटले म्हणजे तेवढ्या काळापुरतें लोकांच्या उत्साहाचें प्रदर्शन असतें. उत्सवाची मुदत संपली आणि खिरापत घेऊन लोक बरोबर गेले कीं पुनः वर्षपर्यंत त्या गोष्टीचा विसर पडतो. आपल्या हिंदु समाजांत विशेषतः भाविक वर्गांत — नामसप्ताह, कीर्तनसप्ताह, पोथीवाचनाचा सप्ताह असे करीत असतात. नामसप्ताहांत आठवडाभर नुसता 'ज्ञानोबा तुकाराम' किंवा एखादें देवाचें नांव याचा सारखा घोष चालतो; कीर्तनसप्ताहांत अहोरात्र कीर्तनच! भागवत, किंवा भारत यांच्या सप्ताहांत कसें तरी करून ठरलेल्या मुदतींत तो ग्रंथ भराभर वाचीत जाण्याचें तेवढें ठाऊक! तसा प्रकार आमच्या राष्ट्रीय म्हणविणाऱ्या चळवळींचा या आठवड्यांत होत असतो. या बहुतेक साऱ्या चळवळींत पडणारीं माणसें बहुधा तींच असतात. राजकीय कांग्रेसमधले पुढारी, तेच सामाजिक परिषदेंत, तेच औद्योगिक परिषदेंत, तेच बहुधा चोहींकडे असावयाचे. थोड्याशा मनुष्यबळावर नाटकें करणाऱ्या कंपन्यांतून जशी एकाच माणसाला अनेक भूमीका घेऊन रंगभूमीवर यावें लागतें, तशी स्थिति या आठवड्यांत आमच्या सुशिक्षितांची होते. म्हणजे राष्ट्रीय जागृतीचा हा नुसता 'सप्ताह' किंवा नाटक होतें अशा प्रकारची टीका आज कित्येक वर्षें होत आली आहे, तरी स्थिति फारशी सुधारलेली दिसत नाहीं; आणि त्या बद्दल आमच्या सुशिक्षित मंडळीस फारसा दोषही देतां येत नाहीं. जों पर्यंत देशांत शिक्षणाचा प्रसार सार्वत्रिक झालेला नाहीं, तों पर्यंत हा प्रकार अपरिहार्य आहे. श्रमविभागाचें तत्त्व ज्या प्रमाणें इतर व्यवहारांत त्या प्रमाणेंच—किंबहुना पुष्कळ मोठ्या प्रमाणावर—येथें लागू पडतें.

---

बाकीच्या संस्थांसंबंधानें फारशी फूट नाहीं, पण कांग्रेस सभेसंबंधानें अलीकडे मतभेद विकोपास गेल्यामुळें पुष्कळांना त्या संस्थेपासून अलग राहावें लागत दोन तीन वर्षांत वाटूं लागलें आहे. कारण म्हणजे आत्मघाताचें कृत्य होय अशा प्रकारें आह्मी वेळोवेळीं प्रतिपादन करीत आलों आहों. कोणत्याही चळवळींत पडणारांनीं देशकालवर्तमानाचा पूर्ण विचार करूनच वागलें पाहिजे राजकीय उन्नति साधूं पाहणारांनीं तर या बाबतींत विशेषच खबरदार राहिलें पाहिजे. पण ही साधी गोष्ट कित्येक सुशिक्षितांच्या लक्षांत न राहिल्यामुळें त्यांचे हातून आजपर्यंत अक्षम्य चुका घडत आल्या आहेत. यापुढें तरी त्या घडूं नयेत आणि कांग्रेसनें उभारलेली राजकीय उन्नतीची इमारत कोस...

...पाहिजे असें आमचें मत आहे. 'बंगाली' पत्राच्या विद्वान् संपादकानें ही आपल्या बंगाली बंधूंना हाच उपदेश केलेला पाहून आह्मास संतोष वाटतो, आणि यंदाच्या कांग्रेसच्या सुमारास दिलेल्या या इषाऱ्याचा इष्ट परिणाम होवो असें आह्मी इच्छितों.

---

## योग्य वेळीं इषारा,

गेल्या मे महिन्यांत आमच्या पत्रांत डिप्रेस्ड क्लासेस मिशन संबंधानें लिहितांना आमच्या एका सन्मान्य मित्रानें असें म्हटलें होतें कीं या अस्पृश्य वर्गाची उन्नति कार्याची चळवळ ज्यांनीं चालविली आहे त्यांना उच्च वर्गाकडून केवळ शाब्दिक सहानुभूति नव्हे तर अंगबळ व द्रव्यबळही मिळूं लागलें आहे हीच संतोषाची गोष्ट मानून सगळ्या उखाळ्या पाखाळ्या न काढतां या नव्या साह्याचा जेवढा लाभ करून घेता येईल तेवढा करून घेणें हाच शहाणपणाचा मार्ग आहे; पण ही गोष्ट अजून पुष्कळांच्या लक्षांत येऊं नये ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आमच्या पत्रांतला हा उल्लेख वऱ्हाडांतल्या चळवळीला उद्देशून होता. मुंबई इलाख्यांत मुद्दां अशाच प्रकारचा इषारत देणें नामदार न्यायमूर्ति सर नारायणराव गणेश चंदावरकर यांना योग्य वाटलें व तें काम त्यांनीं स्पष्टपणें व निर्भीडपणें केलें हें पाहून आह्मांस संतोष होतो, अशा प्रकारच्या इषाऱ्याची त्या प्रांतीं जरूर दिसल्याशिवाय न्यायमूर्तींच्या तोंडून असे कोराचे उद्गार निघणें शक्य नाहीं. आमच्या लेखाकडे जरी या चळवळीच्या पुढाऱ्यांचें लक्ष गेलें नसलें तरी न्यायमूर्तींच्या या उद्गारांकडे तरी त्यांनीं लक्ष पुरवावें, आणि हातीं घेतलेल्या कार्याचा अविचारामुळें विचका होऊं देऊं नये असें आह्मी त्यांस नम्रपणें सूचवितों.

---

## पाण्याचा पुरवठा.

या जिल्ह्याचें उत्तमांग म्हणजे आकोला शहर होय; किंबहुना ही नगरी पश्चिम वऱ्हाडचा शिरोभाग असून सर्व देशाच्या हृदयवर्ती भागांत याचा समावेश होतो. मनुष्याच्या श्रीमंतीची व सौंदर्याची सर्व शोभा त्याच्या चेहऱ्यावर एकवटलेली असते तद्वत् आमच्या पश्चिम वऱ्हाडच्या सौभाग्याला शोभण्या इतकें हें शहर टुमदार आहे. येथें व्यापार दांडगा असून नवें शहराचा विस्तार अफाट वाढत चालला आहे. पण या शहराला पाण्याचा मोठी उणीव आहे. आणि त्यामुळें त्याच्या सौंदर्यात नाकानें नांव घेतल्या सारखें झालें आहे. म्हणूनच हल्लीं पाण्याची समृद्धि करण्यासाठीं सर्व लोकांनीं मनावर घतलें आहे. रा० रा० काशीनाथ श्रीराम जठार यांनीं ही गोष्ट प्रथम हातांत घेतली व सध्याचे डिपुटी कमिशनर मेजर ड्रीडन साहेब यांनीं ती चांगली नावारूपाला आणण्याचा संकल्प केला आहे. आमच्या लोकांची जी जुनीं मोठीं धर्मकृत्यें आहेत त्यांपैकीं सार्वजनिक तलाव, विहिरी वगैरे बांधणें हे एक महान् पुण्यकार्य आहे तेव्हां या पाण्याच्या पुरवठ्याच्या प्रयत्नाला यशश्री आणण्याची गोष्ट आमच्या जिल्ह्यातील उदार श्रीमान धर्मात्म्याच्या हातीं आहे. आको...

...कार्य करणार आहेत तऱ्हां अशा सत्कार्यासाठीं जिल्ह्यांतील दानशूर धनिक लोक आपापल्या मोठमोठ्या रकमा मेजर ड्रीडन साहेब यांच्या दोऱ्यांत त्यांच्या पुढें आनंदानें सादर करितील आणि सर्व तो मुबलक धन्यवाद संपादून आपल्या संपत्तीचें चीज करितील अशी खात्री आमचें मन आह्मांस पूर्णपणें देत आहे.

या पाण्याच्या पुरवठ्या संबंधानें कापशी येथे मेजर ड्रीडन साहेबांनीं कसून चौकशी पुष्कळ केली, आणि पब्लिक वर्क्स् खात्याचे सबडिव्हिजनल ऑफिसर रा० रा० लाला हरचरणदास यांनीं भावी योजनांच्या साफल्यतेसंबंधानें चांगली खात्री करून दिली आहे जर कांहीं वजनदार मुत्सद्दी नागरिक या बाबदींत इच्छा दर्शवितील तर त्यांच्या पुढें सर्व प्रकार प्रत्यक्षपणें मांडण्याची तजवीज डिपुटी कमिशनर साहेब करणार आहेत. सरासरी अंदाजा आहे कीं या नव्या कार्याला ४ लक्ष ३० हजार रुपये लागतील. आणि जर सर्व जिल्ह्यांतील वर्गणी १ लक्ष ३० हजार रुपये जमतील तर आमचे स्थानिक सरकार १ लक्ष रुपयांची देणगी देण्यास सिद्ध आहे आणि बाकीच्या २ लक्षांची रक्कम सौम्य व्याजानें कर्जाऊ देण्यास कबूल आहे. ईश्वर करो, आणि जीवनदानानें या जिल्ह्याचा पुण्यवृक्ष अधिकाधीक फलपुष्पांनीं श्रीमान् होवो!

---

## वऱ्हाडवृत्त.

---

हवामान — थंडीचें मान वाढत्या प्रमाणावर आहे. रब्बीच्या पीकांस दवाची वृष्टी उत्तरोत्तर चांगली पुष्टी आणीत आहे. आरोग्यवृद्धीचीं सर्व लक्षणें दिसतात पण प्लेगाचा विस्तार वाढत चालला आहे. उमरावती जिल्ह्यांत दररोजचे प्लेगाचे मृत्यु ३० ४१ होतात. त्याच्या खालोखाल बुलढाणा जिल्हा आहे. आकोला व यवतमाळ हे दोन्ही जिल्हे मिळून बुलढाण्या इतकी दररोजची १० वर मृत्यूंची संख्या आहे.

कापशीहून आणलेल्या नळाचें पाणी गेल्या १९०८–९ सालीं एप्रिल व मे महिन्यांत ९ कोटी ९१ लक्ष १६ हजार ग्यालन पुरवितां आलें. त्या सालीं पर्जन्य ३९ इंच २२ सेंट होता. लोकवस्तीच्या मानानें पाण्याचें प्रमाण दर माणशीं ५४८ ग्यालन पडतें. १९०९–१० सालीं पाऊस २८ इंच ६४ सेंट असल्यामुळें त्याच महिन्यांत पाण्याचा पुरवठा ७८ लक्ष ३६ हजार ग्यालनांनीं कमी झाला व त्यामुळें दर माणशीं १ १/६ ग्यालन कमी मिळालें. नवीन योजनेनें हा पुरवठा निदान दुप्पट होईल असा अंदाजा आहे.

सरकस— प्रोफेसर परशरामराव यांच्या सरकशीचे प्रयोग वर्णनीय होत असतात. सिंहाचे व वाघाचे तर खेळ विशेष स्तुतीस पात्र आहेत.

ॐ

## सत्यमेव जयते.

( सत्यशोधक समाजाचे पुस्तकांची जाहिरात )

शाह्री नारो बाबाजी महाघट सत्यशोधक समाजाचे प्रसिद्ध उपदेशक क्षत्रीय मराठे ह्यांनीं वेदाचे व शास्त्राचे व पुराणाचे व अनेक ग्रंथांचे आधारें लोकांचे कल्याणाकारितां हा ग्रंथ व पुस्तकें तयार केलीं आहेत.

वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धति भाग १० ग्रंथ एकच. पहिल्या भागांत सर्व पूजेचे मंत्र व दुसऱ्या भागांत वटसावित्रीचें व्रत, हरतालि, कान्नत, शमिपूजन, तुलसीविवाह, होळीपूजा, सोमवतीपूजा, शनिपूजेचा विधि, तीर्थप्रापाश्रेत्ताचा विधि, दिपवाळीचें लक्ष्मीपूजन, सर्वत्र देवाचे अभिषेक, सत्यनारायणाचे पूजेची माहिती, गंगापूजन वगैरे अनेक किरकोळ विधिची माहिती मंत्रासह दिली आहे. भाग ३ ऋतुशांती, उपनयन संस्कार (मुंजी) ची माहिती मंत्रासह भाग ४ यांत लग्नसंबंधीं ह्मणजे साक्षगंध, साखरपुडा, शालमुदि, देवकुंडी, साहित्यविडा, जन्नाका, मंगलाष्टकें, सुलग्न, सतत्रणें कन्यादान, कंकणबंधन, लाजाहोम, प्रतिज्ञामंत्र, फळ (तांबूल) किंवा साडे, वगैरे प्रकारचे विधीची तपशीलवार वेदोक्तमंत्रासह माहिती दिली आहे. भाग ५ देवपूजेचे वेदोक्तमंत्र, पुरुषसुक्त, ब्रह्मयज्ञ (संध्या) नित्यकर्माकरितां अग्निहोत्र. भाग ६ यांत यज्ञविधीची संपूर्ण माहिती, वास्तुशांति, ईश्वरप्रार्थना, स्वस्तिवाचन, शान्तिपाठ, वगैरे वेदोक्त मंत्रासहित विधी दर्शविला आहे. भाग ७ यांत अंत्येष्टिकर्म (मृतसंस्कार), श्राद्ध दशक्रिया दाहा दिवसांच्या दाहा क्रिया, अकरा व तेरा दिवसाची क्रिया ह्या सर्वत्र कर्मांची मंत्रासह तपशीलवार माहिती दिली आहे. भाग ८ यांत जोतिषासंबंधीं संपूर्ण माहिती उदाहरणासह दिली आहे. भाग ९ यांत सर्व देवांच्या आरत्या व समाजीयन मंडळींनीं केलेलीं पदें. भाग १० सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें, समाजाचे नियम. पुस्तकांची जाहिरात. अत्यंत महत्वाची दुसरी जाहिरात, ईश्वरप्रार्थनापर पदें. आरत्या व पदें साद्यमाणें एकंदर माहिती देऊन दहा भाग पुरे केले आहेत. हा ग्रंथ प्रत्येकानें संग्रहीं ठेविला असतां हव्यकव्य कर्म करण्यासंबंधीं ब्राह्मणेतर वर्गास कोणत्याही पुस्तकांची जरूर पडणार नाहीं. वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धती भाग दहा व हिंदुधर्माचें खरें ज्ञान, ब्राह्मणाचा हक्क काहीं नाहीं अशा बद्दल हायकोर्टीत झालेले ठराव, वादीचे अर्जाचे नकलेसह, इशारा श्रजोती गोविंदराव फुलेकृत, ब्राह्मणेतर बंधूस प्रार्थना, मराठा शिक्षण परिषदेचा पोवाडा, देशीचळवळीचा पोवाडा, श्री० सयाजीराव महाराजांचा पोवाडा, राष्ट्रीय सभेचा पोवाडा, भीमराव महामुनिकृत सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें व सत्यशोधक समाजाचे नियम, व प्रतिज्ञापत्र, व उत्तम ग्लेझ कार्डावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र, हीं सर्व रंगीबेरंगी छापलेलीं असून प्रत्येकानें आरशांत जडून लावण्यासारखीं आहेत. व संग्रहीं कायमचीं ठेवण्यासारखीं आहेत अशीं एकंदर सात पुस्तकें व तीन रंगीबेरंगी फार्म, व उत्तम कागदावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र; अशीं एकंदर तीन रुपये किंमतीस मिळतील. रोख पैसे पाठविले असतां किंवा व्ही. पी. नें मागविली असतां खालीं लिहिलेल्या पत्यावर मिळतील. पोष्ट खर्च निराळा पडेल.

### सुगंधित धूप

नित्य संध्या समयीं होम, हवन करण्यास अथवा पूजा, पाठ करण्याचे वेळीं अत्यंत उपयोगी ज्यामध्यें नानाप्रकारच्या सुगंधित वस्तु, केशर, कस्तुरी, इ० किंमतीचे पदार्थ व हातरहेचीं औषधें मिश्र केलेलीं असून तो थोडा विस्तवावर टाकला ह्मणजे उत्तम प्रकारचा सुगंध सुटतो. यामुळें दुर्गंधि विषारी हवेचा नाश होऊन उत्तम हवा प्राप्त होते. ज्या घरामध्यें ईश्वरीय वेद येतात नियमानें नित्य जपहोमादि पठण होतें त्या ठिकाणीं कलह, वैर, प्लेग, व्याधि, रोग, अकालमृत्यू इत्यादी आपत्ती येऊं शकत नाहींत हा धूप दर शेरास दोन रुपाया प्रमाणें मिळेल

सत्यशोधक समाज ऑफिस

पोष्ट हिवरखेड रुपरावाचे ता० आकोट

नो. नं. ड ७९ जि० आकोला प्रांत वऱ्हाड

---

## विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार–खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडु, भूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणानें डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे कारतां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कपनींची उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्यावर,

जी. एन. धारपुरे. पोष्ट- अलिबाग . मुंबई.

---

## ब्रह्मसिद्धांतमाला

अथवा

### वेदांताचें युक्लीड.

रा. खंडो कृष्ण ऊर्फ बाबा गर्देकृत हा अपूर्व ग्रंथ अगदीं सरळ सोप्या मराठी भाषेत युक्लीड धर्तीवर लिहिला आहे. या ग्रंथाचा लक्ष्यपूर्वक अभ्यास केला असतां ब्रह्मविद्येचीं तत्त्वें मनामध्यें चांगलीं बिंबून वेदांतावरील कोणत्याही पुस्तकाचें मर्म तत्काळच समजेल. प्रकरणें १२, पृष्ठसंख्या ३४५, स्वदेशी मोहरेदार कागद, टाइप मोठा व ठळक. छपाई व बांधणी सुबक, किंमत १॥ टपाल हांसल निराळें. पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें–

१ किर्लोस्करबंधु, किर्लोस्करवाडी, पो० कुंडल

२ म्यानेजर, श्रीरामतत्त्वप्रकाश प्रेस, बेळगांव.

नो० नं० ण २९

---

### जेंव्हां डाक्टर व वैद्य यांची हीनिराशाहोत, तेंव्हां सुद्धा

### सुख संचारक कंपनी मथुरा यांच्या

## सुधासिन्धु

पासून गुण येण्याची आशा राहतेच. कारण २० वर्षां पासून, लाखों मनुष्या कडून याची परिक्षा झाली आहे. बऱ्याच वर्तमान पत्राच्यां संपादकांनी व डाक्टरांनी, या बद्दल सार्टीफिकिटें दिलीं आहेत. सरकारांतून ही या औषधाची रजिष्टरी झाली आहे. या औषधानें कफ, खोकला, दम, हींवताप, पटकी ( काळरा ) शूल, संग्रहणी, आंव, अतीसार, पोट दुखी, वात्या, मळमळ, हांत पाय व कंबर दुखणें, संधिवात लहान मुलांचे हिरवे पिवळे जुळाब, आणि खोकला सर्वांस गुण येतो किंमत प्रत्येक बाटलीस -॥- आणे. सर्व औषधें विकणारा जवळ मिळतें. बहुत करून प्रत्येक शहरांत आमचे एजंट आहेत च; प्रथम तेथें च शोध करावे जर न मिळेल तर आमचे कडून मागवावे. चालू सर्वांचे पंचांग सर्वांस फुकट मिळेल लहान गावात ही एजंट पाहिजेत; नियम मागवून पहावे

मांगविण्याचा पत्ताः—

क्षेत्रपाल शर्मा मालक

सुख संचारक कंपनी मथुरा

---

## जाहिरात

ऑईल एंजीन. पंप, दळण्यांचीं यंत्रें, तेलाचे घाणे, कापूस वटवण्याचे रेचे ह्मणजे जिन, इत्यादि संबंधीं कोणतीही माहीती पाहिजे असल्यास खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा.

दिवाकर यशवंत फाटक

मेसर्स डेकन स्टेटन कंपनींतील ऑईल एंजिन एक्स्पर्ट (फीलडींग),

नो. नं. ढ ८० उमरावती.

---

### गुण न आल्यास पैसे परत !

ठिकठिकाणीं एजंट पाहिजेत ! !

इच्छितांनीं पत्रव्यवहार करावा.

॥ ॐनमो श्रीवीतरागाय ॥

### स्वदेशी अमृताचा नवीन शोध.

## जायफळार्कमधु.

प्राचीनकाळच्या एका जुन्या लेखावरून वरील औषधाचा शोध अत्यंत कष्टानें लागला आहे. कर्नाटक प्रांतांतील कप्पतगुड्ड नांवाच्या वनस्पतीप्रसिद्ध पर्वतांत कांहीं वैद्यमंडळींच्या शोधानें ही वनस्पती ह्मणजे झाडपाल कचित् कचित् मिळाली आहे या वनस्पतींच्या रसांत जायफळाचा रसार्क मिश्र करून हा "जायफळार्कमधु" यंत्र साह्यानें तयार केला आहे. हा मधु किंचित् पातळ असून खाण्यास अमृताप्रमाणें गोड वसुवासिक आहे. हा मधु खात गेल्यास प्राप्त होणारे गुण सदरहू जुन्या ग्रंथांत लिहिले आहेत ते फार वेळ टिकणारी कामस्थिती अनुभवास येते. हा मधु खाल्यानंतर एक दोन दिवसांतच गुणांश समजुं लागतो. जननेंद्रियांतील गेलेली शक्ती पहिल्यापेक्षां अंशमानानें अधिक वाढते. शरीरपिंड मजबूत आणि कांतीयुक्त होतो रंग, गाल व शरीरावयव मांसल होतात. क्षयानें अगर कोणत्याही रोगानें मनुष्यास आलेली प्रेतवत् कळा तीस दिवसांत जाऊन अंगावरील सर्व शिरा भरतात व मनुष्य रक्तमांसानें भरतो शौचास साफ होऊन भूक चांगली कडकडून लागते हा दाखला पहिले दिवशींच पडतो. एका सप्तकांतच शरिराचें वजन वाढूं लागतें. पर्मा व गर्मी यांनीं दूषित झालेलें शरीर निर्दोष होतें. मदोन्मत्तता येते या औषधास पथ्य नाहीं कामविकार द्विगुणित होतो. नवा रोग असल्यास १० दिवस पुरणाऱ्या एका बाटलीनें गुण येतो. जुना रोग असल्यास ३ बाटल्यांनीं गुण येतो. १ बाटलीची किंमत १ रुपया. दोन बाटल्यांस १८१४, तीन बाटल्यांस २८१० दोन अगर तीन बाटल्या एकाच पार्सलांत भरून पाठवूं; ह्मणजे टपालखर्च जास्त पडणार नाहीं. टपाल खर्च वेगळा पडेल. कार्ड पाठवून आर्डर दिल्यास व्ही० पी०नें पाठवूं.

पत्ताः—सेक्रेटरी मेसर्स.

एम. जी. आर.

नो. नं. ड ९३. श्रीजिनेंद्रप्रासादिक कंपनी,

हेड ऑफिस पोष्ट निपाणी. जि. बेळगांव

---

सूचना —कोणताही माल गुणकारी ठरला ह्मणजे जिकडे तिकडे त्याची नक्कल सुरू होते. परंतु नांवाप्रमाणें गुणास पात्र होत नाहीं: आमचे येथें नकली औषधाचे कारखानेदार नुकतेच डोकें वर करूं लागले आहेत तरी आमच्या ग्राहकांनीं आमचा ट्रेडमार्क व सीलबंद तपासून घेणें.

व्हाइसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यानकडील आनररी असिस्टंट सर्जन मजा अ. म. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी आमच्या औषधे वापर. हल्ली वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नवया जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्याहून आमचीं औषधें त त्या रोगावर अंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकिट आह्मास दिलें आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खर्चीक्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें औषध घ्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्यस्तंभक,
रक्तशोधक, मनोल्हादक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक वसुंगी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जो धातु तो शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें तो दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरूपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी वाहिजे या दिवसांत एकदां तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नदोष व इतर धातुपात उद्भवलें इंद्रियशिथिलता, कफकी. गर्मीसंबंधीं मुरलेले विकार मुत्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, अंगांतील रोग, मळ पांडुरोग भ्रमांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडुरोग मुलांची खंग, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याध, वातरोग, निद्रानाश पित्तावर. बाळंतरोग, मधुमेह जनाट परमा, मुष्टमैथुननें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त यांची शुद्ध वृद्धि, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात दुध व मद्यान्न पचूं लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल अनेक सर्टिफिकिटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यास पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल अनुपानखर्डे सोबत दिला व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील.

दर:—एकदम ३१ गो० १ रु०, ७५ गो० २ रु० १२५ गो० ३ रु० १२५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः—यानें वडस. साहा, फुल, लुपल्या. बिंदु, कांच इत्यादि सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टा तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. २॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जाणार तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठे दिसत नाहीं. बा० किं० १ ॥ मार बाटलीस रु० २

४ दंतबलवर्धक चूर्णः—दंतसंबंधीं सर्व विकार उत्तम बरे होतात

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें मुल्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्ण—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात द. ६ आणे

७ सर्व हिंवज्वरः—औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नाहींत १० पुड्यांस १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनी संग्रहीं तापावर गोळ्या, गाठीस मलम, वात चढूं नये म्हणून वातावर मंत्र ठेवून याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म क्षाक, गुटिका, आसवें, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोगानें किंवा व्ही. पी. नें पाठवूं प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाचें निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधसंबंधी अनेक जाहिराती सुरूं असून प्रत्येक आपला स्वतः निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एकानें जो धंदा सुरू केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून वाटेल त्यानें करावा आमचे जाहितीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आणिले वगैरे गावांतुन तो पुर्णावस्थेंत येऊन आणखीहि नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्याचा ज्याचो तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हच की ज्यांचा कारखाना आज सतत १९।२० वर्षे अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधानें कोट्यावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांनींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणावीं अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असले । व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून डाक्टरांचे सल्ला आणण्याची खटाट करूं. आज पर्यंत आमचे खटाटींत यशाहि बरेंच आलें आहे, करितां सकळ आयुर्वेदप्रेमी व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावीं, एकवार अनुभव घेतल्यास खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागवीं तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी म्हणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

ORIENTAL GOVERNMENT

LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED IN 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

Head—Quarters—Nagpur C. P.

FUNDS EXCEED THREE CRORES
AND
FORTY SEVEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others employing portion of their annual income or profits in effecting life policies create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT.

Nagpur

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Berar Samachar.

वर्ष ४४ ] आकोला—सोमवार तारीख २६ माहे दिसेंबर सन १९१० इ० [ अंक ४८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवी ह. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस मुद्दाच्य असली पाहिजे.
सूचनाः— बुधवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. त्यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खाली दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अगर जास्त इसमांस अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमाच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ एजंट
नं ७३

### मुंबई बँकचें सोनें

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सान्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोलें व उमरावती येथील ऑफिसात विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ ¾ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक G. A. Phillips.
आकोला २१९१०। एजंट

## NOTICE.

D. Y. Phatak oil-engine expert for Fielding oil engines (as supplied by Messrs. Duncan Stratton and Co. of Bombay) can be consulted as to the purchase condition and value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:- C/o N. G. Ketkar Esq
Pleader
No. N. Dh. 81 Amraoti

## नोटीस.

सर्व लोकांस या जाहिरातीनें कळविण्यांत येतें कीं "श्री आकोला नेटिव्ह कॉटन जिनिंग प्रेसिंग आणि स्पिनिंग कंपनी लिमिटेड" च्या भागीदारानीं ता. २३ दिसेंबर १९१० रोजीं भरलेल्या ऑर्डिनरी जनरल सभेंत इ. स. १८८२ चा ॲक्ट नंबर ६ कलम १७३ अन्वयें एकदा ऑर्डिनरी ठराव केला आहे कीं या कंपनीचें काम खाजगी तऱ्हेनें बंद करावें ह्मणजे 'वाईंड अप' करावें व असें करण्या करितां खालीं लिहिलेल्या पांच गृहस्थांस लिक्विडेटर्स नेमलें आहे.

१ रावसाहेब केशव गोविंद दामले, बी. ए. एल. एल. बी. पब्लिक प्रॉसिक्युटर पश्चिम वऱ्हाड.
२ रावबहादूर देवराव विनायक दिगंबर
३ शेट सावतराम रामप्रसाद दुकानचे मालक ओंकारदास रामप्रसाद तर्फे गोपाळराव रामराव.
४ मि. लक्ष्मणराव गोविंद ओक वकील.
५ मि. जमनादास गिरधारीलाल.

सदर्हू लिक्विडेटर्स यांनीं आपले कामास सुरवात केली आहे. करितां ज्यांस या कंपनीशीं व्यवहार करण्याची इच्छा असेल त्यांनीं यापुढें कंपनीच्या लिक्विडेटर्सच्या बोर्डशीं व्यवहार करावा.

सही
K. G. Damle
चेअरमन.
नो. नं. ९१ बोर्ड ऑफ लिक्विडेटर्स
आकोला २४।१२।१९१०

## *The Second Convention Of Religions.*

The second Convention of all religions will meet at Allahabad on the 9 th, 10th and 11 th of January 1911 under the Presidency of His Highness Sir Rameshvarsingh Bahadur, K. C. S. I., Maharaja of Darbhanga.

We are aware that the first Convention met two years back at Calcutta. The President of the managing committee of the present convention is the Honorable Mr. Justice Sharda-churan Mitra who takes very great interest in the matter. Owing to his exertions and indefatigable work the convention has been promised several essays and theses from a large number of eminent scholars and preachers of Hinduism, Zorastranism, Mahamadanism and several other prominent religions of the world.

The religious societies and the public taking interest in religious matters are invited to send their delegates and to attend this large gathering and send in papers and theses to the general Secretary.

Further information as to the Convention can be obtained in Bombay from Mr Laxamidas Nagardas Shroff, member of the Central Committee, (53 Bauleshvar Road, Bombay) who is nominated and who has kindly undertaken to work as our representative for the Bombay Presidency.

(Sd.) Bhoopandrakoomar Bose,
General Secretary.
Dated 7 th December 1910.
85, Grey Street, Calcutta.

अशी संधी पुन्हां येणार नाहीं.



पोष्टखर्च माफ
दर एकाची किंमत ३।

जर्मनसिल्व्हर इमिटेशन रास्कॉप सिस्टिम.

नांवचे खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट मिळेल. अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पत्ता ख्वाजा वलीभाई इस्माल
मुक्काम वर्धा [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं. ९६१

## नोटीस

रा० लक्ष्मण झिंगराजी कुणबी हल्लीं रा० चंडिकापूर ता० आकोट

यांसः—

मी नामदेव गणपत ढेपे कुणबी रा० चंडिकापूर ता० आकोट नोटीस देतों कीं मी तुह्मांस दिलेलें मुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द केलें असे यापुढें तुह्मी माझ्या स्थावरजंगम मालमत्ते संबंधानें तसेंच वेण्यादेण्यासंबंधानें कोणताच व्यवहार करूं नये. केल्यास तुमचेवर फौजदारी करीन माझ्या संबंधानें वसूल केल्यास त्याची सर्वपरी जबाबदारी तुमचेवर राहिल कळावें ता० १९-१२-१०

सही
नामदेव गणपत ढेपे द० खु०
नो. नं. ९ १००

## वऱ्हाडवृत्त.

हवामान.— थंडीचें मान सध्यां जरा कमी आहे. प्लेगाचे तुरळक तुरळक मृत्यु होतात. देवीची साथही सुरू आहे.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | ९९॥ |
| मुंबई ब्यांकेची सोन्याची चीप दर तोळ्यास | | २३॥।=॥ |
| चांदी | | ७३॥ |
| नवारी नवी | ४० | ५० |
| गहूं | | ४॥। |
| गहूं बनसी | | १।० |
| चणे | | ३॥। |
| तेल | | ८ |
| सरकी | | ११॥ |
| तूप | १० | ११ |
| कापूस | ८० | ९० |

WANTED.— At once active agents everywhere to sell large consignments of American goods including watches &c. Salary Rs. 20 and 5 o/o commission. For particulars apply with one anna stamp to—

Hardinge + Co,
Merchants,
133. Canning street, Calcutta

## भक्तिवात्सल्य नाटक

### अंक ४ था.

### प्रवेश तिसरा

स्थल— बादशहाचा वाडा.

दामाजीपंत— रे दिगंबरा! तुझें पतित पावन ब्रीद ऐकून तुझ्या द्वाराशीं मी धांव घतली. तुझ्या चरणीं देह अर्पण केला पण तूं पतितपावन नाहीस असेंच ह्मण ण्याचा प्रसंग येणार काय? आह्मी दीन, तूं दीनदयाळ ! असें असतां शत्रुभयानें आह्मी हीन व्हावे यांत हे मुरारी तुझा पुरुषार्थ काय राहिला! कुबेराच्या मुलानें झोळी घेऊन दारोदार फिरावें! धन्वंतऱ्याच्या बाळानें रोगग्रस्त व्हावें! तसेंच तुझ्या भक्तांनीं दुष्टजनछळांत दडपून जावें ! यांत तुझी ब्रीदावली कोठें राहिली! अनंता द्रौपदीला अनंत वस्त्रें दिलींस. अंबरीषाकरितां दशा वतार घेतलेस. भक्ताकरितां सगुण होऊन दुष्टांचें हनन करून, भक्तवात्सल्य पुराणांतरीं गाजविलेंस. मी पतित- मी दीन- मी पापी जाणूनच चरणीं रत होऊन समर्थाचा आश्रय धरिला. आतां त्याग करणें हा अप मान कोणाचा ! माझें संचित आडवें आलें ह्मणशील तर तुझ्या नामशस्त्रानें त्याचा भंग होतो. वाल्याचा वाल्मिक झाला. कोळ्याचा अजामिळ ऋषी झाला. गणिका पिंगला तुझ्या नामानें संचिताची फेर करून वैकुंठवासी झाली. आणि मी नामाचें कवच धारण करून संकटाचे आघात सोशीत आहे. यांत तुझ्या वचनाची सत्यता कुठें राहिली! दत्तात्रया, धांव, हा पतन तुझ्या दासावर झडप घालणार!

पद

श्री रमा रमणा ॥ येउ दे दयाळा करुणा ॥
जेणें दास तुझे ह्मणवावें ॥ तेणें कां विलय जावें ॥
लोकीं काय दिसें हें बरवें ॥ हीनपण जाणा ॥ १ ॥

अनाथांचा नाथ, दिनांचा रक्षक हें संतवचन सत्य जाणून तुझ्या नामीं विश्वासलों. माझ्या घातापाताचा वा हितानहिताचा सर्व विचार तुझ्या हातीं. जिवाभावानें तुझ्या ठायीं चित्त लावून मी निवांत बसलों आहे. त्रयमूर्ते तूं चित्ताचा चालक, बुद्धीचा गति ता, आहेस ह्मणून सर्व सत्ता तुझ्या हातीं आहे. तू करशील तें योग्य मानून टेवशील त्या स्थितींत राहण्याचा मी निश्चय केला आहे पण—

पद

करिनें हरिशिशुला मारावें ॥ आश्रित बलवंताचे व्हावें ॥
त्यातें दुबळ्यांनीं गांजावें ॥ हीनपण जाणा ॥ २ ॥

, यवनांकडून मला पाचारण करण्या
येत आहेत देवा माझें चित्त क-
! तें तुझ्या पायून ढळणार नाहीं.
तर घणाचे घाव पडेल तरी तुझें
सोडणार नाहीं हा माझा संकल्प

पद

काय वदूं मी भारी ॥ नाथ तूं
जगा कैवारी ॥
वन श्रीद तुझें पुतनारी ॥ वेद गर्जती
सारी ॥
मित पातकी उद्धरले पारे ॥ गज,
गणिका व्यभिचारी ॥
डे दे दया दत्तासदया ॥ अत्रि अनुसया
तनया ॥
केवळ आहेले मानव वहिलें ॥ शरणांगत
मी द्वारीं ॥१॥

माधी लागते. दोन मुसलमान येतात )

शेरखां०-- देखो ये बम्मन बैठा मरगया जैसा करना वैसाके वैसा इस्का हात रहिता है. यल्ला या खुदा ये है. ये ऐसा कैसा मरगया. लविला !

मुल्ला०--- अबे उस्को सैतान लगा है. को याद कर.

विप्र येतो.

विप्र०-- आज या सूर्याला खग्रास ग्रहण णार काय! अरे, हे तर समाधीत मग्न आहेत. सैतान प्रज्वलित होत लिल्या दुःखाग्नीकिलेची यांना कल्पनाही हींसें दिसतें. परमेश्वरा, अशा पुण्य पुरचा ऱ्हास करून भक्तिमार्गाचा लोप आणि ण प्रतिज्ञेला कमीपणा करून जगात विश्वास वाढवूं नको. नमस्कार करतो.

शेरखा०--- अबे बेवकूब काफर ये या करता है. दिखता नहीं ये बैठे गया है.

विप्र०-- खान साहेब हे मेले नाहींत. माधी लागली आहे यांना

मुल्ला०-- हां हां सच. शेरखां ये बम्मन हता है ये आदमी मरगया नहीं. इस्का मदी याने दामात का खालिद मरगया ो इस्को लगा है. अबे बेहराम नमाज ढ. नहीतो वो सैतान गर्दनपर आके ठेगा.

(डोळे मिटून खुदाचो याद करतात.)

विप्र०--- यांना समाधीची बाधा झाली आहे. या समजानें हे शिखानंद गर्भगलित झाले आहेत. हें एकपरी ठीकच आहे कारण भीतिमुळें या पुण्यात्म्याच्या समाधी सुखांत भंग होत नाहीं.

शेरखां०--- देखो वो आया वो आया.

मुल्ला०--- तोबा तकसीर. अब जाना मुषकील है. भागो. भागो. किदरसे आया देखो. [ पळूं लागतो. ]

( काजी येतो. )

काजी०--- मुल्लाजी क्या करतेहो कायकी गडबड मचाई है आपने. नमाजका वक्त आया. वो आदमीको ले चलो जल्द. जीतमे बादशहा वगैरा सब आदमी रहा देखते हैं.

मुल्ला०--- काजीजी पहेले कलमा पढो इस्का सैतान इस्कं छोडता नहीं जल्द.

काजी०--- अबे बम्मन ये कैसा मरगया ! या अल्ला ! या अल्ला ! ये क्या हुवा ! ! अभी खाना, पीना, देना, लेना सब तर्हेकी जबत करनेको नहीं मिलना अबे सैतान इसका पाड ... जल्द आगा की मी हमारा ... चैनका और कमनेकाया ?

विप्र०--- दयाळा परमेश्वरा तुझा मनोदय जाणण्यास कोण समर्थ आहे ? हे आविंध जर या भक्तश्रेष्ठाला सैतानानें जिव मारला समजून माझ्या स्वाधीन करतील तर संतसेवेंत आयुष्य वेचण्यास मला चांगली सवी मिळेल.

[ बादशहा येतो. ]

बादशहा०--- मय जानस आया देखनेका. वहां हमनें कहांतक रहा देखना ?

काजी--- [ कापत ] खा खा खा खाविंद सैतान. ये ऐसा हो गया.

बादशहा०--- ऐसा क्या होगया.

मुल्ला०--- खा-खा-खाया. खाविंद सैतान खाया.

बादशहा०--- मोरे डरके आप सबीको पसीना हो गयाहै. कुछ फिक्र नहीं आगे देखा जायेगा वो जिंदा है, या मरा है पहिले उसको मुसलमीन करनेकी तजवीज करो. मरगया होगा तोभी बमूजब करारके उस्को कफनको मुसलमीन करनाहि चाहिये जाव. मुल्लाजी बम्मन लोगोंको और मसजीतमेंसे इस्लामी सरदारोंको छाहां लेके आव.

( मुल्ला जातो व ब्राह्मण आणि मुसलमान सरदारासह येतो.

( प्रवेश ३ रा. अपूर्ण )

## बालशिक्षण.

श्रीमती आनी बेझंट बाई
यांचे
निबंधाचें आधारें.

(मागील अंकावरून पुढें चालू)

शिवाय ब्रह्मवादी मनुष्यास माहीत असतें कीं त्या जीवात्म्यानें आपल्या जन्म जन्मांतर कर्मानुरूप जो देह धारण केला असेल त्या देहावर बाह्य उपाधींचा परिणाम होऊन त्यांत फरक पडण्याचा संभव आहे. सूक्ष्मदेहांत सर्व तऱ्हेचे मनोविकार चांगले व वाईट हे बीजरूपानें असतात. तें बीज अनंत जन्मांचे अनुरूपानें तयार झालें असतें. त्याचे विशिष्ट गुण अगर विकास पावण्याचे असतात. ह्या गुणांची बाह्य उपाधीनें वृद्धि अगर ऱ्हास होतो. उदाहरणार्थ सूक्ष्म देहांत जर क्रोध व दुसऱ्यास फसविण्याची बुद्धि बीजरूपानें आहे तर त्यास क्षमाशील व प्रामाणिक बापोपाची ही वर लिहिलेल्या बीजांचा नाश करण्यास साह्यभूत होईल, किं हुना तसें बीज बिलकूल नाहींसें होईल; तसेंच ज्या सूक्ष्म देहांत औदार्य, व उपकार बुद्धीचें बीज आहे त्यास वर लिहिलेली परिस्थिति म्हणजे क्षमाशीलपणा व प्रामाणिकपणा या सारखी परिस्थिति मिळाल्यास त्या सद्गुणांचा परमोत्कर्षच जास्त होईल. सूक्ष्म देहांतील विज्ञानमय कोशाचे ठिकाणीं जे कांहीं विशिष्ट गुण असतात तेही त्यास अनुकूळ अथवा प्रतीकूळ अशी उपाधी राहिल त्याप्रमाणें त्यांचा विकास अथवा नाश होणार आहे जीवात्म्याचे जे गुण किंवा दोष स्थूलामध्यें तसेंच सूक्ष्मामध्यें असतात ते सर्व बीजरूपानें कारण देहांत असतात. हीं अशीं गुणदोषमय तीन्ही शरीरें तयार करणें, त्यांतमध्यें कमी जास्त करणें वगैरे गोष्टी विशेषेंकरून बाह्य उपाधींवर अवलंबून असतात. [ त्यास ... कांहीं अपवाद अनु- शरीरांत ] या ठिकाणीं संचित कर्माचा प्रश्न उत्पन्न होतो. कांहीं त्याचें इष्ट अनिष्ट फल असतेंच ही बाह्य स्थिति होय. या बाह्य उपाधींचे बालपणीं होणाऱ्या परिणामावर सर्व भावी चरित्र अवलंबून असतें. उदासीनतेविषयीं या गोष्टी माहीत आहेत, ते या नवीन जन्म घेणाऱ्या जीवाचे ज्यानें ही स्थूल खोळ धारण केली आहे त्याचें आईबाप स्वतः करतात; आपल्यावर यांचें संरक्षणाची फार मोठी जबाबदारी आहे असें ते समजतच असतात; ते जाणूनच असतात कीं या अर्भकाच्या स्थूल व सूक्ष्म देहांची अनुकूल अशी वाढ आपणावर अवलंबून आहे. ज्याप्रमाणें ते स्थूल शरीराची अत्यंत काळजी घेतात, त्यास योग्य असा व्यायाम देऊन त्याचे निरनिराळे अवयवांची चांगला वाढ व्हावी म्हणून काळजी घेतात ते त्याच्या कर्मेंद्रियांची व ज्ञानेंद्रियांची वाढ व्हावी म्हणून प्रयत्न करितात, त्याच्या ज्ञानतंतूची काळजी घेतात. त्या मुलाचे सूक्ष्मदेहावर उत्तम व शुद्ध मनोविकारांना व उच्च व थोर विचारांचा परिणाम होऊन त्यांची वाढ व्हावी असें वळण देतात. त्यांनीही ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, आईबाप यांचे अंतःकरणांत कोणत्याही तऱ्हेचा वाईट विचार उत्पन्न झाल्यास त्या विचारलहरीचा परिणाम त्या अर्भकाचे सूक्ष्मदेहावर एकदम होत असतो व या करितां मुलांचे समीप असणाऱ्यांनीं नुसत्या आपल्या शब्दांची अथवा चालचलनाचीच काळजी घेऊन पुरेंसें नाहीं तर त्यांचे मनांत देखील वाईट विचार आला न पाहिजे. मुलांचे अंतःकरणावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष वाईट व दुष्ट परिणाम होऊं नये म्हणून त्यांनीं अत्यंत काळजी घेतली पाहिजे व दुष्ट व अनीतिमान लोकांचे संगतीत मुलें राहणार नाहींत अशी खबरदारी घेतली पाहिजे, मग ते लोक समवयस्क, तरुण अथवा वृद्ध असोत. या गोष्टी लक्षांत ठेऊन आईबापांनीं मुलांचे परिस्थितीची काळजी घेत असावी. जशा प्रमाणें सभोंवारची परिस्थितिही संरक्षक तशीच विघातक आहे.

आतां आपण घरामध्यें अनुकूल व प्रतिकूल परिस्थिति कोणाची असते याची विचार करूं. अशा पुष्कळशा वस्तू असतात कीं ज्याचा आपण कधींच विचार करीत नाहीं परंतु त्या वस्तु फार मत्वाच्या असून, त्या प्रत्येकांत अनुकूल असाही असतात घर व विशेषेंकरून जेथें मुलें जास्त उठतात, बसतात ती जागा जितकी सुंदर दिसेल तितकी सुंदर करीत जावी. सौंदर्य हें सर्वतोपरी अभिरुचीवर जास्त अवलंबून असतें त्यामध्यें स्वच्छता आणि उपयुक्तता याचा विशेष भाग असतो.

अपूर्ण.

## तीर्थराज प्रयाग

[ आमच्या खास बातमीदाराकडून ]

ता० २२ दिसेंबर.

यंदाच्या राष्ट्रीय महोत्सवाच्या दर्शनाच्या उत्कंठेनें येथें येण्यास निघालों तों आनंद पोहोंचलों. वाटेचा प्रवास एकंदरीनें सुखकर झाला. पूर्वीच्या काळीं हिंदुस्थानांतल्या दूरदूर प्रांतांतले हिंदुच तेवढे प्रयागराजाच्या यात्रेस येत असत, पण काँग्रेस, कान्फरन्स, आणि प्रदर्शन यांच्यामुळें नाना जातींच्या आणि धर्ममतांच्या लोकांना अनायासें या तीर्थाचा लाभ घडणार आहे. आमच्या हिंदु लोकांत तर प्रयाग तीर्थाचा महिमा येवढा सांगितला आहे कीं 'ज्यानें प्रयागास मुंडन केलें नाहीं, त्याला मुक्ति नाहीं; यावरूनच या तीर्थाला प्रयागराज हें नांव मिळालें. आणि हें नांव अगदीं सार्थ आहे. असो; पण तीर्थमहात्म्य सांगून मी आपली जागा व्यर्थ अडवीत नाहीं. तर येथें राजकीय, सामाजिक, औद्योगिक वगैरे महोत्सवांसंबंधानें काय काय तयारी चाललेली दिसते आहे तें प्रथम सांगून नंतर येथील प्रेक्षणीय स्थळांचें अल्प वर्णन देण्याचा माझा विचार आहे.

सध्यां प्रयागला मुख्य गडबड प्रदर्शनासंबंधाची आहे. संगमाच्या रस्त्यावर किल्ल्याच्या बाजूला लक्षावधि रुपये खर्चून जी मयासुराची सभा निर्माण करण्यांत आली आहे तिचें सुरेख बाह्यस्वरूप पाहूनच मनुष्य चकित होतो. आंत तर काय कलाकौशल्य, उद्योगधंदे, शिक्षणविषयक साधनें, चैनीच्या गोष्टी, मनोरंजनक खेळ, विमान वगैरे गोष्टींची रेलचेल आहे. दोन वर्षांपूर्वी नागपुरास भरलेलें प्रदर्शन आपल्या प्रांतांतल्या बऱ्याच लोकांनीं पाहिलें. त्यांत दृग्गुणकरीकडे लक्ष ठेवून मध्यप्रांताच्या दयाळू अधिकाऱ्यांनीं प्रदर्शनाची रचना केली होती. यंदाच्या अलाहाबादच्या प्रदर्शनांत उपयुक्ततेला गौणत्व मिळालें आहे असें नेहमीच वाटल्यावांचून राहत नाहीं. व्यवस्था ही असावी तशी नाहीं. कोणत्या ठिकाणीं कोणती वस्तु मांडली आहे व तिच्यांत विशेष गुण कोणता आहे या गोष्टी विशेषेंकरून प्रेक्षकांच्या नजरेस आणण्यासाठीं हिंदी भाषेंत एखादें पुस्तक काढावयास पाहिजे होतें, पण तें काढलेंसें आढळलें नाहीं. दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं प्रदर्शनाच्या कंपौंडांत असलेला प्रत्येक सरकारी अधिकारी युरोपियन असो किंवा एतद्देशीय असो, सर्वांशीं सभ्यपणानें वागत आहे मात्र माहितगार माणसें थोडीं दिसतात. त्यांची संख्या अधिक असती तर बरें झालें असतें. बाकीचें प्रदर्शन बहुतेक नागपूरच्या प्रदर्शनासारखेंच, पण बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आहे. पण शिक्षणविषयक भाग मात्र अधिक मोठा आहे. या भागांत एक गोम ही आहे कीं यांत मांडलेल्या पुष्कळशा वस्तु परदेशी तयार झालेल्या असल्यामुळें प्रदर्शन म्हणण्यापेक्षां परदेशी मालाच्या बाजारांतून आपण हिंडत आहों असें प्रेक्षकांस वाटल्यावांचून राहत नाहीं. अशा बाजाराचाही हल्लींच्या स्थितींत उपयोग करून घेणाराला पुष्कळ उपयोग होण्यासारखा आहे ही गोष्ट विसरतां कामा नये. आपल्यापुढें परदेशी कां होईना, पण उत्तमोत्तम कामाचे नमुने व नव्या नव्या कल्पना मांडलेल्या असल्या, म्हणजे त्यांच्यावरून कल्पक कुशल माणसाला पुष्कळ गोष्टी शिकतां येतात. या दृष्टीनें यंदाच्या प्रदर्शनाचा पुष्कळच उपयोग आहे हें सांगावयास नकोच. यंदाच्या प्रदर्शनांत गायन व वादनकलेला जागा मिळाली ही विशेष गोष्ट आहे. नागपूरच्या प्रदर्शनांत हें अंग मला कोठें आढळलें नव्हतें. या ठिकाणीं सुधारकांकडून एका बाबतींत आक्षेप घेण्यास जागा राहिली आहे ही गोष्ट खरी आहे; पण यंदा नाहीं पुढल्या प्रदर्शनांत तें व्यंग दूर होऊन खऱ्या, निर्दोष, पवित्र, गायनकलेचा माणसाला असल्या प्रदर्शनांतून ऐकण्यास मिळेल. एकंदरीत कल्पना उत्कट आहे. दुसरी गोष्ट कलावंतिणींचे गाणें किंवा नाच या गोष्टी इतर प्रांतांतून जशा सुधारकांना तिरस्कर-

व त्यांची प्रकृति यांचा विचार केला, तर येथील अधिकाऱ्यांना नांवें ठेवण्याचें कारण दिसत नाहीं.

कांग्रेसची तयारी झपाट्यानें सुरू आहे. येणाऱ्या पाहुण्यांची सोय लावण्यांत स्वागत कमिटी गढून गेली आहे. मागच्या कांग्रेसपेक्षां यंदाची कांग्रेस कोणत्याही रीतीनें कमी न होतां उलट सरस होईल असें येथील लोकांच्या उमेदीवरून व झटून काम करण्यावरून वाटतें. तथापि 'सर्वे: भास्तण्डुला: प्रस्थ मूल्यांशी थोडाशी त्राण दिसते. बनारसच्या कांग्रेसच्या वेळीं राजा मुनशी माधोलाल याचा खंबीर पाठिंबा होता, तसा प्रयागच्या कांग्रेसला कोणाचा दिसत नाहीं. या प्रांतांत कॉलेजें, व शाळा यांच्या द्वारें शिक्षणाचा प्रसार ही मुंबई, मद्रास किंवा बंगाल यासारखा झालेला नाहीं. मुलुखही साधारणपणें कंगालीचा आहे; आणि जे धनिक आहेत त्यांना राष्ट्रीय चळवळींचें महत्व वाटत नाहीं. अधिकाऱ्यांची मर्जी राखण्याकरितां किंवा एखाद्या ले. ग. चें स्मारक करण्याकरितां ते हजारों रुपये देतील, पण कांग्रेसकरितां स्वतःचा बंगला कमी भाड्यानें सुद्धां देणार नाहींत. स्वागत कमिटीच्या कामाला यामुळें फार अडथळा येतो. तथापि ह्या अडचणींत सुद्धां तिचें काम प्रशंसनीय रीतीनें होत आहे. यंदाच्या कांग्रेसच्या मंडपाची रचना आजपर्यंतच्या मंडपांहून अगदीं निराळी असून तींत कल्पना बाहुल्य आहे. मंडपाचे २९ कोन पाहून जवळ जवळ पावशतकांत कांग्रेसच्या हातून कोणतें कार्य घडलें याचा आढावा प्रत्येक डेलिगेटाला आपल्या मनाशीं करण्याची इच्छा होईल, आणि त्याबरोबरच तें कार्य घडून येण्याला गेल्या पंचवीस वर्षांत आपल्या हातून किती मदत झाली तेंही त्याला पहावें लागेल.

सामाजिक परिषद्, थिइस्ट कान्फरन्स, औद्योगिक परिषद् वगैरे संस्थांचे स्वतंत्र मंडप नसल्यामुळें त्यांची तयारी कोठपर्यंत आली आहे हें कळण्यास मार्ग नाहीं. शिवाय मी आजच येऊन पोहोंचल्यामुळें मलाही अद्याप ही माहिती मिळविण्यास सवड झाली नाहीं.

राष्ट्रीय चळवळींत ज्याचें मन रमत असेल अशाला सुद्धां प्रयाग हें स्थळ रमणीय वाटेल. गंगा व यमुना यांचा संगम, यमुनेवर डबल पूल म्हणजे खालून माणसें व टांगाड्या वगैरे जावयाच्या व वरून आगगाडी जावयाची असा दुहेरी पूल, त्याच नमुन्याचा गंगेवर तयार होत असलेला दुसरा पूल, म्यूर सेंट्रल कॉलेज व पब्लिक लायब्ररी यांच्या इमारती, भारद्वाज आश्रम अशोकस्तंभ [ येथील लोक भीमाची लाट म्हणतात ] वगैरे गोष्टी पाहण्या लायक आहेत. या अशोकस्तंभावर अशोक राजाचें अनुशासन कोरलेलें असून शिवाय समुद्रगुप्ताची दिग्विजय, बिरबलाची तीर्थयात्रा, जहांगिराची राज्यप्राप्ति वगैरे अनेक ऐतिहासिक कथांशीं त्या निकट संबंध असून तत्संबंधाचे लेख त्यावर आहेत.

प्रयाग क्षेत्राचें साद्यंत वर्णन करूं लागलों तर एक भलें मोठें पुस्तक होईल व कलकत्त्याच्या एका बाबूनें इंग्रजींत सचित्र पुस्तक लिहिलेंही आहे. येथें धार्मिक व ऐतिहासिक अशा दोन्ही दृष्टींनीं पुष्कळ अशीं होळकरांच्या वाड्यांतली साध्वि अहल्याबाईची प्रस्तारमूर्ति ही आहे. या मूर्तीच्या रचनेंत कारागिराचें चातुर्य आहे असें नाहीं, पण साध्वि अहल्याबाईचें जें चित्र हल्लीं प्रसिद्ध झालें आहे तें खरें नसून धुरंधराच्या कल्पनेंतलें आहे त्यापेक्षां येथील पुतळा पाहून त्या साध्वीच्या दर्शनानें आपण पवित्र झालों असें सात्विक समाधान प्रेक्षकाला मिळेल हा लाभ कोणाला महत्वाचा वाटो अगर न वाटो. मला तो अत्यंत महत्वाचा वाटला ह्मणून मी त्याचा येथें उल्लेख करीत आहे.

# वऱ्हाडसमाचार.

मार्गशीर्ष वद्य १० शके १८३२ दुर्मतिनामसंवत्सरे

## वऱ्हाडचा कापूस.

आमचा हा वऱ्हाड कापसाच्या पिकासाठीं प्रसिद्ध आहे. लागवडी खालीं असलेल्या जमिनीपैकीं दोन तृतीयांश जमिनींत कापूस पिकतो, आणि बाकीच्या एक तृतीयांश जमिनींत ज्वार, तूर, उडीद, व इतर धान्यें पिकतात; ह्मणजे दरसाल सरासरीनें २८ पासून ३१ लक्ष एकर जमिनींत कापसाची लागवड होत असते. पिकाचें सरासरी प्रमाण पाहिलें तर दर एकरास १०० पौंड चांगला स्वच्छ कापूस पडतो. एकंदर हिंदुस्थानांत प्रांताच्या आकाराच्या मानानें पाहिलें तर वऱ्हाड प्रांत फारच लहान आहे, आणि ही गोष्ट लक्षांत घेतली तर कापसाच्या लागवडींत या प्रांताचा नंबर पहिला लागतो प्रांताच्या आकाराचा विचार न करतां नुसत्या लागवडीच्या विस्तारानें नंबरवारी लाविली तरी सुद्धां या प्रांताचा नंबर दुसऱ्या नंबरा खालीं जात नाहीं. पहिल्या नंबराचा मान मुंबई इलाख्याला मिळतो. कारण, मुंबई इलाख्यांत सिंध प्रांत, भडोच, धारवाड, व खानदेश या जिल्ह्यांतून कापसाची लागवड फार मोठ्या प्रमाणावर होत असते तथापि एक सिंध प्रांत तेथील इजिपशियन कापूस फार श्रेष्ठ प्रतीचा असतो ह्मणून वगळला, तर बाकीच्या प्रांतांतल्या पेक्षां आमच्या वऱ्हाडचा कापूस अधिक चांगला असतो ही गोष्ट निर्विवाद आहे. वऱ्हाड प्रांतांत कापसाची लागवड आजकालची नाहीं. फार पुरातन काळापासून आहे. तसाच येथील कापूसही फार दिवसांपासून त्याच्या उत्कृष्ट गुणाबद्दल प्रख्यात आहे. (तीस चाळीस वर्षांपूर्वीं अमेरिकेंत युद्ध सुरू असल्यामुळें विलायतेंतल्या गिरण्या एकदम बंद पडल्या व आणि गिरणीवाल्यांच्या व मजुरांच्या पोटावर पाय येण्याची वेळ आली होती त्यावेळीं हिंदुस्थानांतून जो कापसाचा पुरवठा विलायतेला झाला त्यांतला जवळ जवळ अर्धा कापूस एकट्या वऱ्हाडानें पुरविला होता.) त्यावेळीं आमच्या वऱ्हाडी मंडळींत अज्ञान फैलावलें होतें. नाहीं तर अशा आणीबाणीच्या प्रसंगीं आमच्या शेतकऱ्यांनीं आपल्या घरानें उंबरठे सोन्याचे करून सोडले असते. पण अज्ञानामुळें व भोळे पदरांत पडला व मुंबईस शेअर बाजारांत एकच घुमश्चक्री उडून गेली असो सांगावयाची गोष्ट ह्मणजे आमच्या प्रांतांत जरी व बनी या दोन जातींचा उत्तम लांब धाग्याचा कापूस आज बरीच वर्षें किंबहुना पिढ्यानपिढ्या पिकत आला आहे. तथापि कापसाच्या लागवडीच्या पद्धतींत कालगतीनें ज्या सुधारणा व्हावयास पाहिजेत त्या न केल्यामुळें कापसाच्या या दोन जाती जशा पूर्वीं सरस निवत होत्या तशा आतां निवत नाहींत असा बोभाट आहे. अलीकडे काली विलायती नांवाचा कापूस वर नंबर पटकावून बसला आहे. जरीची नवी एक जात निघाली आहे तिची लागवड कांहीं ठिकाणीं होत असते. हा कापूस फार पाऊस पडला किंवा थोडासा कमी पडला तरी दोन्ही प्रसंगीं अधिक टिकाव धरतो, ह्मणून दिवसेंदिवस शेतकरी ही जात अधिक पसंत करू लागले आहेत. या नव्या कापसांत आणखी एक दोन गोष्टी विशेष आहेत. त्या या कीं याचे पिकाचा अंदाज सहसा चुकत नाहीं ह्मणजे हजार पौंड बियाण्यापासून ३३० पौंड कापूस निघावयाचा तो नियमा प्रमाणें बरोबर उतरतो ही एक गोष्ट; आणि दुसरी—ही जात लवकर पिकून लवकर काढून घेतां येते. आमच्या प्रांतांतल्या ह्मातान्या शेतकऱ्यांना त्यांचा मागचा अनुभव विचारला तर ते असें सांगतात कीं तीस चाळीस वर्षांपूर्वीं पौष किंवा माघ यांचे अगोदर बहुधा कापसाचें पीक घरीं येऊन पडत नसे. आतां दिवाळीच्या आंत मोसम बहुतेक संपत येतो! जुन्या जरीबनीपेक्षां नव्या जरीचें पीक ज्यास्त व लवकर येतें, हा जसा फायदा दिसतो, तसा एक तोटा ही आहे. तो हा कीं या नव्या कापसाचे धागे जुन्यासारखे लांब निघत नाहींत, व त्याला चकाकी ही कमी असते. हें असें कां व्हावें? या प्रश्नाचें उत्तर शेतकरी असें देतात कीं अलीकडे सरकार विलायती किंवा हैरी नांवाच्या जातीचें जें बियाणें देतें त्याचा हा परिणाम आहे. यांत बरेंच तथ्य दिसतें. कारण वऱ्हाड प्रांताच्या दक्षिणेस घाटावर जेथें लोक पूर्वीच्या पद्धतीला चिकटून राहिले आहेत आणि शेतकऱ्यांनीं नव्या जातीच्या बियाणाला हात लाविला नाहीं तेथें अजून पूर्वींच्या सारखा चांगला कापूस पिकतो ही गोष्ट मध्यप्रांताचे शेतकीखात्याचे माजी डायरेक्टर मे० स्टयांडेन साहेब यांनीं कबूल केली आहे, कित्येक लोक या गोष्टीला अन्य कारणें लावतात. ह्मणजे पूर्वींचे शेतकरी ज्याप्रमाणें बियाणें नीट काळजीपूर्वक पारखून घेत असत, तसे आतांचे शेतकरी घेत नाहींत, त्यामुळें बियाण्यांत भेसळ होऊन नुकसान होतें असें कित्येकांचें ह्मणणें आहे. हिंदुस्थान सरकारचे वनस्पतिशास्त्रज्ञ प्रो० ग्यामी यांनीं हेंच कारण पुढें केलें आहे. ते ह्मणतात कीं अलीकडे जिनिंगचे कारखाने गांवोगांव झाल्यामुळें शेतकऱ्यांना सरकी त्यांच्या दाराशीं मिळूं लागली आहे. ती सोडून लांब जाऊन चांगलें बियाणें आणण्यास कोण जातो? पूर्वीं जेव्हां जिनचे कारखाने नुकतेच सुरू झाले होते, तेव्हां यंत्रांतून निघालेल्या सरकीला शेतकरी हात लावीत नसत ती सरकी बाईट असें त्यांच्या मनानें घेतलें होतें. बरी बाईट सरकी घेऊन ते पेरणी करूं लागले. त्याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. सारांश, आमच्या वऱ्हाड प्रांतांतल्या कापसाच्या लागवडीचा हा इतिहास अत्यंत मनोरंजक व बोधप्रद आहे जुन्या लोकांच्या कित्येक समजुती आपणांस दुराग्रहाच्या वाटतात, पण अनुभवाअंतीं त्यांतला खरेपणा कळून येतो. या गोष्टीला जर प्रत्यंतर पाहिजे असेल तर तें या कापसाच्या लागवडीच्या इतिहासांत सांपडेल.

हल्लीं कापसाच्या गुणांत जें नवीन व्यंग वरील कारणांमुळें घुसडलें गेलें आहे तें दूर कसें होणार हा मोठा प्रश्न आहे. पण या प्रश्नाचें उत्तर त्या गोष्टींच्या कारणांतच आहे. जिनिंगच्या कारखान्यांतली सरकी वाईट कारण तींत भेसळ असते ही गोष्ट जर खरी आहे तर शेतकऱ्यांनीं ती सरकी बियाण्यासाठीं घेऊं नये ह्मणजे झालें. थोडीशी महाग पडली तरी हरकत नाहीं. पण देशी हातचाकाच्या रहाटावर निघालेली सरकी घ्यावी. ही सूचना आह्मीच करतों असें नाहीं, तर प्रो० ग्यामी सारखे शास्त्रज्ञ सुद्धां तेंच सांगत आहेत. जिनिंगची सरकी थोडीशी स्वस्त मिळते येवढ्या गोष्टीनें भुलून जाऊन पिकाची हानि करून घेणें ह्मणजे दमडीसाठीं कोट रुपयांचें नुकसान करून घेण्यासारखें वेडेपणाचें आहे. या गोष्टीकडे आमच्या शेतकरी वर्गाचें कधीं लक्ष जाईल तें जाणो.

---

## सहकारीपतपेढी,

लेख नंबर ३.

सहकारी पतपेढ्या काढण्याचा मुख्य हेतु हा आहे कीं, लोकांची सांपत्तिक स्थिति सुधारावी त्या बरोबरच त्यांचें ज्ञान वाढावें, स्वतःच्या पायावर उभें राहण्यास शिकावें, सर्वांशीं सावकारांच्या ओंजळीनेंही पाणी पिऊं नये किंवा सरकारावरही सर्व भार टाकूं नये. सांपत्तिक स्थिति सुधारण्याची ह्मणजे भिकाऱ्याच्या पदरांत भाकरी टाकतो त्याप्रमाणें लोकांच्या पदरांत धर्म ह्मणून कांहीं रकम टाकावी, असा प्रकार इष्ट नाहीं. कारण जसा भिकारी भिकेचे तुकडे खाऊन अक्षयीं भिकारीच राहतो, व आपल्या मुलांस ही भिकाऱ्यांची वृत्ति चालवावयास शिकवितो, व परंपरेनें देशाची संपत्ति ऱ्हास करण्यास कारणीभूत होतो—तसा शेतकरी भिकारी बनवावा, व देशाच्या संपत्तीच्या ऱ्हासास कारण व्हावा, अशी योजना करण्याचा सरकारचा संकल्प नाहीं, व अशी योजना अंमलांत येणें सरकारास व एकंदर राष्ट्रास हितकारी नाहीं. तालमींत तालीम करून शरीराचे स्नायु बळकट करावे, व ती तालीम करण्याकरितां प्रथम प्रथम दूध प्यावें, व पुढें त्यास अगदीं सोडून द्यावें तशांतला हा प्रकार आहे.

सहकारी पतपेढीकडून गरजू शेतकऱ्यांस भांडवल सवलतीनें मिळावें असा पहिला व प्रधान उद्देश तर खरा, परंतु ही पतपेढी चालविण्याची पद्धत अशी असावी कीं तिच्या योगानें पेढींत सामील झालेल्या सर्व भागीदारांना एक प्रकारचें ज्ञान, एक प्रकारचें शिक्षण मिळावें, हा ही उद्देश गौण जरी आहे तरी प्रधान उद्देशाच्याच तोलाचा आहे. पहिला अगदीं निकट तुर्तच सिद्धीस जाणारा आहे ह्मणून प्रधान ह्मटला आहे. दुसरा लांबचा कालांतरानें सिद्धीस

[illegible] आहे हागून [illegible] आहे. परंतु हा गौण उद्देश व प्रधान उद्देश [illegible] लागा पटकावणारा आहे. एक प्रकारचें काम मिळावें, एक प्रकारचें शिक्षण मिळावें, असें म्हटलें तर काय या सहकारी पेढींत लोकांना हिशाबाचापाय शिकविणार, गणित शिकविणार, भूगोल शिकविणार! असा कोणी प्रश्न करील तर त्याला उत्तर हें नाहीं. शाळेंत दिलें जाणारें शिक्षण सहकारी पतपेढींत द्यावयाचें नाहीं. शाळेंतलें शिक्षण मिळालेले असे तरुण पुरुष—कारण अठरा व अठराच्यावर ज्याचें वय आहे—ज्यांना आपलें हिताहित समजतें किंवा समजतें अशी सामान्य समजूत आहे, त्यांचाच या पेढींत समावेश होऊं शकतो—अठराच्या खालीं ज्यांचें वय आहे, त्यांस घेतां येत नाहीं—असे शाळेंत शिकलेले तरुण पुरुष आले, तर चांगलेंच. पण न शिकलेले असेही अठरा व अठराच्यावर वयाचे असे इसम आले तरी हरकत नाहीं. कारण त्यांस फार नाहीं तरी थोडें बहुत आपलें हित कळतेंच, अशी समजूत आहे, व ती पुष्कळ दरीत खरी आहे. तेव्हां पेढींत सामील झालेल्या दोन्ही प्रकारच्या इसमांस ह्यणजे शाळेंत न शिकलेल्यांस व शाळेंत शिकलेल्यांस शाळेंत प्रायः मिळणारें व व्यवहारांतच मिळणारें असें शिक्षण द्यावयाचें आहे. तें कोणतें? आपलें वर्तन चोख ठेवून हा भरंवशाचा व उद्योगी मनुष्य आहे, अशी आपली पत वाढविणें, आत्मसंयमन करणें, दुरवरदृष्टि देऊन काम करणें, काम स्वतः करणें व लोकांकडून करवून घेणें, अशी दोन्ही प्रकारची कर्तृत्वशक्ति वाढविणें, अंगांत व मनांतला जोम वाढवून नेटानें व हौसेनें काम करण्यास तयार होणें, व इतरांबरोबर काम करीत असतां आपलाच हेका आपलाच आग्रह न चालवितां, त्यांची समजूत घालून, प्रसंगीं कदाचित् कोणत्याही समजुती असल्या तरी त्यांचा आदर करून व पड घेऊन, त्यांच्या बरोबर काम करणें, हे धडे आमच्या लोकांस अजून शिकावयाचे आहेत. शाळेंत व कॉलेजांत पढलेले पांतही शिकावयाचे आहेत व शाळेंत न पढलेल्या लोकांनाही शिकावयाचे आहेत. ते धडे शिकण्याची शाळा सहकारी पतपेढी होय. वरती सांगितलेले धडे व्यवहार ज्ञानाचे धडे होत. याहूनही वरच्या पायरीचे धडे म्हणजे निरनिराळ्या धर्मांतील हिंदू–मुसलमान निरनिराळ्या दर्जातील श्रीमंत गरीब, निरनिराळ्या जातींतील ब्राह्मण शूद्र महार— लोकांनीं एका कार्यावर नजर ठेवून काम करावें, व बंधुप्रीति वाढवावी. ईश्वर सर्वांचा बाप, आपण सर्व त्याचीं लेंकरें, तेव्हां आपण एकमेकांचा द्वेष करूं नये, एकमेकांवर प्रेम ठेवावें. एकमेकांस अडचणीच्या वेळीं साहाय्य करावें, श्रीमंतांनीं पैसा द्यावा. शहाण्यांनीं बोध करावा. मजुरांनीं अंग मेहनत करावी, असा भाव पोटीं धरणें, व त्या भावाप्रमाणें वागणें याचें नांव बंधुप्रीति. ही ईश्वराला रुजू होईल.

तुकाराम बोवांनीं म्हटलें आहे जे का रंजले गांजले। त्यांसि म्हणे जो आपुले॥ तोचि साधु ओळखावा। देव तेथेंचि जाणावा॥ तेव्हां आषाढीकार्तिकीं पंढरपुरची वारी करणारे असतील त्यांना प्रत्येकास मदत करणें ही संधि परोपकाराची देवानें म्हणून दिली आहे, असें त्यांनीं समजावें.

सहकारी पतपेढ्यांस मदत केली तर त्यांत स्वार्थ आहे व परमार्थही आहे. अनाथ दुर्बळ ज्यांना मदत देणें हा उत्तम प्रकारचा परोपकार [illegible] आहे व स्वार्थही आहे. [illegible] व्यवहार होत. त्यांत सर्वांचें हित आहे. [illegible] मनुष्यास [illegible] व जे सहकारी पतपेढींत [illegible] आड येऊं पाहतात, तें [illegible] त्याला तारण उत्तम असतें, व त्यावर [illegible] हलक्या दरानें मिळतो तर [illegible] मालमत्ता [illegible] व [illegible] मिळेल. ती [illegible] करण्याकरितां, [illegible] चढती [illegible] करावें. [illegible] शेतकीं [illegible] हिस्से, पडसन, [illegible] उद्योग [illegible] मनुष्य [illegible] होत, व [illegible] इच्छा [illegible] मालावर पडेल, व [illegible] व्यवहारांत [illegible] दिलें, व [illegible] सर्व उद्योग व उत्कर्ष [illegible] संबंध राहावयाचे ते असेर [illegible] एक संस्थेचे कार्य [illegible] असतात, व [illegible] पाळतात. [illegible] आहे [illegible] पूर्व [illegible] अभाव तो [illegible] अवश्य आहे. तो अभाव सहकारी पतपेढ्यांत [illegible] शकत नाहीं. म्हणून सहकारी पतपेढ्यांशीं व्यवहार करण्यांत सावकारांचा फायदा आहे व शेतकऱ्यांचा तर आहेच आहे. जसजशा सहकारी पतपेढ्या अंगानें व संख्येनें वाढत जातील तसतसे शेतकरी अजूनदार, जे नसी, व दुष्काळ होईल व [illegible] देशाची संपत्ति वाढेल. सर्वांस म्हणजे रोजगार मजुरांस पोटभर अन्न व अंगभर वस्त्र व राहण्यास घर मिळेल. ही रामराज्याची कल्पना डोळ्यांत [illegible] पृथ्वीच्या पाठीवर [illegible] उद्योग बढविण्यास झटून प्रयत्न करणारे निष्काम नसतील तर नसोत पण अवतार कार्य करणारे उपाध्ये सर्वांस बुद्धि नसत नाहीं, असे बरेच लोक पुढें आले पाहिजेत. प्रत्येक खेड्यांत चार पांच असे इसम निघणार नाहींत, असें मला वाटत नाहीं. ते लाजून कोपऱ्यांत बसले आहेत त्यांना उत्तेजन देऊन पुढें आणिलें पाहिजे इतकेंच.

---

## साहित्य समागम.

### धर्मशिक्षण.

चालू महिन्याच्या 'विविध ज्ञान विस्तारां'तील अंकांत आमच्या येथील सुप्रसिद्ध विद्वान व विचारवृद्ध लोकाग्रणी रा. ब. अण्णासाहेब महाजनि यांचा 'धर्मशिक्षण' या विषयावरचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. गेल्या ऑक्टोबर महिन्यांत येथें भरलेल्या वऱ्हाड शिक्षकसमाजापुढें वाचलेल्या निबंधाची ही पुनरावृत्ति आहे. निबंध शिक्षणविषयांत मन घालणारांनीं मनन करण्यासारखा असल्यामुळें त्याचा येथें थोडक्यांत गोषवारा देतो.

शाळेंतील शिक्षणाचा प्रधान हेतु शील बनविणें हा आहे व तें धर्मानें नीटसें होतें म्हणून धर्मशिक्षण शाळांतून देणें अवश्य आहे. धर्म आणि नीति यांचा तादात्म्य पाश्चात्य लोक करतात, पण आपल्या इकडे धर्मांतून नीतीचाही अंतर्भाव होतो. पण इकडे शाळांतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणांतून [illegible] वळण लागलें अशी ओरड व लोकांत धर्मावरील [illegible] अशा वचनांत गुंत-[illegible] कोठें अर्थात् सरकारी शाळांतून सामान्य धर्माचें म्हणजे नीतीचें शिक्षण दिलें [illegible] विशिष्ट धर्मपंथाचें शिक्षण दिलें जात नाहीं. मुलांचें नीतीचें शिक्षण जरी दिलें तरी [illegible] अलीकडे शिकलेल्या लोकांत नीतिमत्ता पूर्वींच्यापेक्षा पुष्कळ रीतीनें वाढलेली दिसते असा अनुभव आहे. नुसत्या नीतिशिक्षणानें [illegible] दिसलें तर त्याच्या जोडीला मुख्यतः [illegible] धर्मशिक्षणाची जोड दिल्यास अधिक श्रेयस्कर होईल. अशी खुद्द सरकारास [illegible] सरकारानें धर्मशिक्षणाच्या बाबतींत कांहीं सवलती दिल्या, पण त्यांचा उपयोग [illegible] लोकांनीं घेतला नाहीं. तेव्हां [illegible] पुढाकार घेतल्याशिवाय चालावयाचें नाहीं, तर सरकारनें पुढाकार घ्यावा कीं काय? असा प्रश्न हल्लीं सरकारपुढें आहे, कांहीं खाजगी शाळांतून धर्मशिक्षण देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

धर्मशिक्षणाची अवश्यकता सर्वांना जर मान्य झाली तर तें कसें द्यावें? हा दुसरा प्रश्न उभा राहतो. या बाबतींत तें देणाऱ्या गुरूच्या शीलावर सगळ्या गोष्टी अवलंबून राहणार हें उघड आहे. त्या गुरूला ज्ञान, अनुभव, व शील यांचीं अनुकूलता असल्या शिवाय त्याचें तेज पडणार नाहीं व त्यानें दिलेलें धर्मशिक्षण फळ धरणार नाहीं. अशा गुणवान् शिक्षकांची मुख्य शिक्षकाच्या जागीं योजना झाल्यास शाळेंतील एकंदर वातावरण शुद्ध राहील व त्या वातावरणाचा संस्कार मुलांवर व इतर शिक्षकांवर पडून मुलांच्या मनोवृत्ति स्वच्छ होतील.

तिसरा प्रश्न— हें धर्मशिक्षण प्राथमिक किंवा इंग्रजी शाळांत सुरू करावें? रा. महाजनि यांच्या मतें तें प्राथमिक शाळेंतच सुरू करावें. धर्मासंबंधीं पाठ म्हणजे वंदन–पठन–पूजाअर्चा वगैरे असतात; त्या संबंधानें खेड्यांच्या लोकांस पसंत असतो; तितकें शिक्षण देण्यापुरते शिक्षक ही मिळतात. मुख्य गोष्ट ही कीं धर्मशिक्षण देण्याचा अधिकार असलेला शिक्षक जेथें मिळेल तेथें तें सुरू करावें. मग ती प्राथमिक शाळा असो, आं. व्ह. स्कूल असो कीं हायस्कूल असो धर्मशिक्षण ऐच्छिक असूं नये. तें सक्तीचें असावें. तसें करण्यास कोणतीही अडचण नाहीं. कारण हिंदूंच्या शाळा व मुसलमानांच्या शाळा बहुतेक निरनिराळ्या झाल्या आहेत. हिंदूंच्या शाळेंत हिंदुधर्म, व मुसलमानांच्या शाळांत मुसलमानधर्म शिकवावा. इतर धर्मांचीं मुलें फारच थोडीं असतात. त्यांकडे दुर्लक्ष करतां येईल.

धर्मशिक्षण द्यावयाची रीत अशी असावी:— प्रथम ईशस्तुतिपर गीत गाऊन मग एखाद्या धर्ममताचें प्रतिपादन करावें. योग्य असेल तेथें साधुसंतांच्या वचनांचें निरूपण करावें. रामायण, महाभारत, गीता, उपनिषदें, व 'मातृदेवो भव, पितृदेवो भव' अशीं सामान्य नीतिवचनें हीं मुलांच्या मनावर ठसावीं या वचनांची निवड [illegible] करावी. कोणत्याही [illegible] धर्मपंथाचीं मतें त्यांत नसावीं.

धर्मशिक्षणाला शाळेच्या तासांचे बाहेर तास अर्थातच द्यावा लागेल त्याच्या योगानें मुलांवरचा बोजा वाढेल असा एक आक्षेप निघण्यासारखा आहे. त्याचें उत्तर हें कीं नवीन पद्धतीनें सगळे विषय शिकूं लागल्यानें मुलांना शिक्षणाचें ओझें वाटत नाहीं. शिवाय धर्मशिक्षणांत लेखी किंवा तोंडी परीक्षा घ्यावयाची नाहीं. धर्माचा विषय मुलांच्या मनांत ठसला आहे कीं नाहीं याची परीक्षा त्यांच्या वर्तनावरून होते. ज्याचें वर्तन उत्तम ठरेल त्याला बक्षीस द्यावें, आणि हें ठरविण्याचें कामीं [illegible] मुलांवर असी जबाबदारी टाकली म्हणजे तीं देण्याला तीं हळूं हळूं पात्रही होत जातील.

शाळेचे वर्षास समारंभ मुलांचे आईबाप, व नागरिक यांचेसमक्ष होऊन त्या प्रसंगीं शाळेची हकीकत व शिक्षणाचे कामीं येणाऱ्या अडचणी सांगून शिक्षकांनीं पालकांची मदत मागावी. वेळोवेळीं पालकांच्या सभा भरवून त्यांचा अभिप्राय घेत जावा. म्हणजे गुरुजनांना पालकांचा पाठिंबा मिळेल. कित्येक प्रसंगीं पालकांना बोलावून त्यांच्या देखत धर्मविषयक व्याख्यान गुरूनें द्यावें.

अशा रीतीनें धर्मशिक्षण शाळांतून देतां येईल व त्याला द्रव्यबळही लागणार नाहीं, जेथें उत्साही गुरु आढळतील तेथेंच प्रथम धर्मशिक्षण सुरू करावें, व तें वर सांगितलेल्या रीतीनें सुरू करणें शक्य आहे.

येथें रा. ब. अण्णासाहेबांच्या मताचा जो गोषवारा दिला आहे तो एकंदरीनें आम्हांला संमत आहे, आणि अशा रीतीनें धर्मशिक्षण शाळेंतून देतां येतें असें पुण्यांतल्या एका शाळेच्या अनुभवावरून आम्हांला ठाऊक आहे. पुण्यास नूतन मराठी विद्यालय ही शिक्षणसंस्था सुप्रसिद्ध आहे. हिच्या येवढी मोठी दुसरी शाळा पुण्यांत नाहीं. हींत प्राथमिक व इंग्रजी मिळून १९०० मुलें शिकत आहेत. येवढ्या मोठ्या शाळेंत रा. ब. महाजनि म्हणतात त्याप्रमाणेंच एका उत्साही शिक्षकाकडून रोज अर्धा तास सामान्य धर्म व नीति यांचें शिक्षण देण्यांत येत असतें. नुसतें रामायण, महाभारत, गीता, उपनिषदें वगैरे धार्मिक ग्रंथच नव्हेत, तर राजस्थानचा इतिहास, अमेरिकेचा इतिहास, मराठ्यांचा इतिहास, इंग्लंडचा इतिहास वगैरे उदात्त चरित्राच्या गोष्टी सांगून त्यांतील रहस्य मुलांच्या मनावर बिंबविण्यांत येत असतें. काकचिमणीच्या गोष्टीपासून तों उपनिषदांतल्या महान तत्त्वापर्यंत धर्मशिक्षणाला उपयोगी पडणाऱ्या कोणत्याही गोष्टीची उपेक्षा होत नाहीं. तेथें धर्मशिक्षण सक्तीचें केलें आहे. धर्मशिक्षण नुसतें व्याख्यानाच्या पद्धतीनें देणें लहान मुलांस हितकर नसतें, म्हणून सॉक्रेटीसाच्या संवादपद्धतीचा अथवा प्रश्नोत्तर पद्धतीचाही उपयोग करण्यांत येतो. मुलें कदाचित् दुर्लक्ष करतील म्हणून दर वर्षीं अखेर त्यांची लेखी परीक्षा ठेविली आहे व तींत ज्यांचे नंबर वर येतील व ज्यांचें वर्तन उत्तम असेल अशांना बक्षिसें देण्यांत येतात. पालकांची सभा मात्र अद्याप भरविली नाहीं आणि पुण्यासारख्या भिन्न मताच्या व भिन्न तऱ्हेच्या ठिकाणीं अशा सभा भरवून कांहीं उपयोग होईल किंवा निष्कारण बखेडा होईल [illegible] यामुळें कदाचित् ही सूचना तेथें अंमलांत आणणें सोयीचें झालें नसेल. बाकीच्या रा. ब. च्या सूचना पुण्याच्या नू० म० विद्यालयांत प्रत्यक्ष अंमलांत आलेल्या आहेत [illegible] अशा रीतीनें दिलेल्या धर्मशिक्षणाचें फळ [illegible] म्हणी प्रमाणें तात्कालिक परिणाम दिसावयाचा नाहीं; परंतु कालांतरानें तो दिसल्यावांचून राहणार नाहीं असें रा. अण्णासाहेबांप्रमाणें आमचें ही मत आहे, आणि वऱ्हाडच्या कांहीं शाळांतून तरी अण्णासाहेबांच्या या धोरणावर धर्मशिक्षण देण्याची पद्धत सुरू व्हावी अशी आमची इच्छा आहे.

---